# माणूस

त्र वार्ता पुस्तक

१ मार्च १९७४ • एक रुपया



# पोटाच्या शत्रूसंगे युद्ध आमचे सुरू...

केवळ एका राज्यासाठी, एका सत्तेसाठी, किंवा एखाद्या मामुली स्त्रीसाठी अनादी कालापासून अनेक लढाया झाल्या आहेत.
पण पोटासाठी लढाया क्वचितच झाल्या असतील. किंबहूना ज्या काही थोड्या लढाया झाल्या असतील त्यासाठी जी आयुधं, शस्त्रं वापरली गेली असतील त्याहूनही वेगळी पण अधिक प्रभावी आयुधं सध्याच्या ‘पोट’ युद्धात वापरली जात आहेत.
पोटाच्या या दीडवितीच्या खळगीसाठी रक्ताचे पाट वाहात आहेत ही गोष्ट थोर आहे....पण त्याला वापरली जाणारी शस्त्र-आयुधं त्याहून थोर आहेत.




**उदा : हे लाटणे**

पोळी लाटणे किंवा नवरारूपी बोक्यावर उगारण्यापलिकडे त्याचा कदापी उपयोग झाला नाही. पण तेच लाटणं सध्या सचिवालयावर चाल करून जात आहे. लाटण्याचा भाव वाढलाय त्यामुळे. यापुढे मुंबईतील सारे कारखाने फक्त लाटणी बनवून उदरनिर्वाह करणार आहेत म्हणे.

**कुलूप :**


एखाद्या गंजक्या तिजोरीला कुलूप ठोकून निर्धास्त राहाणाऱ्या धनिकाला त्याची खरी किंमत. पण सध्या कुलुपाचा उपयोग फार व्यापक होत आहे. आख्खी मुंबई, आख्खा भारत आख्खे जग...आख्खे विश्व बंदिस्त करायला उपयोगी पडेल एवढे कुलूप तयार करायचे टेंडर नुकतेच मागवले आहे म्हणे.




झाडू :

बायको माहेरी गेली की साफसफाईसाठी ज्याचा आधार घ्यावा लागतो असा निरुपद्रवी उपयोगी प्राणी. प्रसंगी झुरळावर प्रखर हल्ला चढवायला जो धावून येतो तो....पण सध्या तोच फार हिंसक होऊन बसला आहे. छोटचा मोठ्या उमेदवारापासून ते मंत्रीमंडळापर्यंत सर्वांना सर्रास झाडून काढतो तो केवढा सामर्थ्यवान असेल ? सबब झाडूमहाराज की जय !








### जेव्हा ड्रॅगन जागा होतो..,..

दीडवितीची खळगी ज्यावेळी भरत नाही, पोटतिडकीने ज्यावेळी शरिराची नस आणि नस, धमनी आणि धमनी तट्‌तटू लागते, डोळयात रक्त सांकळू लागते, हाता पायांना तणाव बसू लागतात आणि जेव्हा जिभा आग ओकू लागतात तेव्हाच ड्रॅगनला जाग येते. पण सध्याचा आमचा ड्रॅगन अद्याप झोपी गेलेला आहे. त्याने नुकतेच पैसे गिळलेत असे लोक सांगतात. गिळू देत...गिळू देत....बिचारा ! पैसे गिळणाऱ्यांच्या देशात तो दुसरं तरी काय गिळणार ?




हा उत्साह, हा आनंद कसला असेल ? गिरगावच्या एका गल्लीत रात्री बारा वाजता एक रॉकेलची गाडी आली त्याचा.

## चार दृश्ये : मुंबईची : २२ फेब्रुवारीची

रात्री-बेरात्री जवळ पैसा अडका घेऊन एखाद्या आडगावातून गाडीने प्रवास करणे म्हणजे धोक्याचेच ! पण मुंबईसारख्या शहरातून दिवसा-ढवळ्या रॉकेलची गाडी घेऊन जाणे त्यापेक्षा अधिक धोक्याचे. सुगावा लागला तर कोण, कुठे घेरावो टाकतील याचा नेम नाही.







पाण्याचा टँकर आल्यानंतर खेडेगावात दिसणारे हे दृष्य. पण मुंबईत रॉकेल आल्यानंतरही असेच दृष्य जागोजाग दिसते.

आणि बालगोपाळांचा हा थाळी-प्रोटेस्ट. महागाई, भाववाढ दारातून घरात पोहचल्याचे हे लक्षण. ड्रॅगन हळू हळू जागा होत आहे का ?....






मुक्काम : कोळकवाडी
गावकऱ्यांनी श्रमदानाने
उभारलेली शाळा.



धरणाने समृद्धी यायची असेल
तेव्हा येईल पण आज तरी हा
भाग पाण्याखाली जाणार
म्हणून गावकरी हतबल झाले
आहेत.

या परिस्थितीत कोळकवाडीच्या
मागे उभे आहेत नाट्यमंदारचे
राजाराम शिंदे



# माणूस चित्र वार्ता पुस्तक

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहसंपादक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

| दिनांक | किमत | अंक |
| --- | --- | --- |
| १ मार्च १९७४ | एक रुपया | पंधरावा |

## राजाराम शिंदे नाट्यमंदारचे आणि कोळकवाडीचेही

माधव कुलकर्णी

कोयनेच्या तीरावरील 'कोळकवाडी' हे लहानसं गाव. या गावाला आम्हा शहरवासियांचे पाय कधीकाळी लागतील अशी सुतराम शक्यता नव्हती. कारण या गावात प्रेक्षणीय असं काहीच नाही. ही कोकणभूमी असूनही इथे समुद्रकिनारा नाही, माडा पोफळीची झाडं नाहीत. नाही म्हणायला इथली माती मात्र तांबडी आहे आणि इथला गरीब शेतकरी वर्षानुवर्ष हाल-अपेष्टांचं जीवन जगतो आहे. त्यातल्यात्यात या गावाचं दुर्दैव असं की कोयना प्रकल्पाचा दुसरा बांध या गावातच बांधला जात असल्यामुळे कामाच्या सोयीसाठी विजेच्या तारा या गावावरून जातात पण या गावाला प्रकाश मिळत नाही. पाण्याचे नळ याच गावाच्या जमिनीवरून नेले जातात पण थोडी वाकडी वाट करून तहानलेल्या इथल्या माणसांची मनं शांत करावीत असं कुणाला वाटलं नाही. शेती सुधारण्यासाठी प्रयत्न करावेत आणि शेतकऱ्याला तरी रेशनसाठी रांगा लावाव्या लागू नयेत हे कुणाला सुचलं नाही. सरकार दप्तरी या गावाच्या विकासासाठी काही रक्कम खर्ची पडली असेलही कदाचित पण या गावानं लहानशी सुधारणा देखील डोळ्यानी पाहिली नाही. अशा गावात आम्ही शहरवासियांनी जाण्याचं कारण काय? पण तो योग राजाराम शिंदे यांनी नुकताच जुळवून आणला,

होय, तेच ते राजाराम शिंदे. नाटचमंदार या मुंबईतील अग्रगण्य नाटचसंस्थेचे मालक. कोळकवाडी ही त्यांची मायभूमी. इथे त्यांचं एक लहानसं घर आहे. नाटचव्यवसायात हा माणूस रमला असला तरी गावाकडं त्यांचं लक्ष होतं, वारंवार जाणंयेणं होतं. गावाचं दुःख त्याला दिसत होतं. पण सुधारणेच्या कार्यात प्रत्यक्ष उडी घ्यावी हे घडत नव्हतं. तसं घडणं काहीसं अस्वाभाविकही होतं. गावाच्या विकासकार्याची धुरा वाहाणाराला संपूर्णवेळ या कार्याला वाहून घ्यावं लागतं, गावात राहून मोठ्या गोष्टीत रस घ्यावा लागतो. अष्टावधानी नाटचव्यवसाय संभाळणाऱ्या राजाराम शिंदे यांना म्हणूनच ही गोष्ट शक्य होणारी नव्हती. पण वर्षभरापूर्वी काही घटना अशा काही वेगानं घडल्या की शिंदे यांना अलिप्त रहाणं अशक्य झालं. गावातील रेशन दुकानाचं प्रकरण त्यांनी हाती घेतलं. ते सोडवीत असतानाच स्थानिक नेतृत्वाला अव्हान देणं आवश्यक होते. त्याशिवाय या गावाचा कायापालट होणार नाही हे त्यांच्या लक्षात आलं. या क्षेत्रात आपण कितपत उतरावं असा सहाजिकच त्यांना प्रश्न पडला. परंतु निर्णय घेणं त्यांच्या हाती उरलं नव्हतं. ज्या धडाडीनं, हिंमतीनं आणि शिस्तीनं त्यांनी रेशन दुकानाचा प्रश्न सोडवला. त्यानं गावकरी प्रभावित झाले आणि ग्रामसुधारणेची मोठी जबाबदारी त्यांच्यावर आपोआप येऊन पडली.

हिंमत, कष्ट आणि शिस्त हे राजाराम शिंदे यांच्या व्यक्तित्त्वाचे तीन महत्त्वपूर्ण पैलू आहेत. ते तसे नसते तर हा एक साधा कामगार नाटचमंदारचा मालक झाला नसता.

शिंदे यांना नाटकाची मनापासून आवड. परळ, लालबागच्या नाटकात सुरुवातीला

यांनी कितीतरी भूमिका केल्या. दिग्दर्शनं केली आणि एकदोन नाटकंसुद्धा लिहिली. नटवर्य बाबूराव पेंढारकरांची शागिर्दी ते काही वर्षे मनापासून करीत होते. बाबूरावांची अभिनय निष्ठा, शिस्त आणि व्यवहारीपणा त्यांनी याच काळात आत्मसात केली. (त्यांचे आणखी काही गुण (?) शिंद्यांनी पचवले आहेत की नाही हे मला ठाऊक नाही. त्यासाठी सौ. शैलजा शिंदे यांची स्वतंत्र मुलाखत घ्यावी लागेल. असो—) दहा-पंधरा रुपये नाईट मिळावी म्हणून एकेकाळचा हा होतकरू नट कितीतरी वर्षं धडपडत होता आणि त्याच काळात रडतखडत चालणारी छोटी बस घेऊन कोकणात नाटकांचे दौरे काढीत होता. मला वाटतं—हीच नाट्यव्यवसायाची नांदी होती.

तरी देखील हा अंधारात चाचपडणारा काळ होता. राजाराम शिंदे यांच्या भाग्यकाळाची मुहूर्तमेढ रोवली 'मंदारमाला' या नाटकानं. या नाटकाची प्रथम निर्मिती केली, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या कलामंडळ शाखेनं. पुढे यशस्वी ठरलेल्या काही काही नाटकांचे सुरुवातीचे योग किती गमतीदार असतात पहा! भालचंद्र पेंढारकरांनी हे नाटक नाकारलं होतं (पंडितराज यशस्वी ठरल्यानंतरसुद्धा) आणखी एकदोन नाट्यसंस्थांनी देखील या नाटकाकडे कानाडोळा केला आणि मग जणू विद्याधर गोखल्यांवर उपकार म्हणून ग्रंथ संग्रहालयानं हे नाटक हाती घेतलं. दृष्ट लागावी असा पहिला प्रयोग झाल्यानंतरसुद्धा हे नाटक चालवावं अशी ग्रंथ संग्रहालयाला बुद्धी होईना. त्यावेळी या नाटकात एक दुय्यम भूमिका करीत असलेले राजाराम शिंदे पुढे आले आणि त्यांनी हे नाटक चालवलं. कलामंडळाच्या नावावर या नाटकाचे पहिले शंभर प्रयोग होण्याचं श्रेयही राजाराम शिंदे यांचंच. त्यानंतर त्यांनी स्वत: हे नाटक चालवायला घेतलं आणि त्यातूनच 'नाट्य मंदार' ही संस्था उदयाला आली.

नाट्यमंदारचं दुसरं नाटक 'मेघमल्हार'. विद्याधर गोखल्यांच्या या नाटकाचं दिग्दर्शन केलं मो. ग. रांगणेकरांनी आणि राम मराठे व वसंतराव देशपांडे हे ज्येष्ठ गायक याच नाटकात एकत्र आले. नाट्यमंदारला प्रतिष्ठा लाभली, पण पैसा मात्र मिळाला नाही. तिसरं नाटक 'घनश्याम नयनी आला.' पुरुषोत्तम दारव्हेकरांनी या नाटकांचं लेखन—दिग्दर्शन केलं, यशवंत देवांनी संगीतसाज चढविला, पण या नाटकानं नाट्यमंदारची आर्थिक स्थिती अधिकच खालावली.

अशा परिस्थितीत 'भोवरा' हे प्रायोगिक स्वरुपाचं नाटक काढणं हे धाडस होतं पण धाडस हाच राजाराम शिंदे यांचा स्थायीभाव असल्यामुळे 'भोवरा' काढूनच ते थांबले नाहीत तर पुढे काही वर्षांनी 'माता द्रौपदी' हे धंद्याच्या दृष्टीनं थोडीदेखील आशा नसलेलं नाटक त्यांनी रंगभूमीवर आणल.

शिंदे यांचा देह आणि कार्याचा प्रचंड आवाका पाहिल्यानंतर हा माणूस वैभवात लोळत असेल असं कुणालाही वाटेल. पण वस्तुस्थिती तशी नाही. हजारांच्या, लाखांच्या योजना पार पाडीत असताना देखील, काही वेळा जोगळेकरांच्या हॉटेलातील जेवणाचे डबे त्यांना उधारीवर आणावे लागले आहेत. पण शिंदे डगमगले नाहीत. मला वाटतं, तीच त्यांची शक्ती आहे. ते पराभवानं खचत नाहीत. अशाच एका निराशेच्या काळात ते मला म्हणाले होते, 'माधवराव, नुकसान आलंय ते धंद्यात. मी काही व्यसनं करून हा पैसा उडवलेला नाही. मग काळजी कशाला? आज नुकसान आलं, उद्या नफा सुद्धा होईल'. आणि खरोखरच 'तरुण तुर्क म्हातारे अर्क' या प्रा. मधुकर तोरडमलांच्या नाटकानं त्यांचं बहुतेक सर्व कर्ज फिटवलं आणि नव्या नाटकाच्या योजनांसाठी शक्ती दिली.

शिंदे यांना पुस्तकी शिक्षण फारसं मिळालं नाही. पण तथाकथित तज्ज्ञांना लाजवील अशी त्यांना नाटकाची समज आहे. तात्त्विक गप्पांचा पसारा न मांडता नाटकातील दोषावर ते नेमकं बोट ठेवतात. ही झाली लेखनासंबंधीची गोष्ट. पण नाट्य व्यवसायाचे बारकावे शिंदे यांना जितके ठाऊक आहेत तितके क्वचितच कुणाला ठाऊक असतील असं म्हटलं तर ती अतिशयोक्ती ठरू नये. नाटकाचा सेट बनविण्यासाठी कापड किती लागेल, लाकडं किती लागतील येथपासून ते महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात या नाटकाचे प्रयोग केव्हा व कुठे लावावेत हे त्यांना नेमकं ठाऊक असतं. ज्या गावांची नावं आपण ऐकलीही नसतील त्यांची संपूर्ण माहिती शिंद्यांजवळ आहे. त्या गावाचं अंतर, जाण्याचे रस्ते, तिथे उपयोगी पडणारी माणसं ह्याची तपशीलवार नोंद त्यांच्याजवळ आहे. नाट्यमंदारचं कार्यालय तर कुणालाही हेवा वाटेल असंच आहे. आज नाट्यमंदारच्या मालकीच्या दीड-दीड लाख रुपये किंमतीच्या दोन बसेस आहेत.

एका साध्या, अल्पशिक्षित माणसानं मिळविलेलं हे भव्य यश! पण ते त्याला कुणी दान म्हणून दिलं नाही. त्यानं ते कष्टानं मिळविलं आहे. शिंदे अजून तरुण आहेत म्हणूनच त्यांच्या महत्त्वाकांक्षेला खूप वाव आहे. नाट्यव्यवसायात महोत्सवांचे ऊंच मिनार त्यांनी उभारले पण तरीही त्यांचं मन अतृप्तच राहिलं. ही हरवलेली तृप्ती शोधण्यासाठीच ते आपल्या गावाकडे वळले आहेत.

अवघ्या एक वर्षात गावासाठी दीड लाखाच्या वीज पुरवठा प्रकल्पासाठी त्यांनी मंजुरी मिळवली व ते काम सुरूही केलं. साडेतीन लाखाची पिण्याच्या पाण्याची योजना आता कार्यान्वित होत आहे. तीन नवीन प्राथमिक शाळा उघडण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायतीची नवी इमारत उभी राहत आहे. धरणाखाली जाणाऱ्या ग्रामदेवता नव्या सुंदर देवालयात स्थानापन्न होत आहेत. शिवाय साठ एकर उसाच्या लागवडीची योजना आणि साडेतीन लाखाचा लघुउद्योग कागद प्रकल्प याच भूमीवर उभा राहाणार आहे. गावकऱ्यांची मनं एकाच आशेनं आणि विश्वासानं त्यांनी जोडली आहेत हे आम्ही डोळ्यांनी पाहिलं.

राजाराम शिंदे यांची ही धडपड निवडणुकीसाठी तर नाहीना असा प्रश्न कुणाच्याही मनात येणं स्वाभाविक आहे. परंतु या प्रश्नाचं संपूर्ण नकारार्थी उत्तर त्यांनी केव्हाच देऊन टाकलं आहे. त्यांची ही धडपड आहे मनाच्या समाधानासाठी आणि मायभूमीचे थोडेबहुत पांग फेडण्यासाठी.

# मेंदू बदलला तरीही....

श्रीधर रघुनाथ दीक्षित

मुंबई येथील एम. जे. हॉस्पिटल...

ऑपरेशन चालूच...

सोमवार, दिनांक ९ जानेवारी, २०१०. सायंकाळचे सहा वाजलेले.

ऑपरेशन थिएटरने सिग्नल दिला. दार उघडले. डॉ. रामस्वामी बाहेर पडले.

त्यांना बघणाऱ्यांची उत्सुकता पराकोटीस पोचली होतीच. आता ते काय सांगतात ते ऐकायला प्रत्येकजण पुढे सरसावत होता

डॉ. रामस्वामींनी हातरुमाल काढला. कपाळावरील घर्मबिंदु पुसले आणि म्हटले, " OPeration Successful "

असे म्हणत असताना जग जिंकल्याचे भाव त्यांच्या मुद्रेवर पसरले होते.

" Congratulations Doctor ! आपणाला मिळालेल्या अभूतपूर्व प्रयोगातील असामान्य यशामुळे डॉक्टर, केवळ आपलीच नव्हे तर संपूर्ण भारतवर्षाची मान ह्या विश्वात उंचावली आहे...मी पुन्हा आपले अभिनंदन करतो ! " एक वार्ताहर उद्गारला.

" डॉक्टर, आपल्या पेशंटबद्दल, म्हणजे ज्याला आपण नुकताच नवीन मेंदू बसविलात, त्याच्या प्रकृतीविषयी, आपण काय सांगू इच्छिता ? " आता दुसऱ्या वार्ताहराने आपली लेखणी सरसावली.

" उत्तम ! निदान मला तरी पेशंटच्या प्रकृतीत चिंतेसारखे काहीच वाटत नाही. ऑपरेशन सफल झालेले आहे. पेशंट लवकरच म्हणजे सात आठ दिवसातच, हिंडूफिरू लागेल. " डॉक्टर म्हणाले.

यानंतर अनेक वार्ताहरांनी असंख्य प्रश्न विचारले. डॉ. रामस्वामींनी देखील प्रत्येक प्रश्नास समर्पक उत्तर दिले.

मुलाखत संपली. मुलाखत संपण्यापूर्वीच ती विलक्षण वार्ता साऱ्या मुंबईत पसरली. लवकरच, म्हणजे दोन तासांनी आकाशवाणीने ज्या वार्ता प्रसारीत केल्या त्यात ह्याच वार्तेला प्रमुख स्थान होते. वार्ता प्रसारीत झाली ती अशी :

आज मुंबई येथील एम्. जे. हॉस्पिटलमध्ये एक अभूतपूर्व ऑपरेशन करण्यात डॉ. रामस्वामी ह्यांना असामान्य यश मिळाले, ही बातमी ऐकून राष्ट्रपती तसेच प्रधानमंत्री ह्यांनी डॉ. रामस्वामींना अभिनंदनपर तारा केलेल्या आहेत. डॉ. रामस्वामींनी काही तासांपूर्वी अपघातात मृत झालेल्या पी. कृष्णमूर्ती ह्यांचा मेंदू, मेंदूच्या विकाराने मृत्यूच्या दारात घोटाळणाऱ्या जे. सुंदरम ह्यांना यशस्वीरीत्या बसविला. वृत्तपत्र वार्ताहराच्या एका प्रश्नास उत्तर देताना ते म्हणाले, रूग्णाची प्रकृती उत्तम आहे. संपूर्ण विश्वात अशा प्रकारचे हे प्रथम तसेच सफल ऑपरेशन असल्यामुळे सर्वत्र आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

वरील वार्तेमुळे साऱ्या भारताला खरोखरच आश्चर्याचा गोड धक्का बसला.

डॉ. रामस्वामींची अवस्था तर विचारूच नका ! त्यांना असंख्य ट्रंककॉल्स, टेलिग्रॅम्स, टेलिफोन येऊ लागले. तसेच प्रत्यक्ष भेट देऊन अभिनंदन करणाऱ्यांनी अक्षरशः गोड वैताग आणला.

डॉ. रामस्वामींच्या चाहत्यांनी तार विभागाचा इतका उपयोग करण्यास सुरुवात केली की, वार्ता प्रसृत झाल्यानंतर अवघ्या सहा तासांच्या आतच तार विभागाला विशेष स्टाफची व्यवस्था करावी लागली ! काही–नव्हे, जवळ जवळ सगळ्याच–दैनिकांनी तर तात्काळ विशेषांक काढून आपली तत्परता दृष्टोत्पत्तीस आणून दिली.

ही झाली भारतातील प्रतिक्रिया.

आकाशवाणीवरून प्रसृत झालेली ती वार्ता विश्वाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात पोचली होती. असे काही होईल, इतक्या नजिकच्या काळात आणि त्यातही भारतात, याची कोणत्याच देशाने कल्पना देखील केलेली नव्हती.

अमेरिका आणि रशियाने अभिनंदनपर संदेश पाठविण्यात तत्परता दाखविली होती. इतर राष्ट्रांनी संदेश द्यायला सुरुवात केली होती.

उर्वरित पाकिस्तानचे संबंध गेल्या तीस वर्षांत चांगले झाले होते. परंतु पूर्व पाकिस्तान स्वतंत्र करण्यात भारताने घेतलेला पुढाकार, मध्यंतरी भारताने स्वतःच्या सामर्थ्यावर उडविलेली रॉकेट्स, इ. अनेक कारणांमुळे कोणते तरी दुखणे ठसठसत होते एवढे मात्र खास ! कारण पाकिस्तानचे मुखपत्र समजल्या जाणाऱ्या एका दैनिकाने संपादकीयात जे भय व्यक्त केले होते ते बोलके होते–

राष्ट्रा-राष्ट्रात उडणारे संघर्ष, त्यानंतर

होणारी तहांची बोलणी आता घातक स्वरूपाची असतील. कारण अशावेळी एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्र-प्रमुखाचा स्वतःचा मेंदूच काढून नवीन बसविला तर मोठाच हाहाकार माजेल...

विश्वातील सगळ्याच दैनिकांनी या वार्तेला प्राधान्य दिले. प्रमुख तसेच अन्य दैनिकांनी संपादकीये प्रसिद्ध केली. काहींनी मानवास मिळालेल्या या भरघोस यशाची मुक्तकंठाने स्तुती केली आणि काहींनी तर आता ईश्वरापेक्षा मानवच श्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन केले.

अर्थात काही दैनिकांचा पाकिस्तानी दैनिकाप्रमाणे रडका सूर होताच. आता भविष्य अंधःकारमय असेल, विश्वात अविश्वास वाढणार, अराजकता वाढणार, डॉक्टरवर्गाचे नैतिक पतन अटळ आहे. या प्रयोगाने मानवाधिकारांनाच धोका निर्माण झाला आहे, इ. इ. विचार मांडले होते.

एका अमेरिकन संपादकाने तर भारताचे तसेच डॉ. रामस्वामींचे कौतुक केले होते. त्याने म्हटले होते, "आम्ही अमेरिकन स्वतःस विज्ञानात पुढारलेले म्हणवतो. परंतु गेल्या शतकातील १९६७ मधील आफ्रिकेतील हृदयारोपणाचा प्रथम सफल प्रयोग आणि आता या शतकातील भारतातील मेंदू आरोपण्याचा हा प्रथम सफल प्रयोग; हे दोन्ही प्रयोग काय दर्शवितात?... आमच्या डॉक्टरांना हे दोन्ही बहुमान मिळू शकले नाहीत. ही बाब काय दर्शविते?...'

देश विदेशात ह्या अशा उलट सुलट प्रतिक्रिया व्यक्त होत असतानाच आकाशवाणी, नवा मेंदू आरोपित झालेल्या जे. सुंदरमची इत्थंभूत माहिती दररोज, नियमितपणे प्रसृत करीत होती...

गेल्या दहा दिवसात जे. सुंदरमने बरीच प्रगती केली होती. तो हळूहळू हिंडायला लागला होता. परंतु जे सुंदरमध्ये एक बदल होत तसल्याचे डॉ. रामस्वामींच्या निदर्शनास आले होते. डॉ. रामस्वामी जेव्हा जेव्हा जे. सुंदरमला गेल्या २।३ दिवसात भेटावयास गेले तेव्हा तेव्हा त्यांना बघून जे. सुंदरमने आपले दात ओठ आवळून घेतले होते... तो डॉक्टरांकडे विचित्र नजरेने पाहत असे. जणू काय ते त्याचे जन्मजात शत्रूच! एरव्ही तो शांत असे.

परंतु ही बाब तितकीशी महत्त्वपूर्ण नाही असे विचार डॉ. रामस्वामींनी व्यक्त केले होते...

एक एक दिवस जात होता.

आणि अखेरीस तो दिवस उजाडला—

३१ जानेवारी...

३१ जानेवारी २०१० ची ती वार्ता आकाशवाणीने साऱ्या विश्वाला ऐकविली मात्र, विश्वाचे सारे व्यापार क्षणमात्र बंद पडले—

ऑपरेशन होऊन नुकतेच तीन आठवडे झाले होते. आकाशवाणीने जी वार्ता प्रसारीत केली तिचा सारांश थोडक्यात असा :

दिनांक ३१ जानेवारी रोजी सकाळी सात वाजता डॉक्टर रामस्वामींची कार हॉस्पिटलच्या आवारात शिरताना जे. सुंदरमने पाहिली. तो झपाटल्यागत चवथ्या मजल्यावरून खाली उतरून बाहेर पडला. सरळ डॉक्टरांवर चाल केली नि कोठूनतरी मिळविलेले रिवॉल्वर त्यांच्यावर रोखले. डॉक्टरांना वाचवण्याच्या प्रयत्नात इतरांची जे. सुंदरमशी जी झटापट झाली तीत रिवॉल्वरची गोळी सुटून जे. सुंदरमला लागली व त्याच गोळीने जे. सुंदरमचा बळी घेतला.

हे असे का व्हावे?

डॉ. रामस्वामींचा खून करण्याइतका तिरस्कार जे. सुंदरमला का म्हणून वाटावा? ह्या प्रश्नाचे संभाव्य उत्तर, डॉ. रामस्वामींनी जे निवेदन केले त्यातच होते. डॉ. रामस्वामींनी जें विश्लेषण केले तेही आकाशवाणीने प्रसारीत केले होते. ते थोडक्यात असे :

जे. सुंदरमला पी. कृष्णमूर्ती यांचा मेंदू बसविला होता. पी. कृष्णमूर्ती आणि डॉ. रामस्वामी बालपणी एकाच गावात राहिलेले होते. पी. कृष्णमूर्ती खरे तर खूप शिकून ज्ञान मिळवणार होता. त्यालाही डॉक्टर व्हायचे होते. एकदा असेच एका प्रश्नावरून दोघांमध्ये भांडण झाले होते. त्यातही अखेरीस हाच विषय ओढला गेला होता, डॉक्टर होण्याचा! रामस्वामींनी त्या वेळी निव्वळ पी. कृष्णमूर्तीस चिडवण्याच्या उद्देशा 'तू आयुष्यात कधीच डॉक्टर होऊ शकणार नाहीस...तुझी ती योग्यताच नाही' असेच काहीसे म्हटले होते. परंतु त्यामुळे पी. कृष्णमूर्ती अतिशय क्रुद्ध झाला होता. 'योग्या योग्यता बाजूस ठेवून दे...मी म्हणतो तसा मी डॉक्टर झालो नाही नि तू डॉक्टर झालास तर हे ज्या दिवशी मला समजून येईल त्या दिवशी एक तर या जगातून तू गेलेला असशील नाही तर मी तरी...' आणि खरोखरच काही वर्षांनी नियतीचे फासे असे काही विचित्र पडले होते की, जे सुंदरमला पी. कृष्णमूर्तीचा मेंदू आरोपित केल्या नंतरही डॉ. रामस्वामींना कळलेले नव्हते की, पी. कृष्णमूर्ती समवयस्क, समकालीन असा त्यांचाच एक विद्यार्थीमित्र होता आणि केवळ त्याच्या प्रयत्नांना यश न लाभल्याने तो डॉक्टर होऊ शकला नव्हता... त्याने— त्याच्या मेंदूने अखेरीस त्याचे शब्द खरे केले होते! तो डॉक्टरांवर तुटून पडला होता... ह्या बातमीने संपूर्ण विश्वाला पुन्हा एक धक्का बसला, जबरदस्त!

□ □


महाराष्ट्र राज्य ग्रंथ-पारितोषिक मिळवणारे
आमचें एक विशेष प्रकाशन

डॉ. सुधीर फडके

**कोठे आणि कधीतरी**

किमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन

# परसूच्या पशुकथा

वसंत सबनीस

## कथा तिसरी : बळी

आता ज्या कुत्र्याची मी गोष्ट सांगणार आहे त्या कुत्र्याची विशिष्ट जात तुम्हाला लक्षात घेतली पाहिजे. त्याची जात अनेक जातींच्या संकरापासून पैदा झालेली आहे. तथापी इतक्या जातींचे सर्व गुणधर्म त्यांच्यात उतरले नाहीत. पण एक वैशिष्टचपूर्ण जात मात्र निर्माण झाली आहे. कुत्र्याच्या वंशाचे मूळ कोल्ह्यापर्यंत जाते आणि बळीच्या अंगात त्याच्या मूळ वंशाचे गुण मधूनमधून दिसून येत असत. कुत्रा हा इमानी प्राणी खरा, पण बळीची जातच वेगळी.

बळी नक्की केव्हा जन्मला हे मला माहीत नाही, पण त्याच्या लहानपणापासून तो मेंढ्यांत वाढला. एका अनुभवी धनगराने त्याला मेंढ्यांच्या कळपावर देखरेख करण्याचे शिक्षण दिले. लहानपणापासूनच त्याला हे शिक्षण मिळाल्यामुळे तो दोन वर्षांचा होईपर्यंत या कामात तरबेज झाला. बळी दोन वर्षांचा झाला, तेव्हा तो चांगलाच थोराड दिसू लागला होता. त्याला मेंढ्यांचे संपूर्ण ज्ञान मिळाले होते. त्यांच्या हालचाली, सवयी इत्यादी गोष्टीत तो पारंगत झाला होता आणि म्हणूनच त्याचा मालक– म्हातारा राजन– रात्री खुशाल घरी जाऊन झोपत असे आणि बळी एखाद्या डोंगराच्या कपारीत मेंढ्यांचा कळप सांभाळीत जागत असे. राजन झोपलेला नसे तेव्हा नेहमी पिऊन तर्र असे; तरी पण बळीने कामात कधीही कुचराई केली नाही.

राजनखेरीज जगात दुसरे काही मोठे आहे असे त्याला कधीच वाटले नाही. राजनचा हुकूम म्हणजे ब्रह्मवाक्य. राजन देईल तो हुकूम तावडतोब पाळणे एवढेच त्याचे जीवित कार्य झाले होते.राजन तरी स्वतः मोठा शेतकरी होता असेही नाही. तोही एका मेंढ्यांच्या व्यापाऱ्याचा नोकरच होता.

एकदा राजनच्या मालकाने त्याला मेंढ्या घेऊन दूर शहरातल्या बाजारात जाण्यास सांगितले. मुक्काम करीत करीत राजन, बळी आणि मेंढ्यांचा कळप मार्ग आक्रमू लागले. हा ताफा एका नदीच्या तीरावर येऊन ठेपला. सर्व मेंढ्या नावेत घालून नदीपार नेण्यात आल्या. पलीकडे असंख्य कारखान्यांची धुराडी आकाशात धूर ओकीत होती. धूर इतका वाढला की, आकाश अभ्राच्छादित झाल्यासारखे वाटले. नदीवरून येणारा गार वारा आणि अंधारलेले आभाळ यामुळे वादळाच्या चिन्हाचा भास होत होता. या प्रकाराने मेंढ्या बावरल्या आणि चेंगराचेंगरी करीत मिळेल त्या वाटेने धावत सुटल्या. ३७४ मेंढ्या उधळल्यानंतर त्यांना आवरणे केवळ अशक्य होते. राजन चांगलाच हादरला. क्षणभर त्याने उधळलेल्या मेंढ्यांकडे हताशपणे नजर टाकली आणि बळीला हुकूम दिला, 'बळी, त्यांना परत आण.'

हुकूम मिळायचाच अवकाश, बळी एखाद्या सरदारासारखा तिथून निघाला. दाही दिशा धुंडाळून त्याने सगळ्या मेंढ्या हाकारून परत आणल्या. धावत जायचे आणि चार-पाच मेंढ्यांच्या मागे भुंकत भुंकत त्यांना राजनपाशी आणून सोडावयाचे असा त्याचा कार्यक्रम एक तासभर चालू होता. शेवटी बळीनेच सर्व मेंढ्या आल्याचे राजनच्या पायाला अंग घासून जाहीर केले. म्हातारा राजन् मेंढ्या मोजू लागला, ३७०, ३७१, ३७२ आणि ३७३. एक मेंढी कमी भरली.

बळी, एक मेंढी कमी आहे. जा, आण जा तिला. बळीने एकदा सबंध कळपाकडे दृष्टी टाकली आणि एखाद्या चेंडूसारखा तो तेथून पळाला. बळी थोड्या अंतरावर गेला नसेल तोच तेथे खेळणाऱ्या एका मुलाने राजनचे गणित कच्चे असल्याचे दाखवून दिले आणि त्या मेंढ्यांची संख्या ३७४ असल्याचे सांगितले. राजनने पुन्हा पहिल्यापासून मेंढ्या मोजल्या. खरोखरच त्या ३७४ होत्या. तो पेचात सापडला. त्याला तावडतोब पुढे जायला हवे होते, कारण आता बळीला एक मेंढी आणायचा हुकूम दिला होता. बळी कोठूनही –मग चोरी करावी लागली तरी हरकत नाही–एक मेंढी घेऊन आल्याशिवाय राहणार नाही हेही त्याला पक्के माहीत होते. आता काय करायचे ? बळीसाठी थांबावे तर तो केव्हा परत येईल हे काही सांगता येत नव्हते. आणि समजा, तो आला आणि त्याने एखादी मेंढी चोरून आणली तर पुन्हा भांडाभांडीचा प्रसंग उद्भवणार ! हे सर्व राजनला दिसत होते. तेव्हा त्याने बळीला सोडून जाण्याचे ठरविले आणि मेंढ्या घेऊन तो निघून गेला.

दरम्यानच्या काळात, बळी दिवसभर चुकलेली मेंढी शोधीत होता. दिवस मावळला, रात्र पडली तरी त्याचा शोध चालूच होता. अखेरीस उजाडता उजाडता तो दमून-भागून धापा टाकीत नदीकाठी आला, पण त्याचा मालक नाहीसा झाला होता. हे अनपेक्षित होते. आजूबाजूला सगळीकडे हुंगून पाहिले, पण मालकाचा पत्ता नव्हता. तो नावेतून पलीकडे गेला. तिकडे त्याने मालकाचा शोध केला; पुनः अलीकडे आला; अशा त्याने १०–२० फेऱ्या मारल्या. पण व्यर्थ ! नावेतून उतरणाऱ्या प्रत्येक माणसाला त्याने हुंगून पाहिले. दुसरे दिवशी तो पुनः त्याच जागी उभा राहिला. नावेतून उतरणाऱ्या प्रत्येक उतारूचे पाय हुंगण्याचा त्याचा कार्यक्रम पुनः सुरू झाला. ती नाव दिवसातून सुमारे ५० फेऱ्या मारीत असे आणि प्रत्येक वेळी सुमारे १०० उतारू आणीत असे, पण त्या सर्व उतारूंना हुंगण्याचे बळीचे काम अविश्रांतपणे चालूच होते. असे चार दिवस गेले–चार आठवडे गेले, बळीचा उपक्रम थांबला नाही. कोणी काही खायला दिले तर तो घेत नसे. एकदम अंगावर धावून जात असे. तो काय

खात असे हे कधीच कोणाला कळले नाही, पण चार आठवड्यात तो अतिशय कृश झाला होता. नंतर मात्र तो थोडा शांत झाला. त्याने उतारू हुंगण्याचा आपला उद्योग बंद केला नव्हता, तरी कोणी काही खायला टाकल्यास त्याचा तो स्वीकार करीत असे. अशा रीतीने दिवस, आठवडे, महिने लोटले तरी हरवलेल्या मालकाचा शोध करण्याचे काम त्याने सोडले नाही.

त्यानंतर सुमारे १४ महिन्यांनी मी त्याला प्रथम पाहिले. त्यावेळी तो आपल्या कर्तव्यात मग्न होता. मी त्याच्याशी दोस्ती करण्याचा प्रयत्न केला, पण एकदा माझे पाय हुंगल्यावर ते आपल्या मालकाचे नाहीत याची त्याला खात्री पटली, तेव्हा माझ्या प्रयत्नास न जुमानता त्याने माझ्याकडे विशेष लक्ष दिले नाही. त्यानंतर १० महिने मी त्याचे प्रेम संपादन करण्याची पराकाष्ठा केली, पण अखेरपर्यंत तो माझ्याशी परकेपणानेच वागला.

पुरेपूर दोन वर्षे तो त्या नदीकाठी नावेतून उतरणाऱ्या प्रत्येक उतारूला हुंगण्याचे काम करीत होता. मधून मधून तो नावेत शिरून पलीकडेही जात असे. अशा रीतीने त्याने नावेचे कितीतरी पैसे बुडविले होते; पण त्याला त्याची पर्वा नव्हती. त्याचे ध्येय एकच होते आणि ते म्हणजे राजन येईपर्यंत तेथे थांबणे !

राजनचे काय झाले हे आम्हाला कधीच कळले नाही. पण एके दिवशी एक तगडा इसम नावेतून उतरला आणि बळीने नेहमीप्रमाणे त्याच्या पायाचा वास घेतला, पण यावेळी तो वास घेऊन बाजूला झाला नाही. त्याच्या मानेचे केस ताठ झाले. तो हलक्या आवाजात गुरगुरला आणि त्या इसमाच्या रोखाने जाऊ लागला. आजूबाजूच्या लोकांना वाटले की, बळी त्या इसमाच्या अंगावर धावून जाणार. त्याप्रमाणे त्यांनी त्याला तसा इषाराही दिला. पण बळीची वृत्ती एकदम पालटली. तो त्या इसमाच्या अगदी जवळ गेला आणि लाडिकपणे शेपटी हालवू लागला. गेल्या दोन वर्षात त्याची शेपटी अशी हालल्याचे कधी दिसले नव्हते.

पण थोड्याच वेळात सर्व गोष्टींचा खुलासा झाला. त्या इसमाचे नाव देवळे असे होते आणि त्याचा व राजनचा दाट परिचय होता. इतकेच नव्हे तर त्याच्या अंगावर असलेला कोट एकेकाळी राजनच्या मालकीचा होता. बळीने ही गोष्ट जाणली आणि आपल्या मालकाकडे पोचण्याच्या दृष्टीने देवळेच्या मागे जाणे इष्ट वाटल्यावरून त्याने नदीकाठची आपली जागा सोडून तो देवळेच्या मागे निघाला. देवळेनेही त्याला आपल्याबरोबर येऊ दिले. देवळेच्या घरी गेल्यावर बळीला पुनः पूर्वीचे म्हणजे मेंढ्या राखण्याचे काम मिळाले. पुनः तो कर्तव्यदक्षतेने मेंढ्यांचे कळप रानात नेऊ लागला आणि परत आणू लागला.

देवळेच्या घराच्या खालच्या बाजूला एक मोठे थोरले खोरे पसरले होते. तेथे जवळच देवळेची छोटी जमीन होती आणि मोठा थोरला मेंढ्यांचा कळप होता. बळी पूर्वीच्याच प्रामाणिकपणाने तेथे कळपावर राखण करीत असे, आणि संध्याकाळी कळप मेंढवाड्यात आणून सोडीत असे. पण आता त्यांच्यामध्ये एकच फरक झाला होता. आणि तो म्हणजे त्याला तिऱ्हाईताचा वारा मुळीच सहन होत नसे. अनोळखी माणूस दिसला की तो लगेच त्याच्यावर झडप घालण्यास ती तयार असे. तथापी मेंढ्या पाळण्याचे काम मात्र चोखपणे बजावीत असे. त्यावर्षी देवळेच्या कळपातील एकही मेंढी कधी हरवली नाही. त्याच्या शेजारच्या शेतकऱ्यांच्या मात्र अनेक मेंढ्या कोल्ह्यांनी मारल्या.

खोऱ्याच्या प्रदेशात डोंगरामुळे चढ-उतार आणि मोठमोठे खडक असल्यामुळे तेथे कोल्ह्यांची शिकार करणे फार अवघड होते. तसे पाहिले तर तेथे आधी कोल्ह्यांचे प्रमाण फार कमी होते. पण अलीकडे एक अत्यंत चतुर कोल्हा एका झुडपाच्या मागे बीळ करून राहिला होता. अनेक शिकाऱ्यांनी आणि शिकारी कुत्र्यांनी त्याचा पाठलाग केला पण तो सर्वांना पुरून उरला होता.

एकदा तर तो दोन मोठ्या खडकांच्या फटीमध्ये लपून बसला असताना एका शिकारी कुत्र्याने जंग जंग पछाडले, इतकेच नव्हे तर त्याने जवळजवळ त्याला पकडलेही पण त्यांतूनही तो सुटला आणि त्याला धरणारा कुत्रा मात्र पिसाळला; पण तेव्हापासून त्या भागातील लोकांची अशी समजूत झाली की, या कोल्ह्याला एखाद्या भुताचे संरक्षण असावे अतिमानवी शक्तीचे पाठबळ मिळालेला हा कोल्हा मारणे केवळ अशक्यप्राय आहे अशी लोकांची दृढ समजूत झाली.

मेंढ्यांवर धाड घालायची, बेधडकपणे मेंढ्यांच्या कळपात घुसायचे आणि जिवानिशी सुटून पळायचे हा त्याचा नित्यक्रम होऊन बसला होता. पुढे पुढे इतर कोल्ह्यांप्रमाणेच तो केवळ रक्तपानाची हौस भागविण्यासाठी मेंढ्या फाडून टाकू लागला. एका शेतकऱ्याच्या एका रात्रीत दहा मेंढ्या मारल्या गेल्या, तर दुसऱ्या रात्री दुसऱ्या एकाच्या दहा मेंढ्यांचा मुडदा पडला आणि अशा रीतीने रोज कुणाच्या तरी मेंढ्या मारल्या गेल्याच्या बातम्या कानावर येऊ लागल्या ! कुणाची कोंकरे मेली, कुणाच्या मेंढ्या मारल्या गेल्या, इतकेच नव्हे तर एकदोन शेतकऱ्यांची लहान वासरे मारली गेल्याचीही तक्रार कानावर आली.

अर्थात् या विनाशाचे कर्तेपण त्या भुताच्या कोल्ह्याकडे होते. त्याच्या पावलाच्या खुणावरून तो एक मोठा कोल्हा होता या पलीकडे त्याच्याबद्दल कोणाला विशेष माहिती नव्हती. कोणालाही तो स्पष्टपणे कधी दिसला नाही. त्यामुळे त्याच्याबद्दलची ऐकीव माहितीच सर्वांना ठाऊक होती. पण एवढे मात्र खरे की, त्या भागांतील दोन प्रसिद्ध शिकारी कुत्र्यांना त्याच्या मागावर सोडले तेव्हा ते दोन्ही कुत्रे परत फिरले. त्यांनी माग काढण्याचे नाकारले, इतकी त्यांना दहशत बसली असावी.

सर्व उपाय थकले, तेव्हा त्या भागांतील शेतकऱ्यांनी कडक थंडी पडल्यावर या कोल्ह्याचा नक्षा उतरविण्याचे ठरविले. तथापि सैतानी कोल्ह्याचा मेंढ्या मारण्याचा उपक्रम अव्याहत चालू राहिला. पण त्याचबरोबर त्याने आपली शिकारीची पद्धत मात्र सोडली नाही. तो कधीही लागोपाठ दोन तीन दिवस एकाच शेतावर गेला नाही. जेथे मेंढ्या मारल्या असतील तेथे त्याने त्या कधीही खाल्ल्या नाहीत आणि त्याने कधीही आपला मागमूस लागेल अशा खुणा मागे ठेवल्या नाहीत. मी त्याला एकदाच पाहिले. रात्रीच्या वेळी मी त्या भागातून जात असतांना दोन तेजस्वी डोळे असे काही चकाकले की, मी भेदरलो. मुकाट्याने काढता पाय घेऊन निघून गेलो. तो भास असावा असे मला वाटत होते. पण जवळच्या मेंढवाड्यांतील २३

कोंकरे मेल्याची बातमी सकाळी कानावर आली. तो भास नव्हता याची खात्री पटली.

पण या सैतानी कोल्ह्याचा उपद्रव न पोचलेला असा एकच शेतकरी होता आणि तो म्हणजे बळीचा मालक देवळे. ज्या ठिकाणी कोल्ह्याने धुमाकूळ घातला होता त्या भागाच्या मध्यावर तो राहत असूनहि त्याची एकही मेंढी कधी त्या कोल्ह्याने मारली नाही याचे सारे श्रेय जो तो बळीला देत होता. बळी नियमितपणे सर्व मेंढ्या चरायला नेत असे आणि परत आणून सोडीत असे. कधी एकही मेंढी हरवली नाही किंवा कोल्ह्याने मारली नाही. बळीच्या धाकाने, धडा-डीने तो कोल्हा कधी देवळेच्या मेंढ्याकडे फिरकला नाही. बळीच्या कर्तबगारीची कीर्ति आजूबाजूला पसरली. त्याच्याबद्दल सर्वांना आदर वाटू लागला. तो कदाचित् सर्वांचा लाडका झाला असता, पण त्याच्या परस्थ वृत्तीमुळे कोणी त्याच्याजवळ जात नसे. देवळे, त्याची मोठी मुलगी हरणी आणि मेंढ्यांचा कळप एवढेच त्याचे विश्व होते. या पलीकडे तो कोणालाही ओळखण्यास तयार नव्हता. सारे जग त्याच्या दृष्टीने परके होते. त्यामुळे कोणी त्याला माया लावण्याचा प्रयत्न केला, तरी तो कोणाला बधला नाही. त्यामुळे कोणाला तो ओळखत नव्हता आणि कोणी त्याच्याजवळ जाण्यास धजत नव्हते !


इतरांना भयानक वाटणारा बळी देवळेशी वागताना अत्यंत मवाळपणे वागत असे. मेंढ्यांशीही तो प्रेमळपणाने वागत असे. पळता पळता पाण्याच्या डबक्यात पडलेली अनेक कोकरे बळीने वाचविली. नाहीतर ती मेलीच असती. त्याने आपल्या तीक्ष्ण नजरेने कळपावर धिरट्या घालणारी गिधाडे हेरून त्यांचा पाठलाग केला होता.

खोऱ्यातील शेतकरी अजूनही सैतानी कोल्ह्याला खंडणी देतच होते. अखेरीस डिसेंबर महिन्याच्या शेवटी शेवटी बर्फ पडू लागले. तशातच एका रात्री एका विधवा स्त्रीचा २० मेंढ्यांचा सबंध कळप सैतानी कोल्ह्याने फाडून टाकला; त्यामुळे सर्वजण चवताळले आणि दुसरे दिवशी सकाळी हातात बंदुका घेऊन कोल्ह्याच्या मागावर निघाले. काही झाले तरी त्या सैतानाचा आज निकाल लावायचाच असा त्यांचा निर्धार होता. बर्फावर उमटलेली पावले त्याचीच होती. पावलाच्या अनुरोधाने सर्वजण निघाले. नदीच्या पात्रापर्यंत पावलांच्या खुणा स्पष्ट दिसत होत्या. त्याचा अर्थ स्पष्ट होता. तो धूर्त प्राणी त्या ठिकाणी नदीच्या पात्रात शिरला होता आणि आपला माग लागू नये म्हणून त्याने ही युक्ती केली होती. तो पाण्यातून कोठे बाहेर पडला हे पाहण्यासाठी सर्वजण नदीकांठाने वरच्या बाजूस निघाले. सुमारे पाव मैलावर तो नदीच्या पात्रातून बाहेर पडला होता. तेथून पुन्हा त्याच्या पावलाचा मागोवा घेण्यास सुरुवात झाली. ते पावलांचे ठसे एका मेंढवाड्याकडे गेलेले दिसले. पुढे त्या धूर्त प्राण्याने माणसाच्या पावलाच्या ठशावर पावले टाकल्याचे आढळून आले. या खुणा देवळेच्या मेंढवाड्याच्या दिशेने गेल्याचे दिसून आले. देवळेच्या मेंढवाड्याच्या दारातच बळी बसला होता. परके लोक दिसल्या-बरोबर त्याने गुरगुरायला सुरुवात केली. कोणीही पुढे जाण्यास धजावले नाही आणि कोल्ह्याचा माग काढण्याचे काम तसेच अपुरे टेवावे लागले. थोड्या वेळाने बळी दारातून उठला आणि मेंढ-वाड्यात गेला. त्याबरोबर मागे राहिलेल्या एक-दोन शेतकऱ्यांनी कोल्ह्याची पावले पाहण्यासाठी मेंढवाड्याच्या दारापर्यंत चक्कर मारली. तेथे कोल्ह्याच्या पावलाचे ठसे नव्हते. बळीच्या पावलाचे होते. ते इसम तेथेच दिङ्मूढ होऊन उभे राहिले.

नंतर देवेळेची आणि त्या शेतकऱ्यांची कडाक्याची चर्चा झाली. ती चर्चा कशासंबंधी होती हे कळले नाही, पण 'तुम्हाला बळीचा मत्सर वाटतो. बळीसारखा कुत्रा सबंध दुनियेत मिळायचा नाही' असे देवळे बोलल्याचे ऐकू आले. या चर्चेत कोण काय बोलले हे कळले नाही तरी एवढे मात्र खरे की, त्या दिवशी रात्री देवळेची मुलगी हरणा बळी ज्या खोलीत–म्हणजे स्वयंपाकघरात–झोपत असे तेथे झोपली.

रात्र झाली. हरणा चौपाईवर आडवी झाली आणि बळी आपल्या नेहमीच्या जागी म्हणजे चौपाईखाली झोपला. रात्र चढत चालली तसा बळी अस्वस्थ होऊ लागला. तो एक–दोनदा उठला. हरणाकडे त्याने पाहिले आणि पुन्हा आपल्या जागेवर जाऊन बसला. सुमारे दोन वाजता त्याला तेथे पडून राहणे अशक्य झाले. तो तेथून उठला. एकदा त्याने खिडकीकडे पाहिले. नंतर चौपाईवर निश्चलपणे पडलेल्या हरणाकडे पाहिले. ती तशीच पडून राहिली होती. आणि झोपेत असल्याप्रमाणे श्वासोच्छ्वास करीत होती. बळी हळूहळू तिच्याजवळ आला आणि त्याने तिचे तोंड एकदा हुंगून पाहिले. तरी ती तशीच निश्चल होती. त्याने आपल्या नाकाने तिला हळूच स्पर्श केला. तरीही काही हालचाल नाही. एकदा मान वाकडी करून व कान उभारून त्याने तिच्या चेहेऱ्याचे निरीक्षण केले, पण ती शांतपणे झोपली आहे अशी त्याची खात्री पटली. तो हळूच खिडकीकडे चालत गेला. एवढासाही आवाज न करता तो वर चढला आणि खिडकीच्या झडपात तोंड खुपसून ते झडप त्याने वर उचलले. ते पुरेसे उंच उचलले गेल्याबरोबर आपले पुढचे पाय त्याने त्यातून बाहेर काढले आणि अत्यंत सफाईने तो खिडकीतून बाहेर पडला.

हरणा हे सर्व पाहात होती. ती उठून बसली. बळी गेला आहे याची खात्री झाल्यावर तिने खिडकी उघडून एकदा बाहेर डोकावून पाहिले, पण बळीचा काहीही पत्ता नव्हता. ताबडतोब आपल्या बापाला बोलवावे असे तिला वाटले, पण मग काय होते ते पाहावे



असा विचार करून तिने बापाला हाक मारण्याचा बेत बदलला आणि ती पुन्हा आपल्या जागेवर स्वस्थ पडून राहिली. बाहेर होणारे बारीक-सारीक आवाज तिचे कान टिपून घेत होते. इतक्या रात्री बळी काय करीत आहे याबद्दल निरनिराळ्या कल्पना करीत ती तेथे पडून राहिली.

अशा रीतीने दीड-दोन तास गेले असतील, तेवढ्यात तिला खिडकीचे झडप वाजल्याचा आवाज आला. थोड्याच वेळात ते झडप उघडले गेले आणि हलक्या पावलाने पुन्हा बळी आत आला व झडप बंद झाले.

बाजूलाच जळत असलेल्या शेगडीच्या क्षीण प्रकाशातही तिला बळीच्या डोळ्यातील क्रौर्याची चमक जाणवल्याशिवाय राहिली नाही. त्याचे तोंड आणि छातीचा भाग रक्ताने माखला होता. त्याने आपली धाप आवरून पुन्हा एकदा हरणाचे बारकाईने निरीक्षण केले. पण तिने मुळीच हालचाल केली नाही, तेव्हा तो शांतपणे खाली बसला आणि आपले पंजे व छातीच्या आजूबाजूचा भाग चाटू लागला.

हरणाने हे पाहिल्याबरोबर ती थरारली. ज्या सैतानी कोल्ह्याच्या नावाने सर्व शेतकरी बोटे मोडीत होते तो कोल्हा दुसरा-तिसरा कोणी नसून बळीच आहे याची तिला खात्री पटली! आणि आदल्याच दिवशी आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी तिच्या बापापुढे व्यक्त केलेली शंका खरी होती हेही तिला कळून चुकले! त्या गोष्टीचा पडताळा पाहण्यासाठीच ती आज बळीच्या खोलीत झोपली होती. तिचा संताप अनावर झाला; ती ताडकन उठली आणि हाताशी आलेले लाकूड बळीवर भिरकावून म्हणाली, 'चांडाळा, तूच साऱ्या मेंढ्या मारल्यास ना? विश्वासघातकी! नीच' लाकूड बळीला निसटते लागून गेले. बळी एकदम अंगाची गठडी करून पडून राहिला.

बंद खिडकीकडे एक दृष्टिक्षेप टाकून तो स्वस्थ बसला. त्याचे डोळे चकाकले आणि बसल्या जागेवरून सरपटत-सरपटत हरणाचे जणू काय पाय चाटण्यासाठी पुढे सरकला. झाल्या कृत्याचा पश्चात्ताप व्यक्त करून त्याला हरणाची क्षमा मागायची होती असेच कुणालाही वाटले असते. तिच्या पायाजवळ येताच एखाद्या खवळलेल्या वाघासारखी त्याने तिच्या नरड्यावर झेप घेतली. ती बेसावध होती, पण चपळाईने तिने आपले दोन्ही हात पुढे घतले आणि बळीने त्वषाने तिच्या हाताचा लचका तोडला. त्याचे तीक्ष्ण दात तिच्या मांसल हातात घुसून बसले. तसा बळी वजनाने हलका होता. तिने त्याला जोराने झटकले आणि आपल्या बापाला जोरजोराने हाका मारल्या. पण आता बळीच्या मनातील हेतू स्पष्ट झाला होता. तो स्वतःला सावरून पुन्हा हरणावर झेप घेणार इतक्यात देवळे दारात आला. बळीचे हे उग्र स्वरूप पाहून तोही क्षणभर गोंधळून गेला, पण त्याला विचार करायला सवडच नव्हती. ज्या हातानी बळीला अन्न घातले होते त्या हरणाच्या हाताच्या त्याने चिंध्या केल्या होत्या. देवळे दारात दिसल्याबरोबर त्याने आपला मोर्चा त्याच्याकडे वळविला आणि त्याच त्वेषाने त्याने देवळेवर झेप घेतली. देवळेने त्याला हाताने एक-दोन दणके लगावले, पण बळी अधिकच बेभान झाला. शेवटी देवळेने जवळची लोखंडी सळई घेऊन बळीच्या डोक्यावर जोराचा प्रहार केल्यावर मात्र बळी धापा टाकीत लुळा-पांगळा होऊन जमिनीवर कोसळला! तरी त्याच्या डोळ्यातील उद्धटपणा गेला नव्हता, त्याची झुंजण्याची इच्छा मेली नव्हती. देवळेने चपळाईने आणखी एक जोराचा प्रहार केला आणि बळीचे डोके फुटून जमिनीवर त्याचा मेंदू पसरला. क्षण दोन क्षण त्याने तडफड केली आणि अखेरीस चलाख, भीषण, विश्वासू आणि तितकाच विश्वासघातकी बळी ताठ झाला आणि कायमचा निद्रिस्त झाला!! ❦❦

---




## वर्गणी

- 'चित्र, वार्ता पुस्तक' ही पुरवणी महिन्यातून दोनदा, साप्ताहिक माणूस व्यतिरिक्त प्रसिद्ध होईल.
- या पुरवणीची वार्षिक वर्गणी रुपये पंचवीस वेगळी पाठवावी.
- साप्ताहिक माणूस वर्गणीदारांसाठी पाक्षिक पुरवणी वर्गणीत वीस टक्के सवलत ठेवली आहे.
- म्हणजे साप्ताहिक माणूस वर्गणीदारांनी आपला वर्गणीक्रमांक कळवून फक्त वीस रुपये चित्र, वार्ता, पुस्तक पुरवणी वार्षिक वर्गणीप्रीत्यर्थ पाठवावेत.

—व्यवस्थापक

## : ७ :

त्या रात्री रानो, एखाद्या बहिणीसारखी, पत्नीसारखी आणि आईसारखी मंगलची सेवा करीत होती. त्याचे घाव शेकून काढीत होती. बाहेर जाणं तिला शक्य नव्हतं. म्हणून ती आपल्या दुपट्टयाच्या पदराचं टोक तोंडात धरून आपल्या ऊऊन श्वासांनी ते गरम करीत होती आणि त्याच्या वाफाऱ्यानं मंगलचं अंग शेकून काढीत होती. त्या शेकण्यानं त्याला बरं वाटत होतं. पण कधी कधी ठणका असह्य झाला म्हणजे मधूनच तो मोठ्यानं कण्हत असे. कधी हा ठणका, नकळत एका विलक्षण संवेदनेत विरून जाई, जिरून जाई, तेव्हाचा रानोच्या हाताचा स्पर्श मंगलला काही वेगळा, अद्भुत भासत असे. तिच्या हातांचा मेंदीचा रंग त्या अंधारातही उजळून निघत होता, अन् त्याचा वास मनात भरत होता.

हेमंताच्या आणि वसंताच्या उंबऱ्यात फुलणाऱ्या आणि आपल्या सुगंधानं हृदयात वेदना आणि डोळ्यात अश्रू फुलवून, पानगळीत विरून जाणाऱ्या चिंचेच्या फुलांच्या, खट्टया मीठ्या पण मादक, गंधासारखा तो सुवास होता.

रानोला आपल्या मुलांचाही विसर पडला होता. ती कुठं आहेत, कशी झोपल्येत, त्यांनी काही खाल्लंय की नाही, कशाचं तिला भान नव्हतं. एकदा चुम्मुचा चेहरा अचानक तिच्या डोळ्यांसमोर येऊन उभा राहिला आणि पुन्हा तसाच आपोआप पुसला गेला. इथं आता जे घडत होतं ते चुम्मूपेक्षा कितीतरी मोठं, विशाल होतं. चुम्मू आणि त्याच्याबरोबरची अनेक लक्ष लक्ष बालकं या घटनेचा केवळ अंश मात्र होती, मधूनच मंगल



राजेंद्रसिंग बेदी

# रानो

**राजेंद्र सिंग बेदी यांच्या ‘ एक चादर मैली सी ’ या कादंबरीचा अनुवाद ( उत्तरार्ध )**
**अनुवादक : वा. रा. कान्त**

कण्हत कुशीवर वळे तेव्हा तिला रडू कोसळे आणि ती एका कोपऱ्यात हुंदके देत बसून राही. हे रडणं हे हुंदके सृजनकाळापूर्वी प्रत्येक स्त्रीच्या भाळी लिहिलेले असतात.

एका एकी तिला तहान लागली. परंतु खिडकी उघडून कुणाजवळ पाणी मागण्याचा तिला धीर झाला नाही. इतक्यात मंगल उठून बसला आणि अंधारात इकडं तिकडं पाहू लागला. उन्मादाचा झटका आल्यासारखं झालं त्याला. आपल्या सदऱ्याचा उरला सुरला भागही त्यानं फाडून टाकला.

'मेलेग ऽ माय' म्हणत रानो त्याच्या जवळ आली.

'चल, दूर हट' मंगलनं तिला धक्का दिला.

रात्र सरत आली होती. रानोनं त्याचे पाय धरले आणि त्यावर आपलं डोकं ठेवून, ती रडत म्हणाली, 'यात माझा काही काही दोष नाही रे, अन् हे तुलाही माहीत आहे.'

मंगलचा संताप आता ओसरला होता. तो हळूच म्हणाला, 'हो, मला माहीत आहे ते; आणि कोणत्या भावनेनं कुणास माहीत— त्यानं राणीचा हात धरला. अंधारात सारखं एकटक पाहात राहिल्या-मुळं, पानन्पान त्याला त्या काळोखात दिसत होतं; सुईचं अग्र ओळखू येत होतं.

रानोनं आपला हात त्याच्या हातात तसाच राहू दिला. धडधडत्या हृदयानं ती विचार करीत होती. आपल्या भाग्याचा हा वाटेकरी, मेंदीनं रंगलेला हा आपला हात, चाबूक पेलणाऱ्या आपल्या राकट हातात असाच राहू देणार आहे की मध्येच झटकून टाकणार आहे? परंतु तसं काहीच घडलं नाही. मंगलचा हात आपोआप खाली आला आणि त्याबरोबर तिचाही हात खाली गळून पडला.

बाहेरचे लोक नेहमी असंच समजतात, की लग्न म्हणजे मस्त शृंगाराची न संपणारी रात्र आहे. खरी गोष्ट अशी आहे की, काही काही लोकांना वस्तुस्थितीचं मुळीच ज्ञान नसतं. आणि काहीजण जीवनातल्या या क्षणांचा अनुभव पार विसरून गेलेले असतात. जी तहान, जो आवेग, आणि जो उन्माद त्या दोन मनात उत्पन्न झालेला होता, त्याच्या मानानं लाभलेला त्या रात्रीचा आनंद अत्यंत क्षुद्र होता. दानशूर कर्ण समजून आपण एखाद्याकडं जावं, आपल्या साऱ्या स्वाभिमानाचा आणि माणुसकीचा बळी देऊन, त्याच्याकडे याचना करावी आणि त्यानं तिरस्कारानं एक कवडी आपल्या दातांवर फेकून मारावी आणि तरीही तोंडभर आशीर्वाद देऊन आपण असहायपणे परत फिरावं, तसा हा सारा प्रकार झाला होता.

सकाळी रानो आणि मंगल जागे झाले, तेव्हा कुणीतरी खोलीचं कुलूप उघडून टाकलं होतं. मंगल उठला. चालण्याचा त्यानं प्रयत्न करून पाहिला. दोन पावलं पुढं गेला आणि कण्हत परत आला. त्याला चालताच येईना. रडत तो पुन्हा आंथरुणावर आडवा झाला. रानो बाहेर पळत गेली अन् जिंदाजवळ जाऊन उभी राहिली.

'काय ग सुनबाई?' जिंदानं विचारलं.

'रानो म्हणाली, 'स्वयंपाकघराची चावी द्या थोडी आई.'

'कशाला ग?'

'हळद काढते. फार लागलंय त्याला.'

आपल्या दुपट्ट्याच्या पदराला बांधलेला किल्ल्यांचा जुडगा सोडून जिंदानं तिच्या हाती दिला. परंतु कोठीकडं जाण्याऐवजी घरातल्या ओसरीकडं ती वळली. तिथं, तिची अर्धी उघडी पोरं अजून झोपले-लीच होती. रानोनं हळूच प्रत्येकाचा मुका घेतला आणि त्यांच्या अंगाखाली आणि पायात गुंडाळलं गेलेलं पांघरूण तिनं ओढून सारखं केलं. सकाळच्या थंडीत काकडत, दोन्ही पायात हात घेऊन आखडून झोपलेली ती मुलं, पांघरुणाची ऊब जाणवताच, सुखावून सरळ होऊ पाहात होती. ती बडीजवळ गेली. तिच्या डोक्यावरून मायेनं हात फिरवणार तोच आपल्या वाढवलेल्या फॅशनेबल नखानं रानोचा चेहरा ओरबाडून काढीत बडी किंचाळली, 'जा, जा तिकडं. त्याच्याच हातानं आपल्या तोंडाला काळं माखून घे. जा.'

यापूर्वी रानोवर काय कमी आघात झाले होते? आता पोटच्या पोरीनंच तिचं तोंड ओरबाडलं होतं. 'पोरी, हे सारं मी केवळ तुझ्यासाठीच केलं अन् तू – तू देखील'—पण एवढा विचार करायची देखील तिला उसंत नव्हती.

जिचा भार नऊ महिने पोटात वागवला, हजार कष्ट उपसून, मरण-कळा सहन करून जिला या जगात आणलं, आणि गू-मूत्र करून, ज्या दुबळ्या अजाण अर्भकाला वाढवून मोठं केलं, तिनं आपल्या तोंडावर जखम केली नाही तर आपल्यावर फुलं वाहिली, असंही तिला वाटलं नाही. तिचं सारं मनच संवेदनाहीन, बधीर झालं होतं. त्याच बधीर अवस्थेत ती स्वयंपाकघरात गेली. हळद घेतली. तव्यावर गरम करून तिचा लेप तयार केला आणि मंगलच्या जखमे-वर लावायला म्हणून ती खोलीत आली. पण मंगल कुठं होता तिथं?

ती सासूकडे गेली, तेव्हाच तो खोलीतून निसटला असावा. रानो दरवाजापर्यंत धावत गेली. परंतु मंगलची सावली देखील कुठं दृष्टीस पडली नाही.

ढब्बू कुत्रा जवळ येऊन शेपूट हलवू लागला. 'कूं ऽ कूं' असा विचित्र आवाज काढीत आपले पुढचे पंजे रानोच्या अंगावर रोव-ण्याचा तो प्रयत्न करू लागला. त्याला जणू तिला सांगायचं होतं, 'रानो, तुझं दुःख मी जाणतो. या लोकांनी तुझ्यावर काय काय अन्याय केलेत ते मला माहीत आहेत.' पण शेवटी सारं ठीक होईल. अगदी ठीक होईल.'

चन्नो रोज सकाळी मंदिराला जायची आणि पहाटेच्या दुधाळ थंडीत तिचा आवाज हळूच वाऱ्यावर तरंगत यायचा 'मना तैं राम न जा न्या रे' परंतु मंदिराकडं जायचं सोडून आज ती सरळ रानोच्या घराकडे आली.

रानो तिला दाराशीच भेटली. त्याबरोबर तिनं तिला विचारलं, 'काय राणी, सारं सुख आहे ना?'

राणी काहीच बोलली नाही.

'अगं बोल ना!'

इतकं विचारूनही राणी काही बोलेना तेव्हा तिचे खांदे घुसळून तिनं विचारलं 'अग सांग ना, रानो काय झालं ते? पहा मेली कशी मूग गिळून बसते आहे ती?'

त्या गिळलेल्या मुगासंबंधी काही सांगणं तिला कसं शक्य होतं? त्या उकळत्या जळत्या पाण्यात तिच्या भावनांचा, तिच्या सहन-शक्तीचा दाणान् दाणा उकडून, शिजून निवाला होता; जळून करपून गेला होता, हे कोणत्या शब्दानं चन्नोला सांगायचं तिनं? खाली पहात कापऱ्या ओठांनी ती पुटपुटली, 'काही झालं नाही रात्री

राणीच्या चेहऱ्याकडं निरखून पाहून चन्नो तिला म्हणाली, 'खोटं सांगतेस. तुझ्या तोंडावर हे नखाचे बोचकारे कुठून आले मग?'

थंडगार घामाचे थेंब रानोच्या कपाळावर जमा झाले. ती गप्प झाली. थोडावेळ लाजल्यासारखी स्तब्ध उभी राहिली अन मग, उसळून म्हणाली, 'तू म्हणतेस त्याची चन्नो, मला मुळीच गरज नाही. परंतु अंग झाकायला दोन धडोती मी मागते आहे, अन पोटात ढकलायला दोन रोटचा पाहिजेत मला. पण भगवंताच्या मनात काय आहे, अंबाबाईची काय इच्छा आहे कुणास माहीत? तो पुन्हा कुठं-तरी निघून गेला आहे!'

'हरे राम' गल्लीतल्या सरत्या अंधाराकडे पाहात ती उद्गारली, 'पुन्हा कुठं गेला हा धडपडचा मेला?' तिला काही तरी चुकल्या-सारखं वाटलं म्हणून पुढं स्वतःला सावरीत ती म्हणाली, 'जळ्ळं माझं तोंड. तुझ्यापुढं असं मी नको होतं बोलायला.'

रानो रडता रडता हसली आणि हसताना तिच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले.

चन्नो रानोला धीर देत होती, 'रानो उगीच काळजी नको करूस. गेला तसा, आपसूक तो परत येईल.'

आणि झालंही तसंच. दुपार उलटण्यापूर्वी मंगल परत आला. त्याच्या अंगात नबाबचा सदरा होता. डोक्याला इस्माईलचा फेटा आणि पायात गुरुदासचा सुंदर गामेशाही चढाव त्याने चढवला होता. अंगावर पट्टचा बांधलेल्या होत्या. हळदीच्या लेपाबिपाने काही व्हायचं नाही म्हणून इस्माईलबरोबर त्याच्या एक्क्यातून तो सकाळीच डाक्क्याच्या मोठ्या इस्पितळात जाऊन आला होता. सकाळपासून पोटात त्यानं काही घातलं होतं की नव्हतं हे देवाला माहीत. काल-पासून त्यानं मार मात्र खूप खाल्ला होता, अन वर लग्नही केलं होतं.

दिवसभर खाटेवर बसून तो अंगणातल्या गवताच्या काड्या मोजीत होता. कधी आपलं अस्तित्त्व त्याला त्या काडीसारखं हलकं फूल वाटत होतं तर कधी ते त्याला पृथ्वीपेक्षाही जड वाटत होतं. मधेच खाली वाकून ओलसर जमिनीवर बोटांनी आपल्या दैवाच्या रेषा काढीत होता आणि त्या पुनःपुन्हा मोजीत होता. पण त्यांची संख्या नेहमी समच येत होती. एकही रेषा बाकी उरत नव्हती. सर्व वाटा दैवानं अडविल्या होत्या. मग चिडून, तो उठून उभा राहिला आणि घाईघाईने त्या रेषा त्यानं तळव्यानं पुसून टाकल्या नंतर त्याच हातांनी आपला चेहरा आवेगानं घासून काढला. परंतु मळकट हातामुळं, स्वच्छ होण्याऐवजी त्याचा चेहरा अधिकच मलीन झाला. उजळण्या ऐवजी त्याचं भाग्य अधिकच काळवंडून गेलं. मग बकाईतच्या झाडावर बसून 'काव काव' करणाऱ्या पहाडी कावळ्यांना त्यानं रागानं हात उंचावून उगाच हाकललं, भुंकत, वसवसवत एकमेकांच्या अंगावर जाणाऱ्या खर्जील्या मरतुकड्या कुत्र्यांचं भांडण थांबवण्या-साठी त्यांनी हुसकण्याचा त्यानं प्रयत्न केला. परंतु एकदोन कुत्र्यांना त्यानं एकीकडून हाकललं तर दुसरीकडून दुसरी चार पाच कुत्री गुरगुरत भुंकत जमा झाली. त्यांना हाकून, पळवून लावताना तो स्वतःशीच उद्गारला, 'आपली तर अक्कल गुंग झालीय. या कोटल्यात जो मरतो तो कुत्राच होतो की काय?'

कच्च्या भिंतीच्या पलीकडे, दूर हिमालय पर्वताच्या रांगा एक-मेकींत मिसळून गेलेल्या दिसत होत्या, आणि त्यांच्या शिखरांवर कोठे कोठे बर्फाचे थर चमकत होते. या पर्वताच्या दक्षिणेला असलेल्या टेकड्यांच्या पोटी 'पहाडी' माणसाची वेदना जन्मली. कारण या भागातल्या प्रेमिकांचं कधी मीलनच झालं नाही, असं म्हणतात. तो ह्या टेकडीवर तर, ती त्या टेकडीवर आणि मधे खळखळत जाणारी नदी, मग भेट कशी होणार?

पापी लोग पहाडके पत्थर जिनके चित्त
अंग मिलावा कभी कभी नयन मिलावा नित्त

आणि त्यांच्या विरहाची वेदना, रावी, चिनाब आणि झेलमच्या काठाकाठानं वाहात वारिसशहा आणि कादिर यार यांच्या रूपानं सांदल आणि गंजीवार यांच्या हृदयापर्यंत जाऊन पोचली होती.

मागल्या एकेक घटना मंगलच्या मनात दाटू लागल्या. एक दीर्घ श्वास टाकून तो नकळत मिर्झासाहिबांच्या कवितेच्या ओळी गुणगुणू लागला. फार वाईट केलंस तू साहिबा! माझ्या घोडीची आघाडी बांधून टाकलीस. माझे धनुष्य-बाण लपवून ठेवलेस. नाहीतर एकाच बाणाने मी तुझ्या भावाचा वध केला असता आणि दुसऱ्या बाणाने तू ज्याची वाग्दत्त वधू होतीस त्याला–'

परंतु मिर्झासाहेबाची ही कहाणी त्याच्या घायाळ जिवाला शांत करायला पुरेशी नव्हती. म्हणून एक हात कानावर देऊन व दुसरा हात उंचावून त्यानं गायला सुरूवात केली–

एक जाट स्त्री छुट्टनशहा फकीराची प्रार्थना करीत आहे–
तुझ्या कबरीवर मी एक अख्खा बकरा वाहीन.
माझ्या डोक्यावर बसलेल्या त्या सासूला मरण येऊ दे.
माझ्या पाच-सात शेजारणींना झडपणी होऊ दे.
अन् ज्या उरतील त्यांना ज्वरानं जर्जर कर.
ठाण्याची रपेट करणाऱ्या त्या गावच्या पोलीस पाटलाला पटकी होवू दे.
जिथं नेहमी दिवा तेवत राहतो ते त्या सावकाराचं दुकान जळून जाऊ दे.
दिवस रात्र रडणाऱ्या फकीराच्या कुत्रीचा मुडदा पडू दे.
सर्व गल्ली सुनी निर्मनुष्य होऊ दे.
म्हणजे माझ्या प्राणप्रिय मिर्झाला बिनधोक इथं येता येईल.

गळा, हृदय मोकळे करून मोठ्यानं गायिल्यामुळं मंगलचं मन एकदम शांत झालं. घरात जाऊन तो झोपून गेला. तेढ, भांडणातली उग्रता आता वातावरणात विरून गेली होती.

सकाळ, दुपार आणि संध्याकाळचे आठही प्रहर आता धुतलेल्या भिंतीसारखे, स्वच्छ नितळ झाले होते. आकाशातल्या वेदनांचे पाणी घेऊन किरणांच्या कुंच्यानं जसं कुणी त्यांना घासून स्वच्छ केलं होतं.

रानोनं स्वयंपाक केला. चन्नोच्या घरी जाऊन थोडं तूप तिनं उसनं आणलं आणि त्याचा एक गोळा कर्तव्यदक्ष गृहिणीप्रमाणं तिनं रोटीवर ठेऊन दिला. पोळीची तिपोडी घडी घालावी असं देखील तिच्या मनांत आलं. पण तिच्या डोक्यात कसलीशी कल्पना आली. आणि ती एकदम लाजली. लोक काय म्हणतील? ताट वाढून झाल्यावर बडीला बोलावूनं ती म्हणाली, "जा, हे नेऊन दे."

बडीनं नाक फेंदारलं. मानेला हिसडा देऊन म्हणाली. "हुं: अड-लंय माझं खेटर!"

लाजून चूर झालेली राणी स्वतःच उठून जाणार होती; पण

इतक्यात जवळ बसलेला चुन्नू म्हणाला 'आई इकडं आण ते. मी नेऊन देतो."

रानोनं चुन्नूकडं पाहिलं. त्याच्या बालबुद्धीला आणि निरागसतेला जणु रानोची सारी व्यथा समजली होती, अर्भकाची ही निष्पाप वृत्ती जगातल्या केलेल्या न केलेल्या सर्व पापावर पसरली होती. तिला वाटलं चुंन्नूला कुशीत घ्यावं. त्याला हृदयाशी धरावं. आणि कवटाळून घट्ट धरावं की, त्या आलिंगनात आपण संपूर्णपणं त्याच्या देहातच विलीन होऊन जावं अन् पुन्हा या जगात कधी परत म्हणून येऊ नये–तिनं चुंन्नूकडं ताट सरकवलं आणि डोळ्याला पदर लावून ती रडू लागली.

असे बरेच दिवस गेले. महिने सरले. हळूहळू जबाबदारीची एक जाणीव मंगलच्या मनात आपोआप निर्माण झाली. रोज च.र पाच रुपये मिळवून तो घरी आणू लागला. अजून त्यांचे संबंध नवरा-बायकोचे झाले नव्हते. तरी कमाईचे पैसे, आईला न देता, रानोच्याच हाती तो आणून देत असे. अशा वेळी रानोचं मन सुखावतही असे अन् उदासही होत असे. भितीबरोबर स्थिरतेचीही क्षीण भावना तिच्या मनात घर करू लागली होती. गावच्या साऱ्या बायांनी चन्नो काय, पूरनदेवी काय किंवा विद्या. सरूपा काय.–साऱ्या जणींनी काही झालं का ? अग काही झालं की नाही ? " असं पुस-पुसून तिला भंडावून सोडलं होतं. साऱ्यांना ती एवढंच उत्तर देई. "अग सटव्यानो. माझं घर वसलं, ह्याचं तुम्हांला काहीच वाटत नाही का ? मला अन्नवस्त्रं मिळू लागलं आहे. आता कुणी मला या घरातून हाकलून देऊ शकणार नाही–"

परंतु या उत्तरानं त्यांचं कुणाचंच समाधान होत नसे. मधमाशांप्रमाणं सारखं त्या तिच्या भोवती गुणगुणत रहात आणि कुल्ल्यावर चापटचा मारून त्या तिला पुन्हा पुन्हा विचारीत–

"म्हणजे काय ? रात्रभर तो तसाच पडून राहतो ?"

"हो."

"तू इकडं अन् तो तिकडं ?"

"तू देखील त्याला जवळ बोलवीत नाहीस ?"

"नाही."

"का नाही बोलवीत ? दळभद्री मेली ! तो तुझा आहे. तुझ्या बरोबर त्यानं लग्न केलं आहे. त्यानं तुला शेला पांघरला आहे. पाट लावला आहे तुझ्याशी !"

रानो अगदी रडकुंडीला येऊन म्हणे, "पाट लावला म्हणून काय झालं ? तो मला अजून–तसाच–पूर्वीसारखाच वाटतो."

हे ऐकताच सर्व जणी आश्चर्यानं ओरडत-

"अगोबय्या"

"अहा ग काळतोंडे !"

"लाज नाही वाटत असं काही सांगायला."

पुन्हा तोच सूर कुणी तरी पकडी–

"मग तुला झोप कशी येते ग ?"

"येते–पहिल्यासारखीच."

"तो देखील झोपी जातो ? अगदी तसाच ? गप्प–गार ?"

"हो."

"कधी जागा होत नाही रात्री ? आळसबिळस नाही देत ? एखादी जांभई देखील नाही कधी ?"

यावर सर्वजणी फिदी फिदी हसत, एकमेकींना कोपरखळ्या मारीत. मग मध्येच कुणी समजावणीच्या सुरात बोले, "अगदी मुलखाची बावळट आहेस. काही तरी करून जमवना मेले ! नाही तर जाईल तो हातचा.'

"पाहिजे तर मी आणून देते एक ताईत."

"खरंच," विद्या दुजोरा देई.

"नाही नाही." रानो म्हणे, "जादू–टोणा, गंडा–दोरा काही करायचं नाही मला."

'मग पुढं रडत बसशील,' पुरोनं तिला भिती घातली.

पुरोकडं रोखून पाहात विद्या खोचक स्वरात बोले. 'तुला नाही ना रडावं लागत ?'

पुरो चिडे. लाजभीड सोडून, जोड्याकडे बोट दाखवीत ती म्हणे, 'खेटर रडतंय माझं, गंडादोरा केला नसता तर, माझा शंभु झाला नसता. अन् माझी कूस उजवली नसती तर, या तुझ्या काकानं केव्हाच घराबाहेर घालवलं असतं मला.'

यावर साऱ्याजणी पुन्हा एकदा खिदळत. एक डोळा मोठा करून पूरन आधी सर्वांकडे पाही अन् मग हळूच तो मिचकावून ती हसे.

इतक्यात चन्नो विचारी, 'बाबा हरिदासचे किती दिवस राहिलेत अजून ?'

पूरनदेवी रागानं चन्नोची वेणी धरून हिसडी. 'मेले मेलेग माय.' चन्नो ओरडे आणि या हुल्लडीनं ती बैठक संपे.

तिकडं नशीबन्वाल्या अड्डयावर, गुरुदास, नवाब आणि इस्माईल थट्टा करून मंगलला अगदी जीव नकोसा करून टाकीत. ते नेहमी विचारीत 'का रे, कशी वाटली ?' मंगलचा चेहरा एकदम लाल लाल होऊन जाई. आपल्या आई-बहिणीला उद्देशूनच कुणी वेडंवाकडं बोलत आहे असं त्याला वाटे. तो गप्प बसे अन् घोडीचा सैल न झालेला पट्टा आवळून घट्ट करी किंवा उगाच घोडीला थोपटीत राही. परंतु त्यामुळं गोष्ट तिथंच संपत नसे. गुरुदास म्हणे, 'दुसरे परणीची मजा काही न्यारीच असते नाही ?'

'कसली न्यारी मौज ?' नबाब, ईस्माईल किंवा आणखी कोणीतरी मिष्किलपणानं विचारी.

'अरे, तिनं आधीच रस चाखलेला असतो ना ? तिला सर्व काही माहीत असतं.'

सर्व 'हो हो' करून हसत. हास्याच्या त्या कल्लोळात संतापलेल्या मंगलचा धारदार आवाज फुटून पडे–'थांबा तुमच्या आयला–'

मग सगळे गप्प होऊन मंगलकडे पाहात राहात. पण गुरुदास तेवढा स्वस्थ राहात नसे. तो देहानं चांगला दांडगा होता. त्याच्या वाटेला जाण्यापूर्वी प्रत्येकाला दोनदा विचार करावा लागे, तो विचारी, 'मग काय बहीण म्हणून तिच्याशी लग्न केलंस ? कशाला पाट लावलासरे तिच्याशी ?'

मंगल त्याच्याकडं कठोर नजरेनं पाही, परंतु शांत राहण्यातच पुरुषार्थ आहे असं मानून तो गप्प राही. थोड्या वेळातच गढूळलेलं वातावरण निवळून स्वच्छ होई. ईस्माईल कसला तरी विनोदी चुटका सांगू लागे–'एका सरदारजीची आणशी चिखलात पडली–'

'मग ? मग काय झालं ?' नबाब मुद्दाम मंगलकडं पाहात विचारी.

इतक्यात एखादी सवारी आली की त्याच्याकडं वळून नबाब त्याला पुसे, 'काय ? कोरल्याला जायचंय ?'

'नाही' म्हणत ती सवारी पुढं निघून जाई.

नबाब इस्माईलला आठवण करून देई, 'अरे, त्या सरदारजीची एकाणी चिखलात पडली. पुढं काय झालं तिचं ?'

'हो, एकाणी चिखलात पडली–' इस्माईल आपला चुटका पुढं चालू करी–आणि मागोमाग त्या सरदारजीनी त्या चिखलात उडी मारली–कच्छा अंगावर तसाच. एकाणी शोधता शोधता ते देवाची प्रार्थना करू लागले, 'या अल्ला एकाणो मिळू दे. या अल्ला, मिळू दे ती एकाणी.' याचवेळी एक मुसलमान जात होता तिकडून. अल्लाचं नाव ऐकताच तो थांबला, म्हणाला, 'सरदारजी तू आमच्या अल्लाला का साकडं घालतो आहेस ? आपल्या वाहे गुरूला का नाही हाक मारीत ?' त्याच्याकडे पाहात सरदारजी उत्तरले, 'वा, वा ! एका एकाणीसाठी मी वाहे गुरूला या चिखलात उतरायला सांगू काय !'

सगळे खो खो करून हसू लागत. मंगलदेखील किंचित् स्मित करी. या हास्याला परवाना समजून इस्माईल त्याच्याजवळ येऊन त्याला प्रश्न करी, सगळ्या सरदारजीचे घरी बारा वाजतात म्हणे, कायरे मंगल हे खरं आहे का ?'

'हो, खरं आहे.'

'तुझे देखील बारा वाजतात ?'

'हो. माझेदेखील बारा वाजतात.'

मंगलच्या डोक्यावरील केसाच्या गाठीवर हात ठेऊन इस्माईल त्याला विचारी, 'कारे इथं काही होतं का ?'

'हो होतं ना' मंगल त्याच्या तावडीतून सुटण्याकरिता सारं काही कबूल करी.

परंतु इस्माईल एवढ्यावर गप्प बसणारा गडी नव्हता. तो पुन्हा प्रश्न करी, 'हे पहा, फक्त दिवसाच तुम्हाला असं होतं की रात्रीच्या बारालादेखील असंच होतं ?'

'नाही. फक्त दिवसाच्या. जो खरा शीख असतो ना त्याला दिवसा बारा वाजताच असं होतं.'

'मग असं कसं ?' इस्माईल फिरून प्रश्न करू लागे, 'आपल्या गावचा तो विसाखा सिंग आहे ना, तो रात्रीच्या बारा वाजतानाच फार गडबड करतो.'

मंगल उत्तर करी, 'मग तो हरामजादा अस्सल शीख नाही. मुसलमानाचा शीख झाला असला पाहिजे.'

–आणि यावर सारे मिळून हसत. मंगलचा स्वर सगळ्यात चढा असायचा. एवढ्यात कोणी स्त्री-उतारू आली की सर्वजण तिच्याकडं धाव घेत. तिचं गाठोडं जाऊन नवाबच्या टांग्यात पडे, तिचे जोडे मंगलच्या आणि ती स्वतः गुरुदासच्या हाती सापडे. पुष्कळदा असे होई की, नवरा एका टांग्यात, बायको दुसऱ्यात आणि त्यांचं पोर तिसऱ्या टांग्यात ! मग भांडणं होत. परस्परात शिव्यांची सरबत्ती होई, शेवटी समझोता होऊन, कुठल्यातरी एकात सर्व उतारू कोंबून, तो टांगा सर्व मिळून चालू करून देत आणि मागे उरलेले दुसऱ्या उतारूंच्या मागे पळत. स्त्री म्हणजे टांग्यातून जाणारी एक उतारू, एवढंच आकर्षण मंगलला स्त्रीजातीबाबत वाटत असे. एखाद्या तरुणी-कडे मंगल बघे तेव्हा त्याचे डोळे एवढेच म्हणत, 'अशी ही स्त्री असते म्हणायची.' मात्र सलामतीबद्दल त्याला अजूनही आकर्षण होतं. स्त्रियांच्या टपालखात्याकडून सलामतीला ह्या गोष्टीचा पत्ता लागला होता की, मंगल आणि त्याच्या पत्नीत अजून 'तसं' काही झालं नाही. ती नटून थटून त्याच्यापुढं येई आणि फिरायला जायचं का म्हणून खुणेने विचारी. परंतु आतून ती मत्सरानं जळून करपून गेली होती. मंगलला आपल्या जाळ्यात अडकवण्याचा तिनं निश्चयच केला होता. एकांत जागी त्याला कपडे काढायला लावीन आणि तो जेव्हा तिला आपल्याला बाहूत सापडण्याचा प्रयत्न करील तेव्हा मोठ्यानं ओरडून आपण लोकांना जमा करू आणि त्याची अशी बेइज्जती करू की त्याची त्याला जन्मभर याद राहील. आतातर त्यानं लग्न केलं आहे. मोठा 'बीबीवाला' झाला आहे !' तेव्हा चांगली काळोखी लागेल त्याच्या तोंडाला.

त्या दिवशी, नशीवन्वाला अड्ड्यावर, मंगलनं नबाबबरोबर थोडीशी घेतली, पण अगदी भीत भीत. त्याचा भाऊ होता तेव्हा तो बाटल्यावर बाटल्या रिचवायचा. परंतु आंता त्याला भीती वाटत होती.

चारचौघींसारखी राणीदेखील एक सामान्य स्त्री होती. लग्नाच्या पहिल्या दिवसापासूनच, स्त्रीला आपल्या पतीचा चेहरा चांगला वाचता येऊ लागतो. त्याच्या तोंडावरच्या प्रत्येक सुरकुतीचा अर्थ तिला समजतो. जेव्हा तिचा धनी कसलं तरी पाप करून घरी येतो तेव्हा त्याचा तिला बरोबर पत्ता लागतो. ती काही बोलत नाही ही गोष्ट वेगळी. बोलता बोलता ती त्याचं सारं वागणं-चालणं ओळखून घेते. उंबरठ्यावर पडणारं आपल्या पतीचं पहिलं पाऊल पाहताच, ती त्याचं सारं जातक वर्तवून टाकते. त्याच्या करणीचं सारं महा-भारत तिला उमगतं. याच्या आधीदेखील मंगल दोन चार वेळा प्यायला होता आणि हे राणीनं ओळखलं होतं. मंगललाही हे ठाऊक होतं, परंतु दोघांच्यात मौनाचा पडदा पडला होता–आणि असंच काही काळ निभलं.

परंतु जसजसे दिवस लोटत होते, तसतशा गावच्या स्त्रिया रानोला बोलून घेऊ लागल्या. तिच्यावर संतापू लागल्या. तिला भीती घालू लागल्या. मग तिचंही मन पण म्हणू लागलं, 'खरंच, ह्या सांगतात ते बरोबर असेल बाई.' आपलं आणि आपल्या मुलांचं काय होईल, असा विचार मनात येताच तिला फार काळजी वाटे. कारण मधून मधून मंगल संतापानं ओरडायचा, 'दे, फेकून दे सारं. काय तमाशा मांडला आहे हा !' तेव्हा तिच्या जिवाचा थरकाप होई. परंतु मंगलला ती काही बोलू शकत नव्हती. त्याच्यावर काय अधिकार होता तिचा ? नाही, तसं नाही. अधिकार आहे तिचा. पंचांसमोर गावातल्या साऱ्या स्त्री-पुरुषांच्या साक्षीनं त्यानं तिच्यावर शेला पांघरला होता, पाट लावला होता. म्हटलं तर अधिकार आहे, म्हटलं तर नाही. पाट ? शेला ? कसला अर्थ आहे त्याला ? एक अडीच–तीन वार कपडा ! तसं पाहिलं तर, विवाह, सप्तपदी याला तरी काही अर्थ आहे का ? नाही, नाही, काही खरं नाही ! तिलोका देखील होता ना ? पण तेव्हा त्याला आपण इतके भीत नव्हतो. तोंडाला येईल ते बोलत होतो, त्यानं मारलं तरी. मग ह्याला काही का बोलत नाही मी ? मंगलनं कधी बोटही उगारलं नव्हतं तिच्या-वर. रात्रीखेरीज रानोच्या सावलीला देखील तो कधी उभा रहात

नाही. पण ह्याचा तरी अर्थ काय ? जाऊ दे मेलं. एका परीनं बरंच म्हणायचं हे. रोज हाडं तरी शेकावी लागत नाहीत ? परंतु ––

पुष्कळ दिवस विचार केल्यानंतर, मंगलला आपण का बोलू शकत नाही याचं कारण रानोला एक दिवस उमगलं. शहरातून, एखादी वस्तू आपल्याकरिता आणायला आपण त्याला सांगत नाही, सांगू शकत नाही, का ? दुसऱ्या बायका तर काय वाटेल ते आणायला सांगतात आपल्या नवऱ्याला. दिवसा अंगठी, रात्री दागिने, काही ना काही तरी नेहमी मागत असतात त्या आणि ते त्यांना आणून द्यावंच लागतं–अगदी झकत.

आज मंगल घरी आला, तेव्हा पुरती संध्याकाळ झाली नव्हती. सूर्य गेला तरी अजून त्याचा प्रकाश मागे उरला होता. त्यामुळे अष्टमीचा फिकट, प्रकाशहीन चंद्र, बाभळीच्या झाडात अडकलेल्या पांढऱ्या पतंगासारखा दिसत होता. तांगा थांबल्याबरोबर, इतका वेळ मंगलच्या तांग्यावरोबर धावणारा चंद्र, झोपड्यांच्या छपरावरील मोकळ्या आकाशात जाऊन स्थिर झाला. इथेच, मंगल आपला तांगा नेहमी सोडीत असे; आणि घोडीचा चारा–वारा करून तो घराकडे येई, तो पुन्हा परत जाऊन घोडीला खरारा करण्याकरिता आणि दाणा देण्याकरिता म्हणून. त्यानंतरचे उरलेले काम तो दुसऱ्या दिवशी सकाळी करी.

तांगा आणि घोडीचं व्यवस्थित करून तो परत घरी आला. जिथं तो आपला तांगा उभा करी, त्याच्या उजव्या अंगाला सरकारी शेतकी 'फारम' होता. 'फारम'च्या त्या जमिनीत, पंधरा फूट उंचीचा ऊस असा दाट वाढला होता की, त्यातून मुंगीलादेखील जायला रस्ता नव्हता. दिवसा कोळी आपल्या शेपटातील धाग्यांनी एक रेशमी जाळं उसावर विणीत आणि त्या मऊ तारांच्या आधारानं झुलत झुलत, एका धांड्यावरून दुसऱ्या धांड्यावर जात आणि त्यातला रस चाखीत. डावीकडे घरांची रांग होती. अलीकडच्या टोकाला शाळा आणि तिला लागूनच जेहलम बागवानणीचं घर होत आता चंद्र तिच्या घरावर येऊन थांबला होता.

वाऱ्यात कसला तरी सुवास दरवळत होता. हा कसला सुवास आहे ते मंगलला माहीत होतं. या महिन्यात, दर वर्षी गावातले शेतकरी उसाचा रस काढून, त्याचा गूळ तयार करीत असत आणि शेतात एक खड्डा खणून, गुळानं भरलेलं मडकं त्यात ते पुरून ठेवीत. अन् बाभळीची साल, शेण व घोड्याची लीद टाकून ती जागा झाकून टाकीत. काही दिवसांनी आंबलेल्या, फसफसलेल्या रसाचे ओघळ त्या मडक्यातून उसळून वर येऊ लागत आणि त्याचा गंध वाऱ्यात पसरे. त्या वासात सुगंधही असे आणि एक मादक दर्पदेखील.

भाद्रपदाचे आता आश्विनात रूपांतर होत होते. उन्हाळ्यातल्या गरम झळांची सवय झालेल्या शरिराला थंड वाऱ्याची एखादी झुळूक देखील सहन होत नव्हती. गार वाऱ्याच्या स्पर्शानं मनात कुठंतरी खुपल्यासारखं होत होतं. एक बारीक कोवळा जाळ शिलगत होता. यावेळी माणसाला अंगावर धड पांघरूण घेववत नाही की धड टाकवतही नाही. या दिवसात स्त्रिया हिवाळ्यातील हुडहुडीच्या नुसत्या भीतीनं हैराण होतात आणि घरातील सर्व गाद्या, रजया एकत्र करतात, त्यातला कापूस धुनकून घेतात आणि नव्या खोळीत भरून रजया शिवून घेतात अन् काळ्या दोऱ्यानं त्यावर टाके घालतात ! बस्स, झाल्या हिवाळ्यासाठी सज्ज ! आता धुकं येवो की बर्फ पडो, त्यांना काळजी नाही. पण पुरुषांना या थंडगार वाऱ्याचा फार त्रास होतो, त्यांची शरीरे काळवंडून लाल करपट बनतात आणि त्यांचा रोम रोम परस्पर मिलनासाठी तडफडू लागतो पुरुषांचं सर्व शरीर, या दिवसात, एखाद्या नागासारखं फुफाट करू लागतं.

मंगलनं घराकडं जाण्यासाठी पाऊल उचललं. इतक्यात डावी कडील घराच्या छतावरून हाक आली, 'ऐ ऽ मंगल'

मंगलनं वर बघितलं. ही तीच जागा होती, जिथं अष्टमीचा चंद्र येऊन अडला होता.

सलामती वर उभी होती, तिच्या अंगाच्या वक्ररेषा त्या चांदण्यात अंधुक दिसत होत्या. ह्या रेषा चांगल्या शहाण्या माणसालाही वेडं करतात. कारण त्या अस्पष्ट, धूसर असतात. सलामती बोलली 'थांब. मला तुझ्याशी थोडं काम आहे.'

मंगल निश्चल उभा राहिला. परंतु त्याच्या शरिरातलं मन अत्यंत चंचल झालं. त्या चंचल पाऱ्यात त्याच्या शरिराची जडता विरघळून गेली. जेहलमच्या घरातील लाकडी जिन्यावरून सलामती हळूहळू उतरत होती. सलामती, इनामती आणि जेहलम, याच जिन्यानं वर जाऊन, घराच्या छतावर लालभडक मिरच्या वाळत घालीत. जिना उतरून सलामती जवळ येईपर्यंत मंगलनं इतक्या कल्पना मनाशी रचल्या की तेवढ्या कल्पना संपूर्ण आयुष्यात देखील कुणी रचल्या नसतील. मंगलपासून काही अंतरावर येऊन, सलामती उभी राहिली अगदी चुपचाप.

'मंगलनं विचारलं, 'काय काम आहे सलामती ?'

'काही नाही' सलामती म्हणाली. तिच्या आवाजात, गाऱ्हाणी होती, एक कहाणी होती अन आसवेही होती. जणू ती म्हणत होती, 'तुझ्या पुढं अशी बसून आसवं ढाळीन पण एका शब्दानंही तुला आपली व्यथा सांगायची नाही.'

'सांग ना. असं काय करतेस ?' मंगलनं तिला विनवणीच्या स्व त विचारलं, बोलता बोलता तो थोडा पुढं आला. लगेच सलामती भ्यालयासारखी मागं सरकली 'हं. तिथंच थांब, लांब' सलामती घाबऱ्या स्वरात म्हणाली.

सलामतीच्या बाजूनं एक सुगंधाची लहर दरवळत आली. हा सुगंध खेड्यातला नव्हता. मंगलचं नाक तिथल्या सुगंधाशी पूर्ण परिचित होतं. निरोगी मनाचं आणि शुद्ध मनाचं खेड्यातलं असफल प्रेम मलीनतेला आणि घामालाही चंदनाचा सुवास देतं. परंतु ही लाट शहरातल्या सुगंधाची होती. प्रेमालाही एका सहृदय दुर्गंधाचे रूप देणारा दरवळ होता तो. मंगलच्या मनात भाद्रपदाच्या वादळी वाऱ्यानं फुलणारा जाळ पेटला. 'लांब, लांब' या तिच्या शब्दानं ती ज्वाळा अधिकच भडकली. सलामतीच्या लाज-संकोचाची त्याला पर्वा उरली नाही. तो आवेगानं पुढं सरकला, म्हणाला 'भितेस तू मला ?'

'हो' सलामती तुटकपणे उत्तरली, 'आठवत नाही तो दिवस'

'आठवतो' मंगलनं उत्तर दिलं, 'पण सलामती, सारे दिवस एकसारखे थोडेच असतात' तो अधिक जवळ आला. 'नाही नाही' करीत सलामती मागे सरू लागली. शेवटी भिंतीला जाऊन टेकली.

मंगलनं हात लावताच. मोटयानं ओरडायचं, लोक जमा करायचे आणि चार चौघात मंगलची फटफजीती करून, त्या दिवसाच्या बेइज्जतीचा चांगला सूड घ्यायचा विचार तिनं आपल्या मनाशी केला होता, नव्हे तसा तिचा पक्का निश्चय झाला होता. परंतु एक क्षणभर असाही विचार तिच्या मनात आला की, या अस्वलानं, एका उडीचं हे अंतर ओलांडून आपल्याला धरलं आणि आपलं तोंड बंद केलं किंवा केसाळ छातीशी आपलं तोंड त्यानं आवळून धरलं तर आपण काय करायचं ? आपला सारा बेत मनातल्या मनातच जिरून जाईल. आणि हे अस्वल तर, क्षणाक्षणाला, हळूहळू जवळ जवळ येतंय. सलामतीचा शब्द तिच्या घशातच अडकला. तिचं अंग थरथर कापू लागलं. मंगलच्या शरिरालाही असाच कंप सुटला आहे, हे मात्र तिच्या लक्षात आलं नाही.

आणखी एक पाऊल, अन मग सलामतीला काहीच करणं शक्य नव्हतं. समोरासमोर अशी दोघं जवळ जवळ उभी होती. दोघंही परस्परांच्या नजरेचा तळ शोधीत होती. माजरं जशी एकमेकांना रोखरोखून बघतात तशी ती एकमेकांकडे राहून राहून पाहात होती. अशा क्षणी फक्त स्त्रियांचं डोकंच आधी काम करतं. पुरुषांचं नाही, आणि मग मात्र पुरुषांचंच डोकं तेवढं चालतं. स्त्रियांचं नाही. ते एका पावलाचं अंतर मंगलऐवजी सलामतीनंच तोडलं. तिनं उसळून एकदम मंगलला मिठी मारली. त्याच्या कुशीत शिरली ती. तिला ज्ञात असलेल्या एका अस्त्रानं, मंगलच्या पसरलेल्या बाहूंच्या रानटीपणाला, पशुतेला तिनं आळा घातला.

दबलेल्या आवाजात मंगल तिला विचारीत होता, 'सांग, काय काम होतं तुझं ?'

'काही नाही ' सलामतीनं उत्तर केलं, 'म्हटलं भेटलास तर तुला सांगावं सख्यारे, जिथं तुझं औत चालतं तिथं—त्या शेतात हा माझा चरखाही घेऊन चल ना'.

'जित्थे तेरे हल वग दे ओथे ले चल चर्खा मेरा.'

मंगलनं फिरून हात पसरले, तेव्हा सलामती त्याला म्हणाली 'पागल तर झाला नाहीस. काही काळ वेळ आहे की नाही ?'

'नाही ! नाही !'

'नाही '

'मग पुन्हा केव्हा ? कुठं ?'

'तिथं ' सलामतीनं उसाच्या मळ्याकडं बोट दाखवलं, 'अन मंदिरात घंटा वाजत असतील नि मशीदीत मुल्ला अजाँ देत असेल ना ? तेव्हा !'

मंगलनं पहिल्यांदा उसाच्या मळ्याकडं पाहिलं, नंतर आकाशाकडं. तिथं आता पिसांसारखे भुरके ढग जमा झाले होते. सलामतीकडं निरखून पाहात तो म्हणाला, 'बरं ठीक आहे.' कालच तिथून हजारेनं दारूचा मटका काढून नेला.' मग उसाकडं हात करून मंगल म्हणाला, 'तिथं एक दोन घड्यांपुरती जागा आहे.' एवढं बोलल्यावर त्याचं शरीर ढिलं पडलं. त्याच्या थरथरत्या हातावर त्याचा विश्वास नव्हता. काय गवसलं नि काय हरवलं हे त्यांना कळत नव्हतं. त्याला वाटलं आपलं धाडसच इथं कमी पडलं. एकदोन घोट दारू घशाखाली उतरली असती तर मजा आला असता. टांगा चालवताना उडालेल्या दिवसभराच्या धूळमातीनं त्याला थोडं मलीनही वाटत होतं. आईबहिणीवरून दिलेल्या शिव्याचा वास अजून त्याच्या तोंडाला येत होता. हरवल्यासारखा होऊन तो म्हणाला,

'पण सलामती उद्याचं विसरू नकोस.'

'मी नाही, तूच विसरशील.' सलामती मंगलच्या डोळ्यातील संशयाची छाया उडवून लावीत होती.

'नाही.'

चंद्राच्या अर्धबिंबाच्या प्रकाशात सलामतीचे डोळे तळपले. त्यातली चमक पायानं रगडीत मंगल घराकडं निघाला. शरिराला पडलेल्या एका विचित्र ताणामुळं, त्याची चालदेखील बदलली होती. त्याच्या पाठीच्या कण्यात फुत्कारणारा नाग आता शांत झाला होता. मागून पाहताना तो माणसासारखा दिसत नव्हता. लाकडाच्या ओंडक्यासारखा तो पुढे जात होता.

¤

त्याच्या लांब जाणाऱ्या आकृतीकडं पाहात सलामती अजून तिथंच उभी होती. भाद्रपदाचे झोंबरे वारे तिलाही चाटून चालले होते. त्या झुळकींनी तिचा देह उघड्यावरल्या निखाऱ्यासारखा कधी फुलत होता तर कधी विझत होता. मध्यरात्री मंगल परत आला तर, आरडून ओरडून, त्याला पकडून त्याची फजिती करण्याचं बळ आपल्या अंगात नक्की रहाणार नाही, असं तिला वाटलं. कमरेची नाडी आवळून घराकडं जाण्यासाठी तिनं पाऊल उचललं, तोच तिची वडील बहीण इनामती तिला समोरून येताना दिसली.

'आपा, तू इकडं कुठं ग ?' सलामतीनं तिला प्रश्न केला.

'सूरमादाईकडून येतेय. काढा आणलाय ?'

'काढा ? तो कशाला ?'

'मरायला ' इनामती त्रासिकपणानं म्हणाली.

नंतर थोडंसं हसून अन् काहीसं संकोचून ती बोलली, 'स्त्रियांचा जन्मच असा. मेलं एक पापच आहे ते.'

'अग बाई ' सलामतीच्या डोक्यात आता थोडा प्रकाश पडला, 'अग, म्हणतेस तरी काय ? धाकला अजून एक वर्षाचा देखील झाला नाही !'

'म्हणून तर हे मरण आणलंय विकत.' इनायतीनं ती औषधाची पुडी कपाळावर मारून घेतली.

दोघी मिळून घराकडे निघाल्या.

चालता चालता सलामतीनं विचारलं, 'हे सगळं करण्याआधी तू मुरादला विचारलंयसना ?'

मुराद हे इनायतीच्या नवऱ्याचं नाव.

'हूं.' इनायती हात नाचवीत म्हणाली, 'त्या मेल्याला विचारीत बसले असते तर आतापर्यंत अकरा झाली असती. हे पोट आहे माझं, मलकासिहाचा रोट्यांचा आवा नव्हे काही !'

सलामती बावरली. अजून अल्लड होती ती. तिला यातलं काही फारसं माहीत नव्हतं. तिला फक्त एवढं माहीत होतं की, ईश्वराच्या या सृष्टीत नारी असते; अन् तिला गर्भाशय असतो. गर्भ आणि प्रसववेदना यांच्या नुसत्या कल्पनेनंच तिच्या हृदयाला अबोध कळा लागल्या. मग एक दूरचा, शहाणपणाचा विचार सलामतीच्या मनात डोकावला, 'शेवटी असं होतं तर ! हेच होतं, तर—मग ?'

इनायतीनं दारात पाऊल टाकलं. तिचा नवरा आयेशेची, आपल्या

मेहुणीची थट्टामस्करी करीत होता. ती तशीच बाहेर आली आणि तिनं सलामतीला विचारलं, 'काय ग, तो भाटियाचा पोरगा पुन्हा तुला भेटला होता का ग ?'

इनायती कुणाबद्दल बोलत होती, कुठल्या वर्मावर आघात करीत होती, हे तिला समजलं होतं. परंतु मुद्दाम वेड पांघरून तिनं विचारलं, 'कोण ?'

'तोच, तांगेवाला मंगलू.'

सलामतीचं उत्तर तयारच होतं, 'नाही.'

आत जाऊन इनायती आपल्या नवऱ्यात आणि मुलात मग्न झाली. जेहलम मटणात घालण्यासाठी हरभऱ्याची डाळ हवी म्हणून बाजारात गेली होती. तिच्या अब्बाचा नेहमीसारखाच पत्ता नव्हता.

खाटेवर पडल्या पडल्या सलामती स्वतःशीच विचार करीत होती. समोर खुंटीवर शलवार आणि तिचा कुडता टांगलेला होता. त्यांना पाहताच त्या दिवशीचं दृश्य तिच्या डोळ्यासमोर उभं राहिलं. लाजेनं नि अपमानानं ती लाल लाल झाली. 'काय झालं होतं मला, कुणास ठाऊक ? असं कुणी कुणाचं ऐकतं का ? त्यानं अजून दुसरं काही काढून ठेव म्हटलं असतं तर मी काढलं असतं का ? — पागल, मूर्ख ! — मग आपण गल्लीत आलो आणि कसा तरी कुडता अंगात घालून आपले हे झाकले, या अल्ला, कुणी पाहिलं असतं तर !'

सलामतीचा संताप अनावर झाला, 'जा, झाली तुझी सैर (सहल)' आणि मला परत यावं लागलं. कुण्याही माईच्या बेटीची इतकी बेइज्जती कधी झाली नसेल. तरी पण 'आया' ज्याला बेइज्जती समजते त्याला मी बेइज्जती मानीत नाही.

ती उठली. ताटं वाढण्याचं निमित्त करून इनायतीजवळ आली. काही माणसं उठून दुसरीकडे गेल्याबरोबर, तिनं मंगलच्या भेटीची हकीकत तिला सांगितली. शेवटी हेही बोलून गेली की, तो आज रात्री तिला भेटायला येणार आहे, शाळेच्या पलीकडं, उसाच्या मळ्यात.

थोड्याच वेळात मुराद गावातले दोन चार गुंड गोळा करून घेऊन आला. ते गरीब होते, दरिद्री होते. परंतु एक काफिर, मुसलमान मुलीच्या इज्जतीवर हात टाकणार ही गोष्ट त्यांना असह्य होती. तातडीनं सर्वांनी लाठ्या, बोथाट्या, भाले जमा केले आणि फार वर्षांपूर्वी घडलेल्या त्या यात्रेकरणीच्या आणि तिलोकाच्या खुनाच्या गोष्टी आठवून ते एकमेकांना सांगू लागले. ⚜

## : ८ :

मंगलची आंघोळ आटोपली होती. नुकतंच घाण्यावरून आणलेलं ताजं सरसूचं तेल तो आपल्या दाढीला चोपडीत होता. आज सकाळी खैरूनं आपला घाणा चालू केला तेव्हा त्याचे पहिले वहिले थेंब मंगलनं आपल्या बाटलीत भरून घेतले होते. नशीबनवाल्या अड्ड्यावरून परतल्यावर आणि सलामतीला भेटून आल्यानंतर मंगल चुंमूशी थोडा वेळ खेळला, थट्टेनं बडीची वेणी त्यानं ओढली, जिंदा आईशी बोलताना बडीसाठी नवरा शोधण्याची गोष्टही त्यानं बोलून दाखवली. त्यामुळं सारं घर आनंदानं नुसतं चिवचिवत होतं

रानो आज त्याला फार सुंदर दिसत होती. तिचं लग्न होऊन नुक्ती कुठं दोन-चार वर्षं झाली आहेत आणि ही मुलं तिच्या सवतीची आहेत असंच त्याला वाटत होतं. त्याला असाही भास होत होता. आपण वडीलभाऊ आहो आणि लहान भावाची हत्या झाल्यावर त्याच्या पत्नीशी आपण पाट लावला आहे. पण छे, असं कधी होतं का ? नाही. धाकटा भाऊच पाट लावतो. वडील भावाला, धाकट्याची पत्नी सुनेसारखी अगदी मुलीसारखी असते.

मंगलचं आजचं वागणं अगदीच विपरीत होतं. त्याच्या स्वभावाविरुद्ध होतं. कधी नव्हे ते संध्याकाळचं स्नान करून, तो स्वच्छ, निर्मळ झाला होता. त्यामुळं रानो फसली. तिला वाटलं हे सारं आपल्यासाठीच आहे. आजचा दिवस माझा होता. रात्रदेखील माझीच आहे. मंगलनं रानोकडं पाहिलं. त्याला वाटलं आपलंच काहीतरी चुकलं. पण नाही, हा सारा रानोचाच दोष होता. तिच्या डोळ्यांचा, तिच्या गालांचा, ओठांचा, तिच्या नितंबांचा नि मांड्यांचाच हा सारा अपराध होता. आज सकाळी, नाहून, तळ्यातून जेव्हा ती बाहेर आली तेव्हा ती फुललेल्या चिलमीतील निखाऱ्यासारखी भासली. घरी गेल्यानंतर, अंगाला उटणं लावल्यामुळे, तिची त्वचा इतकी मऊ, नितळ झाली होती की, तिच्यावर नजर ठरत नव्हती. नजरेतले भावही विचलित झाले होते. सारखे ते घसरून घसरून पडत होते. आणि जागच्या जागीच उसळत होते, तडफडत होते. तिच्या शरिराच्या ज्या भागावर दृष्टी पडत होती, तिथंच ती स्थिर होत होती. रेंगाळत होती. अगदी चिकटून बसत होती. धुंद होत होती आणि ओढून काढल्याशिवाय तिथून निघत नव्हती. तिनं कपाळावर कुंकुम तिलक लावला होता. तिच्याकडं निरखून पाहणारांना कळून आलं असतं की, तो केवळ कुंकवाचा टिळा नव्हता. लाल लाल होत जाणारं आणि स्वतःभोवती फिरणारं एक सूर्यबिंब होतं ते ! आणि प्रकाशाच्या त्या राशीत हात घालून त्यांची किरणं कुणी अचानक विखरून टाकीत होतं. तिच्या ओठावर अक्रोडाच्या सालीचा लाल रंग फुलला होता आणि सुकल्यासारखे भासणारे तिचे ओठ पिकलेल्या राजबेरीसारखे रसरशीत दिसत होते. मंगलनं पुन्हा एकदा तिच्याकडे निरखून पाहिलं आणि विचारलं, 'तू आज बाजारात गेली होतीस का ?'

राणीनं एक चंचल दृष्टिक्षेप केला आणि तो आपल्याकडंच पाहत आहे, हे लक्षात येताच तिनं आपली नजर दुसरीकडं वळवली. नववधूच्या मंजूळ आवाजात ती म्हणाली, 'हो', आणि नंतर कामकाजाचा बहाणा करीत, इकडं तिकडं फिरून ती स्वतःला लपवण्याचा प्रयत्न करू लागली.

रानो ज्ञानास्वादा आणि मानिनी असली, तरी प्रीतीच्या पहिल्या उत्कट क्षणी, आपलं सर्वस्व समर्पण करायला ती अनुत्सुक होती असं नाही. मग ती काय लपवीत होती ? काय होतं तिच्या मनात ? नारीचं हे रहस्य एकदम कुणालाच उलगडत नाही. उटी, कुंकुमतिलक, अक्रोडाच्या साली, आणि ओठांच्या रॉजबेरी यांच्या पलीकडं वसणारं ते रहस्य असतं. स्त्रीच्या रूपाशी, तिच्या नारीहक्काशी किंवा कामप्रेरणेशी ही या रहस्याचा काही संबंध नसतो. अष्टमीच्या चंद्रकलेचं अर्धबिंब प्रथम अगोचर असतं. तिनं आपलं अर्धांग लपवून

ठेवलेलं असतं. पण जसजसे दिवस जातात तसतसं, हळूहळू, चंद्रकळा आपलं अवगुंठन थोडं थोडं कलेकलेनं दूर सारीत जाते. आधी ती आपला शेला दूर सारते. मग काचोळी, मग नेसूचं वस्त्र आणि शेवटी एके दिवशी – नव्हे रात्री – ती पूर्णिमा होऊन आपल्या विवस्त्र वैभवासह पुढे येऊन उभी राहते. तिच्या त्या उत्कट उन्मादात एक अगतिकता असते, तिच्या समर्पणातुरतेतही एक असहाय्यता असते. आणि उन्मादाच्या व असहाय्यतेच्या या विलक्षण अधीर क्षणी ती आपल्या सर्वस्वाचं दान करते. नारी विज्ञान हे खगोल विज्ञानापेक्षाही गूढ अगम्य असतं का? विज्ञाना विज्ञानात देखील अंतर असतं. जे लोक वर्षानुवर्षे तन्मयतेनं आकाशाचं निरीक्षण करतात, नक्षत्रांचे वेध घेताना, जो त्यांच्या प्रकाशाच्या लुकलुकत्या शलाकेवर जगतात आणि थरथरत्या किरणांबरोबर मरतात, जे अमावस्येला कोमेजतात आणि पौर्णिमेबरोबर फुलतात; तसंच रात्रीच्या असीम डोळयात, तिच्या निमीलित पापण्यात, विद्युत् आणि चुंबक कणांच्या विस्तारात चाललेली, पृथ्वीहून मोठी नि आकाशाहून विशाल अशी रास्त नृत्ये ज्यांना दिसतात आणि त्या नृत्यातले झूमर, लड्डी, भांगडा इत्यादी भेद ज्यांना स्पष्ट कळतात, त्यांनाच ह्या अष्टमीच्या चंद्राचं रहस्य समजणं शक्य असतं.

सलामतीच्या आकर्षणानं बेभान झालेल्या मंगल तांगेवाल्याला घरच्या ह्या अष्टमीचं रहस्य कसं कळावं? त्यानं कधी आकाशकडं मान वर करून पाहिलं नव्हतं. आपण स्वतःच एक गृह आहो – ग्रह का?–कुणालाही आपल्याकडं पाहण्याचा धीर होणार नाही असा देदीप्यमान सूर्य – आपण स्वतःच आहो, याची त्याला कल्पना नव्हती. जो सूर्याकडं पाहतो तो आंधळा होतो. त्याचे उदयास्त, त्याच्या गतीचे संतुलन आणि त्याचा रोजचा समन्वय यांची परस्परांशी टक्कर होते तेव्हा त्यांचा चुराडा होतो; त्यांचे सर्व अवशेष भूतकाळात विलीन होऊन जातात. सप्तर्षीच्या स्त्रिया त्यांच्याकडे बघता बघताच अंतर्धान पावतात. चंद्र निष्प्रभ, कागदाचा कपटा बनतो, हळू हळू त्याचा क्षय होतो आणि शेवटी नेतीच्या अतळजळात तो बुडून जातो.

त्या बेभान, अज्ञान मंगलला, आज रानो अशा पुष्कळशा नव्या गोष्टी सांगणार होती. तिच्यामध्ये आणि मंगलमध्ये पडलेला पडदा ती आज ओढून दूर करणार होती.

'धुंड अन्हियां करे सुजाखियां तू
धुंड लाह मुंह उत्तो लाडिए नी
वारिसशाह न दव्विये मोतियां नु.
फुल्ल अग्गदे विच्चये साडिए नी'

बुरखा बघणारांनाच आंधळं बनवतो, म्हणून हे नववधु, तो तू आपल्या मुखावरून दूर कर, अरे वारिसशाह, मोत्यांना फोडता येत नाही, फुलांना जाळता येत नाही.

लज्जेचा पडदा दूर केल्याशिवाय ईश्वराचंही दर्शन घडत नाही. तोच पडदा, फाडून फेकून देण्याचा रानोनं आज निश्चय केला होता.

–आणि इकडे मंगल तिला लाच देऊन मोहात गुंतवू पाहात होता. त्यानं आपल्या सदऱ्याच्या खिशातून केसाचे आकडे काढले. ते त्यानं घरी परतताना विकत घेतले होते. ते आकडे हातात घेऊन पाहात असताना, रानोच्या तोंडातून 'अहाहा' असे उद्गार बाहेर पडले. (स्त्रीच्या आनंदाची हीच परिसीमा) परंतु त्यावेळी मंगल दुसरीकडेच बघत होता. थोड्याचवेळानं खिशातून त्यानं पैसे काढले आणि राणीच्या हातात ठेवले. राणीच्या डोळयात आसवं उभी राहिली. तिनं अश्चर्यानं विचारलं, 'आठ रुपये कुठून आले?'

'अगं आज पसरूरची सवारी मिळाली होती.'

'म्हणजे?'

म्हणजे काय? खूप खा, प्या, मजा करा.' आणि पहिल्यांदा— आपल्या विवाहित आयुष्यात अगदी पहिल्यांदा–त्यानं राणीच्या शृंगाराकडं अर्थपूर्ण दृष्टीनं निरखून पाहिलं. पुढं तो म्हणाला, 'खर्चदेखील वाढले आहेत ना!'

–आणि रानोदेखील पहिल्यांदा–आपल्या नव्या विवाहित आयुष्यात अगदी पहिल्यांदाच–ऐखाद्या वधूसारखी लाजली. कुंकवाचा टिळा, अक्रोडच्या सालीची लाली, रॉजबेरीचा रसरशीतपणा–सारी सारी उघडी पडली आहेत, अगदी नग्न झाली आहेत असं तिला वाटलं आणि अंग चोरून, संकोचाच्या पदरानं हे सारं तिनं झाकून घेतलं. मंगलच्याजवळ असूनही ती किती दूर होती. अन् या दूरतेत देखील त्याच्या किती जवळ होती ती! अगदी बिलगल्यासारखी. तोच तिच्या डोक्यात विचार आला, नको, आताच नाही, अजून मंदिरात घंटा घणघणल्या नाहीत; मशिदीतून मुल्लानं अजून अजाँ दिलेली नाही.

'लवकर वाढ' मंगल म्हणाला.

'इतक्यात नाही.'

'का? इतक्यात का नाही.

रानो घाबरली. तिला या प्रश्नाचं उत्तर देता येण्यासारखं नव्हतं. मंगलनंच तिची ही अडचण दूर केली, 'एखादं पक्वान्न करतेस की काय?'

'हो' रानो उत्तरली. तिच्या दुपट्ट्यातले राघु खट्टे-मीठे बोल बोलू लागले, 'हरभऱ्याची भाजी करणार आहे नि पुदीन्याची चटणी खमंग मसालेदार.'

मंगलच्या हातून फार मोठी चूक झाली होती. ते लग्न, लग्नातलं ते पुदीन्याचं गाणं–सर्व काही त्याला आठवलं. तो उठून उभा राहिला. त्याच्या नाकपुड्या फुलल्या, पगडीतले केस बाहेर आले. केसात नसल्या, तरी त्याच्या कल्पनेत दोन मनकवड्या म्हाताऱ्या चेटकिणी कुठंतरी लपून बसल्या होत्या. तो रागानं म्हणाला 'राहूदे ते. काय झालं असेल तेच आता वाढ. मला बाहेर जायचंय. जरूरीचं काम आहे मला.'

स्वतःला सावरणारी रानो फिरून कोसळली. तिनं वेगळ पदार्थ केले होते. कल्पनाही वेगळीच केली होती तिनं. तसलं वाईट साईट काही नसेलही. खरंच काम असेल. बरंच झालं. तो परत येईल तेव्हा घरात मुलं झोपलेली असतील. सासऱ्याचं खोकणं आणि सासूचं पहिल्या रात्रीचं घोरणं बंद झालेलं असेल. घरात कसं सारं शांत, शांत असेल. इतकं, की, आपल्या नुसत्या श्वासांनी ही ती शांती ढवळून निघेल.

एकाएकी मंगलनं विचारलं, 'माझा तो कुर्ता कुठं आहे?'

रानोनं ओळखलं. तिच्या काळजात कलकललं.

'कुठं जायचंय?' नकळत तिच्या तोंडातून प्रश्न फुटला, 'पाहा तरी किती आभाळ भरून आलंय.'

'आलं असेल' मंगलनं रागानं विचारलं–' पण तू कोण मला विचारणार?'

रानो असहायपणे उत्तरली, 'नाही, नाही, मी कोणी नाही. उगाच सहज विचारलं.'

तिलोक्याशी वागताना रानो हट्ट करीत होती. अडून बसत होती. 'मी नाही विचारणार तर गावातलं दुसरं कोणी येऊन का विचारणार आहे?' असं बोलून ती अडून बसली असती तर मंगलचा निरुपाय झाला असता. पण आपलं नातं एका मळक्या, फाटक्या जुन्या चादरीचं आहे हे तिला माहीत होतं, रानोच्या या निर्जीव, हताश उत्तरामुळं मंगलचा निर्धार थोडा ओसरला. हा वादच थांबवण्याच्या हेतूनं तो म्हणाला, 'मला रांडेकडे जायचं आहे.'

हे वाक्य बहुधा नवरे अशा प्रसंगी उच्चारीत असतात की, जेव्हा त्यांना खरोखर रांडेच्या घरी जायचं असतं, पण त्यांच्या बायकांना वाटत असतं की, आपले नवरे अशा भलत्या ठिकाणी जाणार नाहीत. तसं काही असलं तर इतकं उघड उघड ते बोलणारच नाहीत. परंतु रानोच्या इतर बहिणींच्या वाटचाला आलेली ही समजूत राणीच्या वाटचाला आली नव्हती. प्रतिक्षणी उद्‌भवणाऱ्या संकटाच्या व दुःखाच्या आघातानं तिला वेगळीच धारदार नजर लाभली होती. ती आता निष्पाप देवता उरली नव्हती. हाडामासाची खरी खुरी स्त्री बनली होती, चाणाक्ष चतुर कुलटा झाली होती. नाहीतरी दुसरं काय शक्य होतं तिला? ती अगदी असहाय, अगतिक झाली होती. परिस्थितीचा माणसावर परिणाम होतो. तिच्या दडपणामुळं तो बदलतो. तसं नसतं तर हजार शिरांचं हे जाळं परमेश्वरानं त्याला दिलंच नसतं.

रानोला संशय होताच. त्यानं नवीन कुर्ता मागितल्यावर तिची खात्रीच झाली. तिचं शरीर एकदम ताठ झालं. तिच्या नाकपुड्या रागानं थरथरू लागल्या. परंतु डोईवरील दुपट्टचाच्या पदरामुळं मंगलला ते दिसलं नाही. तिच्यातली नारी आपल्या पत्नी पदाच्या अधिकार रक्षणासाठी एका वेश्येच्या पातळीवर येऊन लढायला सिद्ध झाली. तिच्या नजरेच्या काठावर सलामतीची आकृती तिला दिसू लागली. आपल्या प्रियकराला सहज आकर्षित करणारा, तारुण्यानं मुसमुसणारा, अंगांगात गच्च भरलेला तिचा सुडौल देह रानोच्या डोळचांसमोर ज्वानीच्या भरात झुलत होता. तिच्या ताज्या टवटवीत शरिराला उटण्याची, मेंदीची अथवा अक्रोडच्या सालीच्या रंगाची काही जरूरी नव्हती. शिवाय मंगलवर, त्या दगडावर या प्रसाधनांचा काहीच परिणाम झाला नसता. तो खडकासारखा कठीण व उद्दाम होता आणि अशा खडकाशीच टक्कर घेण्याची त्याची मनीषा होती. तो स्वतः तलवार होता आणि तलवारीशीच त्याला भिडायचं होतं. रानोला हे माहीत होतं. त्यासाठी ती सिद्धही होती. तिनं ट्रंकेकडे तिरपी नजर वळवली. म्हणाली, 'पाहा त्या ट्रंकेत. तिथंच असेल तुझा तो कुर्ता.'

इतक्यात बाहेरून विद्येची हाक आली, 'ए–रानो,' तात्काळ रानो बाहेर आली. विद्याला तिनं बोलूच दिलं नाही. तिला बाहेर ढकलीत रानो कशीबशी म्हणाली, 'जा, विद्दो, जा, यावेळी निघून जा इथून.'

विद्या जाईना. हटेलपणानं तिनं विचारलं, 'का? अग का पण?'

रानोनं हात जोडले. 'तुझ्या आईबापांची, देवाची शपथ आहे तुला. जा तू इथून. आता काही विचारू नकोस.' ती कळवळून म्हणाली.

विद्या आश्चर्यानं थक्क झाली. मागं वळून वळून पहात ती घरी गेली.

रानो खोलीत परत आली. तोपर्यंत मंगलनं ट्रंक उघडून त्यातले कपडे अस्ताव्यस्त फेकले होते. त्याच्या हातात दारूची (माल्टाची) एक बाटली होती आणि डोळचात एक वेगळीच चमक.

'ही कुठून आली इथं?'

'काय ते?'

'हे' मंगलनं बाटली तिच्यासमोर धरली, 'ही मिठ्ठचा माल्टाची बाटली?'

'मला काय माहीत?' रानोनं बाहेर कुठं तरी पहात उत्तर दिलं. तिचं अंग किंचित कापत होतं. तिला फारशी लपवालपवी करण्याची गरजही पडली नाही. ढब्बू रडू लागला होता. त्याला हाकलण्याच्या निमित्तानं ती बाहेर आली. हात उगारून त्याला हाकलीत ती बोलली, 'हड, मेल्या. इथं कशाला कोकलतोस? जिथं तुला भाकरतुकडा मिळतो, मासमस्कंड मिळतं, तिथं जाऊन रड, जा.'

एवढ्या वेळात तिनं स्वतःला सावरलं. आत येत ती म्हणाली, 'तुझे भय्या पीत होते ना–'

'हो, पण–' मंगलनं आश्चर्यानं विचारलं, 'इतक्या वर्षापासनं?'

'पडून राहिली असेल. तेव्हापासून मी ट्रंकेला हातच लावलेला नाही,'

गोल गोल फिरवून मंगल त्या बाटलीकडं पहात होता, अजून त्याला खात्री वाटत नव्हती. अगदी हीच ती चीज, संध्याकाळपासून त्याला हिचीच तल्लफ आली होती. हीच वस्तू त्याला हवी होती. चित्त्याची उडी, दहा घोडचाची ताकद त्याला पाहिजे; आणि ती ह्या बाटलीत होती. त्याच्या मनाच्या क्षितिजावर एक सुंदर, तरुण, टवटवीत पोरगी उभी होती. बाहेर जाऊन त्यानं आकाशाकडं पाहिलं. ढग भरून आले होते. चंद्राला त्यांनी आपल्या रजईत लपवून ठेवलं होतं. कुठंतरी कडक ऊन पडलं होतं. साऱ्या पाण्याची वाफ झाली होती. म्हणून सरत्या भाद्रपदात मेघांच्या ह्या माळा कोटल्यावर भरभरून येत होत्या. कुठेतरी दिवसरात्रीची भेट होणार होती. ढगांतून डोकावणाऱ्या ताऱ्यांकडं बघून, रात्रीचा पहिला प्रहर अजून उलटलेला नाही याची मंगलनं खात्री करून घेतली आणि तो घरात परतला. आत आला तेव्हा तो पूर्वीचा मंगल उरला नव्हता. त्याच्या डोळचात एक विचित्र कठोरता भरली होती.

कधी कधी नसीबन्‌वाला अड्डचावर मी घेत असतो' मंगल आत येताना म्हणाला.

'माहीत आहे ते मला' रानो.

मंगलला आता कशाची पर्वा नव्हती. त्याला आश्चर्यही वाटले नाही. त्या बाटलीकडं पुन्हा एकवार त्यानं पाहिलं. दारूच्या मोहानं तो धुंद झाला. रानोच्या डोळचातलं वादळ, जलद होत जाणारा तिचा श्वासोच्छ्वास–काहीही त्याला दिसत नव्हतं.

'पण तुझ्यासमोर नाही पिणार' तो आपल्याच तंद्रीत बोलला.

'का नाही?' दचकून रानोनं विचारलं.

'तुला ते आवडत नाही ना ? वाईट वाटतं ना तुला ?'

राणीला म्हणायचं होतं, 'मी कशाला वाईट वाटून घेऊ ? माझा अधिकारच काय ?' परंतु कुणीतरी आतून तिच्या ह्या शब्दांचा गळा आवळून टाकीत होतं. पुन्हा तिचे डोळे कुलटेच्या डोळ्यासारखे तळपले. 'हो, तुला माहीत आहे.' ती बोलली, 'मला ती विषासारखी वाटते.'

रानोचा अंदाज खरा ठरला. अन् असंच व्हावं, मंगलनं असंच वागावं, असं तिला मनातनं वाटत होतं. मंगल भडकला. बाटली फिरवून आधी त्यानं तिचं बूच ढिलं केलं. चोरासारखं चौफेर फिरून वाकून पहात तो तिला म्हणाला, 'तुम्हा बायकांचं असंच असतं. खाण्यापिण्याची देखील बंदी करता आपल्या नवऱ्याला' मंगलचा संताप वाढला.

रानो आतून आनंदली. त्याच्या तोंडून 'नवरा–बायको' असे शब्द बाहेर पडले होते. शब्दांनी त्यांचा संबंध जोडला गेला होता तर! परंतु वरून रागावून ती बोलली, 'खबरदार! मी तुला पिऊ देणार नाही.'

रानोनं कल्पना केली होती तसंच झालं. मंगलनं बाटलीचं बूच काढून फेकून दिलं. खोलीत दारूची दुर्गंधी भरली. रानोनं एका हातानं दुपट्टा आपल्या नाकाशी धरला आणि मंगलच्या तोंडासमोर दुसरा हात तिनं आडवा केला. रानोचा आडवा हात बाजूला सारून मंगल म्हणाला, 'पिणार, जरूर पिणार मी.'

'अरे, तू तर तेव्हा आपल्या भावाला अडवलं होतंस. ती बाटली फोडून टाकली होतीस. मला सोडवलंस–'

'त्यावेळी तुझी दया आली होती मला.'

पुढचं सारं रानोच्या कल्पनेप्रमाणं घडत गेलं. मंगलनं तिचे हात हिसडून बाजूला केले. इतक्यात बडी घरात शिरली. त्या दोघांना इतकं जवळ जवळ पाहून, ती तिथंच अडखळून उभी राहिली. बाहेर आभाळ गडगडत होतं.

'जा तू तिकडं' तिला पाहून रानो ओरडली.

'जेवू खाऊ घालून झोपवून दे साऱ्यांना आत. मोठा पाऊस येणार आहे.'

बडी बाहेर गेली. जाताना तिनं दार ओढून घेतलं. सकाळपासून आईची मुद्रा ती निरखून पाहात होती, आणि त्याचा अर्थही थोडा थोडा तिच्या लक्षात येत होता.

रानो मंगलच्या हातातली बाटली हिसकून घेण्याचा प्रयत्न करीत होती. मंगल, परत परत तिला ढकलून देत होता. मंगलचे कठोर, राठ हात रानोच्या शरिराच्या सर्व भागाला स्पर्श करीत होते. प्रथम त्यानं थोडा संयम राखला. पण पाटाचं खरेदीखत झालं होतं ना? मग आता कसली दयामाया ? रानोचं सर्व शरीर तो मोडून तोडून काढीत होता. तिचे हात मुडपीत होता. एका हातानं तोंडाला बाटली लावून घुटके घेत होता, अन दम लागलेल्या स्वरात बोलत होता, 'नामर्द नाही मी आपल्या भावासारखा. मी कधीच बाईला शरण जाणार नाही.'

या हिसका हिसकीत, एक तृतियांश बाटली त्यानं कधीच संपवली. पुन्हा रानो त्याच्या अंगावर धावली, यावेळी त्यानं तिला हिसडा देऊन जमिनीवर पाडलं आणि तिच्या अंगावर बसून तो तिला बडव लागला. अगदी रानोनं मनात कल्पिल्याप्रमाणं.

ती वर उठण्याचा प्रयत्न करीत होती आणि मंगल तिला खाली दडपीत होता. मधूनच हातातली बाटली तोंडात रिचवीत होता. हळू हळू त्याचा चेहरा तांबडा लाल झाला, कानाकडे, डोळ्याकडे रक्त धावू लागले. रानोचा श्वास जोरजोरानं चालत होता. भात्याप्रमाणे तिची छाती उडत होती. तिच्या अंगात विलक्षण शक्ती होती. विजेप्रमाणं तिचं अंग उसळत होतं. तिला आवरणं मंगलला कठीण झालं. अशक्यच. रानो उठल्याबरोबर तिला त्यानं भिंतीवर धरून आदळलं. रानोच्या डोळ्यातून रक्ताची चिळकांडी उडाली. तिच्या पायांना तिचा भार पेलता आला नाही. ती जमिनीवर कोसळली. तिचे डोळे मिटले आणि तोंड उघडं पडलं. त्यातून फुटणारी किंकाळी रानोनं दाबली. तरी तिच्या मुक्या बंडाची चाहूल बाहेर जिंदाला लागलीच. तिनं विचारलं, 'काय आहे ग सूनबाई ?'

विचित्र आनंदानं बेभान होऊन बेशुद्ध होत चाललेल्या रानोनं उत्तर दिलं, 'काही नाही माई! मांजर–'

रानोला मूर्च्छा आल्यासारखं झालं. तिचं सारं शरीर सैल पडलं. हातपाय जड झाले. आपल्या कपड्यांचीही तिला शुद्ध राहिली नाही. जमिनीवर दारू सांडली होती. पाणीही असेल. राणीची शलवार पण भिजून चिंब झाली होती. आतापर्यंतच्या प्रकारावरनं हे समजणं कठीण होतं की, दोघांपैकी कोण दारू प्यालं होतं, नशा कोणाला चढली होती आणि कोणाची उतरली होती.

मंगल रानोजवळ बेभान अवस्थेत उभा होता. अजब, विलक्षण स्त्री आहे ही. इतका मार खाल्ला आणि तरीही ती म्हणाली, मांजर आहे. तो लज्जित झाला होता आणि कृतज्ञही.

मंगलनं आपली पगडी फाडली आणि तिच्या चिंध्यांनी तो रानोच्या जखमा पुसू लागला. चिंधीचा बोळा करून आणि आपल्या श्वासानं उबवून, त्याच्या वाफाऱ्यानं तो तिचं अंग शेकू लागला. त्या रात्री रानोनं जसं केलं होतं अगदी तसंच तो वागत होता. रानोला बरं वाटत होते. खूप खूप सुखावत होती ती. पण इकडं मंगलला रडू कोसळत होतं. त्या रडण्यात त्याला प्रायश्चित्ताचा आनंद मिळत होता. रडत रडत त्यानं रानोचे पाय धरले. ती त्याला धरून हळूहळू आपल्या छातीकडे ओढू लागली. त्याच्या शरीरावरून कोमलपणे हात फिरवू लागली. जणू तिच्याऐवजी मंगललाच मार बसला होता.

'माफ कर, माफ कर मला' मंगल तिला सारखा विनवीत होता.

'शपथ घे. वचन दे पुन्हा पिणार नाही म्हणून.' रानोनं त्याला आपल्या हृदयाशी कवटाळीत म्हटलं. पण लगेच कसलीतरी भीती तिच्या मनात दाटली. म्हणून चटकन ती पुन्हा म्हणाली 'वचन दिलंस तर आज तुला मी आपल्या हातांनी पाजीन.'

'देतो. वचन देतो मी' मंगल उत्तरला. मग त्याला हेच आठवेना की, आपण कशाचं वचन दिलं आहे.

रानो हळूच उठली आणि बाहेर गेली. मंगल उठून बसला आणि बाहेर भांड्यांवर बरसणाऱ्या जलधारांचा जलतरंग ऐकू लागला. बडीनं जेवूखाऊ घालून सर्वांना आत नेऊन अगदी शांत झोपवलं होतं. मानवानं व निसर्गानं मिळून रचलेल्या या कारस्थानात ती देखील जणू सामील झाली होती. चुलहा भिजू नये म्हणून त्याच्यावर रानोनं आधी एक जाडसं कापड आंथरलं आणि नंतर जेवण घेऊन ती खोलीकडे वळली.

राणी आत आली. तिच्या हातातल्या ताटात चपात्यांची चळत होती. दुसरीकडे मटणचॉप आणि कांद्याच्या फोडी. आधी चॉपाकडं आणि नंतर राणीकडं त्यानं विस्मयानं पाहिलं त्याच्या तोंडाला पाणी सुटलं. रानोनं दारूचा ग्लास भरून त्याच्या हातात दिला. मंगलचा आपल्या डोळ्यावर विश्वासच बसेना. खात्री करून घेण्यासाठी, जेवणावरील आपली नजर तो घडीघडी रानोकडं वळवीत होता. तिच्या डोळ्यांचेही तसेच प्याले झाले होते. त्याला नकार देता आला नाही. ग्लास हातात घेत तो म्हणाला, 'यानंतर पुन्हा प्यालो तर समज मी गोमांसच खाल्लं."

त्यानं ग्लास तोंडाजवळ नेला. रानोनं त्याला मधेच थांबवलं. म्हणाली, 'थांबा.' तिला कसली तरी आठवण झाली. ती खोलीबाहेर जाऊन थोड्या वेळातच परत आली, तेव्हा तिच्या हातात एक फुटकी बशी होती. त्यात टॅमॅटोच्या कापलेल्या चकत्या होत्या– लालभडक आणि हृदयाच्या आकाराच्या !

ग्लासातले घोट घेत घेत मंगलनं जेवायला सुरूवात केली. रानो मूकपणे अश्रू ढाळीत होती. नशीबनवाल्या अड्ड्यावर असा आनंद त्याला कधीच लाभला नव्हता. डोळे पुशीत थरथरत्या हातानं रानोनं त्याच्या प्याल्यात आणखी दारू ओतली. त्यानंतर पुन्हा थोडी – आणि त्याची धुंदी राणीलाच चढली. राणीला ! संकोचण्याऐवजी तिची सारी गात्रं फुलून आली. आधी तिचा जाळीदार दुपट्टा गळाला. मग कुडत्याचे बंद तुटले.

त्याचवेळी मंदिरातल्या घंटा घणघणताना ऐकू आल्या. मशिदीतल्या मुल्लाची अजाँ कानावर आली.

"हट ! " तो आवाज ऐकून मंगल उद्‌गारला.

"हट काय ?" रानोनं विचारलं.

"हेच ते " मंगलनं आपला थरथरता हात जेहलम बागवाणीच्या घराकडे वळवला. चाचरत बोलू लागला. "हे–ते मुल्ला, ते पंडित " तो धडपडत उठला. दरवाजापर्यंत गेला, बाहेर गुडुप अंधार होता. अडखळत तो पुन्हा आपल्या जागेवर आला. आपली सगळी शक्ती एकवटून तो समोर पाहू लागला. तिथं रानो उभी होती. पौर्णिमेचा चंद्रमा. ते अधीर चंद्रबिंब आता पूर्ण झालं होतं. ढगाचं पांघरूण ओढून, फाडून टाकून ते खाली धरणीवर उतरलं होतं.

मंगल उठून उभा राहिला. श्वास रोखून तो पाहू लागला. कष्टानं अडखळत म्हणाला, "हे कपडे कशाला तुझ्या अंगावर ?"

रानोनं आपला जुना, फाटका जाळीदार दुपट्टा उचलला आणि दोन्ही हातांनी मंगलच्या आणि आपल्यामध्य तो ताणून धरला." घे, काढून टाकले !"

आपल्या उंचावलेल्या दोन्ही हातात तो झिरझिरीत दुपट्टा तसाच धरून रानो एका अंगावर वळली. नारीच्या रूपाचं तिसरं परिमाण आता मंगलच्या नजरेसमोर उभं होतं–आणि गव्हाची रोटी खाणाऱ्या कुणाही पुरुषाला ते आकर्षण अनावर ठरलं असतं. तितक्यांत राणीनं आळस दिला. आळसावलेला आणि आळोख्यापिळोख्यानं वाकवेला तो गोरापान देह आणि ती लालसर जांभई ! वर्षाचे बावन्न आठवडे आठवड्याचे सात दिवस, दिवसाचे आठ प्रहर, प्रहराचे तास आणि पळे–त्यात एखादाच असा क्षण येतो की, जेव्हा चंद्रच सूर्याला संपूर्णपणे ग्रासून टाकतो.

मंगलच्या चेहऱ्यावर लाल काळे रंग उडाले त्याचे डोळे झाकले गेले. त्याचं सारं शरीर रोमांचीत झालं. ते रोमांच कधी पावसाच्या भीतीनं लपत होते तर कधी उग्र धारात भिजण्यासाठी आतूर होऊन बाहेर डोकावत होते. श्रावण-भाद्रपदात नेहमी पाऊस पडतो परंतु जुने वृद्ध लोक असं सांगतात की, भाद्रपद आणि आश्विन यांच्या संधिकालात, दिवसरात्रीचे जेव्हा मीलन होते तेव्हा देवीच्या कोठल्यावर पाऊस पडतोच पडतो–आणि तो देखील शिळंधार ! आपल्या आंधळ्या बापाप्रमाणं चाचपडत पुढं होऊन मंगलनं रानोला आपल्या बाहूंत ओढलं, हृदयाशी घट्ट आवळून धरलं. एका क्षणात दोघांचे देह उन्हात तळपणाऱ्या केशराच्या शेतातून विहार करू लागले. जलद जलद होत जाणारा त्यांचा श्वासोच्छ्‌वास न–परतीच्या संकेत स्थळाकडे अजून जाऊन पोहचला नव्हता. त्यापूर्वीच मंगल म्हणाला. "आज तू किती सुंदर दिसतेस ग वहिनी !"

## : ९ :

दारात उभी राहून, सलामती पावसावर संतापत होती. आपल्या गालावर हळूच चापटया मारून घेऊन तोबा तोबा करीत होती. त्याच हातांनी, मधूनच, कुल्ल्यावर थपडा मारीत लांब लांब सुस्कारे टाकीत होती. चुकून खूप तिखट खाल्ल्याप्रमाणे हुस हुस करीत होती. पाऊस सारखा कोसळत होता–मुसळधार. आणि मंदिरातल्या घंटांचा आणि मुल्लाच्या अजाँचा नाद धारांतून घुमत दूर दूर जात होता; विरत होता. पुजाऱ्यांना व मुल्लांना सलामती मनातल्या मनात शिव्या देत होती, हा मानवी देह या धर्ममार्तंडांनी घडविला नव्हता. तरी ही ते त्याचे अस्तित्त्व नाकारीत होते; त्याला दोष द्यायला नेहमी तयार होत होते.

रात्रीचा दुसरा प्रहर संपला होता. अजूनही मधून मधून पावसाच्या सरी पडतच होत्या. शाळेच्या पडवीत, उसाच्या मळ्याजवळ उभा राहिलेला मुराद आभाळाकडे पाहात त्रासून उद्‌गारला, "अरे यार, ही औरत म्हणजे नुसती बकवास आहे."

खलीफाने त्याचीच री ओढली. अल्लादाद आणि मलुवा यानीही त्याला दुजोरा दिला. मग सर्व आपल्या लाठ्या, बर्च्या, कुऱ्हाडी सावरीत भिजत घराकडे निघाले. त्यांची शरीरे पावसानं भिजून आतल्या मांसापर्यंत थंडगार झाली होती. "वाचला शिखडा साला " असे म्हणत ते आपापल्या घराकडे वळले.

हताश मुराद घरी परतलेला पाहून, खाटेवर झोपलेली सलामती आपल्या अवघडलेल्या अंगाला आळोखेपिळोखे देत पुटपुटली. "या अल्ला, फार उपकार आहेत."

## : १० :

सूर्यानं आपलं तोंड विरळ ढगांनी झाकून घेतलं होतं. रात्रभर श्रम करून थकलेला कुणी गरीब अनाथ माणूस आपली जुनी फाटकी

चादर पांघरून, आकाशाच्या गढीत जणू स्वस्थपणे झोपला होता.

गार, मंद झुळका वाहात होत्या. लोबनार आणि कोटनार आणि पामीर व सुलेमान या पर्वताच्या प्रदेशातून इवले, इवले पांढरे शुभ्र पक्षी त्या वाऱ्याच्या खांद्यावर बसून डौलात झुलत येत होते. हजारो मैल दूर, लांब कुठे तरी, कधी तरी, मुलांनी काळाच्या प्रवाहात सोडलेल्या कागदाच्या होड्याच या वाऱ्यात वहात येत होत्या! नाहीतर, टाळ मृदंगाच्या गजरात, शतकानुशतके, भक्तजनांनी जो नैवेद्य भक्तिभावाने देवीला अर्पण केला होता त्याचा प्रसाद, लहान लहान तबकात भरून, ती अंबा आज आपल्या लेकरांना पाठवीत होती!

दिवस रात्रीचा संयम सुटला होता. रात्री लांब झाल्या होत्या. पराभूत होऊन, रात्रीपुढे लज्जित झालेला सूर्य ढगांच्या पडद्यातून आपले तोंड बाहेर काढून पृथ्वीकडे पाहात, हसत होता. त्या स्मिताचे रंग पारव्यांच्या, भारद्वाज पक्ष्यांच्या पंखावर विखुरले; आणि त्यांच्या गतीत एक नवीन मस्ती आली. लिंबाच्या डहाळ्यातून झुलत, आपल्या तनूचा भार तोलीत उडणाऱ्या, पांखरांच्या कंठातून सहज फुटलेली सुरेल सुगंधित तान वाऱ्यात मिसळली. बिबलं, जांभूळ आणि वठलेल्या पिंपळाच्या झाडांनाच फक्त सूर्यानं आपलं म्हटलं नाही, तर बाभूळ आणि कोरफडीच्या अंगावर उठलेल्या काट्यांना-देखील त्यानं प्रेमानं कुरवाळलं आणि धरणीचे अश्रू त्यानं चुंबून घेतले.

पृथ्वीच्या आसवातून लपलेलं हास्य जेव्हा शेतकऱ्यांच्या दृष्टीस पडलं तेव्हा त्यांनी आपली औतं आनंदानं थांबवली; आणि ह्या तृप्त, समृद्ध व मस्त पिकाला त्यांनी 'खरीफ' हे नाव दिलं. लहान लहान मुलांनी तुतीच्या झाडाच्या कोवळ्या डहाळ्या तोडल्या आणि त्यांची धनुष्ये करून त्यांनी नेमबाजीचा खेळ मांडला. त्यांच्या बाणांना कसलंच लक्ष्य नव्हतं. पंडितांनी देवळातून आणि मुलांनी मशिदीतून आपल्या अभिलाषांच्या अश्वमेधाचे घोडे सोडले आणि सारी सृष्टी कामनारत झाली.

मंगलनं आपल्या घोड्याचा साज बाहेर काढला. तिची कलगी सजविली. रानोनं चुलीवरील कापड काढून घेतलं. ती ओली चूल चांगली पेटावी म्हणून तीत कोळसे आणि लाकडं घातली. रात्रीच्या मिळकतीतला एक रुपया तिनं बडीच्या हातावर ठेवला आणि चांगलं साजूक तूप आणण्यासाठी तिला दुकानात पाठवलं. शाळेत दोन मुलांची परीक्षा होती म्हणून लहान चुंमू, बटाटे व मुळे आणण्यासाठी जेहलम बागवानणीच्या घरी गेला. तेव्हा त्यानं सलामतीला पाहिलं. तिनं दुपट्ट्यानं आपलं कपाळ आवळलं होतं आणि कानशिलावर पिठाच्या टिकल्या लावून ती डोकं धरून बसली होती.

बटाटे आणि मुळे विकत घ्यायला आलेल्या चुंमूला पाहून ती म्हणाली, 'आज काय आहे रे तुमच्या घरी? बटाटा मुळ्याच्या भरलेल्या रोट्या होताहेत त्या!

'रोट्या नाही परोठे' चुंमूनं ऐटीत सांगितलं. आईनं आज चूल पेटवली आहे.'

जेहलम शलगम धूत होती ती मधेच थांबली. आणि चुंमूला म्हणाली, 'वा, वा! आज तुझ्या आईनं चूल पेटवली का?'

'हो' चुंमू जोशात मान हलवून म्हणाला, 'तुम्हाला परोठे पाहिजे असतील तर तुम्हीही या, नाही तर सलामतीला पाठवा.'

ते पोर भाजी घेऊन गेल्यानंतर, जेहलम इनायती आणि आयेशा या तिघी जणी किती तरी वेळ हसत होत्या. सलामतीला बरं नव्हतं. ती त्यांच्याकडं जळत्या नजरेनं पाहात होती.

परोठ्यांचा सुगंध घरभर पसरला होता. हुजरासिंग आणि जिंदाच्या तोंडाला पाणी सुटलं. तो म्हणाला, 'परोठे जरा नरम होऊ दे ग सूनबाई. माझे दात हलतात ना आता?' जिंदालाही धीर उरला नव्हता. पण ती म्हणाली, 'यांना खाण्याशिवाय काही सुचतच नाही. रानोनं गरम गरम परोठे एका स्वच्छ फडक्यात बांधून मंगलच्या हाती दिले. त्यानं धुंद नजरेनं त्याच्याकडं पाहिलं आणि अंगणाकडे बोट दाखवीत म्हणाला 'आज तुला खूप कष्ट करावे लागणार आहेत नाही का?'

'हूं' रानोनं खाली जमिनीकडं पाहात उत्तर दिलं. लाजऱ्या नजरेनं त्याच्याकडे पहात ती म्हणाली, 'नाही तरी आम्हा स्त्रियांचा जन्मच त्याच्यासाठी असतो.'

मंगल, नशीबन्वाला अड्ड्यावर जायला निघणार इतक्यात कशाची तरी आठवण झाल्यासारखं करून राणी म्हणाली, 'थांबाना'

मंगल तिथंच थांबला. राणी धावतच त्याच्याजवळ गेली व हळूच म्हणाली, 'दोन शलवारीचं कापड आणा माझ्यासाठी. आता सणवार येताहेत.'

याला मंगलनं अजून काहीच उत्तर केलं नव्हतं, तोच आपल्या वक्षस्थळांकडं खूण करीत ती बोलली, 'सगळ्यांच्याकडं आहे हे. फक्त माझ्याकडेच नाही' अन् मग मान एकीकडे वळवून तिनं नुसतंच स्मित केलं नाही, तर चांगली खळखळून हसली,

'बरं पाहू' मंगलनं हसत उत्तर दिलं.

'पाहू बिहू काही नाही' रानोच्या स्वरात आता संकोच नव्हता. 'मग काय सर्वासमोर मी शलवारी शिवायच हिंडू होय?' अन मग थोडं थांबून म्हणाली, 'बरं माझं काय जातंय?'

मंगलनं घाईघाईनं मान हालवली. आपल्या अधिकारावर दुसऱ्याचं आक्रमण होणं त्याला मुळीच पसंत नाही, असंच जणू त्याला सुचवायचं होतं. आपल्या तोंडाचा चंबू करून रानो त्याला सांगू लागली, 'चन्नोचं पाहाना, तिच्या घरधन्यानं काळा रेशमी सूट शिवला आहे. तिच्या गोऱ्या गोऱ्या अंगाला किती शोभून दिसतो तो! काळभोर मऊ मऊ रेशीम–'

मंगल विचारात पडला.

रानो त्याच्या आणखी जवळ आली. आणि त्याच्या सदऱ्याचं टोक धरून म्हणाली, 'तुम्ही आज पसरूर, पसरूर नाहीतर गुजराण वाला, नाहीतर सियालकोट, सुभाडचाल इथल्या सवाऱ्या पहा ना? मुलंदेखील कुडतं कुडतं करतायत.'

मागण्यांच्या या गोड-आंबट भाराखाली तो अगदी दबून गेला. घोडीचा तुरा खाली पडला होता. तो घोडीच्या डोक्यावर पुन्हा बसवीत मंगल रानोकडं पाहात होता. ती सदऱ्याचं टोक धरून अजून तशीच उभी होती. जशी मंगलनं तिची काही चोरी केली होती, किंवा तिचं कसलं कर्ज त्याला फेडायचं होतं.

'बरं बाबा, बरं' असं म्हणत मंगल आपला सदरा सोडवून घेऊन पुढं निघाला. आळसावलेली रानो, चौकटीच्या कोंदणात,

जडवल्यासारखी, त्याच्याकडे पाहात नेहमीप्रमाणे उभी राहिली. परिपूर्ततेच्या आणि कर्तव्यपालनाच्या त्या एका रात्रीत आणि अर्ध्या दिवसात, कितीतरी वर्षांची समृद्धी पतीनं तिच्या पदरात आणून टाकली होती. त्याच्याकडे पाहता पाहताच रानो एकाएकी दचकली— गोंधळली. हा तिलोका की मंगल ? नाही, मंगल—मंगलच. परंतु हा मंगल—तो मंगल नव्हता. चन्नोनं तिच्याजवळ लग्नाची गोष्ट काढली होती—त्या दिवशी वारिसशाहाची गीतं गात चालला असताना, ज्याच्यावर गल्लीतल्या वानरांनी हल्ला केला होता, तो मंगल हा नव्हे. हा मंगल गप्प होता. मूक होता. त्याचे रुंद खांदे प्रेमाच्या भारानं वाकले होते. म्हणूनच तो आज आपल्या वडील भावासारखा दिसत होता.

तो चालला होता. गल्लीतली वानरं आज दूर उभी होती. गावापलीकडचे काळे कोस एकमेकांत गुंतून गेले होते. हे वेडेवाकडे वळणाचे रस्ते कुठे चालले होते ? कुठेही जातील ते, त्यांचा नेम नाही. परंतु एक गोष्ट मात्र निश्चित होती. या रस्त्याच्या धुळीत, त्यांच्यावरल्या चिखलात या दोघाही मंगलांचा घाम, रक्त सांडलं होतं, त्यात जिरून गेलं होतं. शिवाय या रस्त्याच्या गुंतावळीत एक रस्ता असा होता की, जो प्रत्येक पशूला आणि प्रत्येक माणसाला, संध्याकाळ होताच, सांभाळून आपापल्या घरी घेऊन जाणार होता.

दूर नजरेच्या पलीकडे धुक्यात मंगल दिसेनासा होताच रानो घरात परतली. तिची पावलं, आज एका नव्या विश्वासानं जमिनीवर पडत होती. प्रत्येक वस्तू आज तिला सुंदर दिसत होती. चिखलानं भरलेलं अंगण स्वस्छ, सुंदर करून, त्याला पुन्हा आतिथ्यशील बनवणं तिला आता मुळीच अवघड वाटत नव्हतं.

## : ११ :

या वर्षी इतके यात्रेकरू कोटल्याला येतील, अशी कुणाचीच अपेक्षा नव्हती. यंदा पर्वतावर अवेळी बर्फवृष्टी होईल आणि अंबा भवानी आपल्या सर्व भक्तांची कोटल्याकडे रवानगी करील आणि त्याप्रमाणं पसरूर, गुजरानवाला, सब्बडवाल, सियालकोट, सत्तो आणि सतराहचे सारे यात्रेकरू इकडे धाव घेतील अशी कुणाचीच कल्पना नव्हती. आज लॉऱ्या, बसेस, तांगे, एक्के, बैलगाड्या सर्व वाहनं इकडं माणसांनी भरभरून येत होती.

आपली घरं पैशांनी भरतील आणि त्यांच्या छपरावर सोन्याचा पाऊस पडेल याची कोटल्यातील रहिवाशांपैकी कोणालाच कल्पना नव्हती. दिवाणेशाहाचा सर्व माल संपेल, जाटाचं तूप, खैरेचं तेल व जेहलमचा भाजीपाला खपून जाईल किंवा मंदिराच्या कळसावरची गर्विष्ठ कबुतरं गावाच्या गल्लीत उतरून येतील आणि त्यांच्या प्रेमाचे 'गटरगुं'चे गीत, चोवीस तास चालणाऱ्या चक्कीच्या 'कूं—कूं' आवाजात हरपून जाईल, तसंच धर्मशाळा, सराया, जमीनदारांच्या हवेल्या, लगीनघरं सारी माणसांनी भरून वाहू लागतील, तीळ ठेवायला कुठं जागा उरणार नाही, आणि लोक एकएका खोलीचं वीस वीस रुपये भाडं देतील असं स्वप्न तरी कुणाला पडलं होतं का ? सोनाराच्या बाळ्या, तांबटाच्या थाळ्या, चिरागच्या चिमण्या, आणि कुंभाराचे घडे, सुरया, सर्व हातोहात उडालं. वडावर पान राहिलं नाही की झाडावरल्या पोळ्यात मध उरला नाही. तरीही यात्रेकरूंचे मेळे गात नाचत येतच होते. त्यांचे डफ झडत होते, झांझा खणाणत होत्या. भाविकांच्या भजनाचे सूर वाऱ्यात उमटत होते—

'बचाना है तो बचालो अंबाजी
पापियोंके बचानेकी यही वेला है'

वर्षाच्या या काळात कोटल्यातील स्त्रिया, वरून सूक्ष्म आणि खालून स्थूल का होतात याचा कुणालाच पत्ता नव्हता. कुणी म्हणे, सरत्या उन्हाळ्यामुळं असं झालं, तर कोणी सांगे, येत्या हिवाळ्यामुळं असं होतंय; आणि सर्वजण खदखदून हसत. गावातल्या गजगामिनी हातात तबक, तबकात फुलं, पंचपाळं आणि पंचपाळ्यात हळद-कुंकू अशा थाटात मंदिराकडं जायला निघत. आपल्या मस्त चालीत चालता चालता, मध्येच कुल्ल्यावर हात ठेवून त्या उभ्या रहात, तेव्हा ज्ञानचंद, केशरसिंह, रूल्दू आणि दिवाने यांच्या नाड्या सुटायच्या आणि त्यापुढं निघून गेल्या म्हणजे हे कुठं शुद्धीवर येत आणि ओरडत, 'हाय हाय !'

आज रथयात्रेचा दिवस होता. हुजुरासिंग आणि जिंदादेखील आज घराबाहेर पडली होती. परंतु रानो घरीच होती. त्यामुळं बडीही बाहेर गेली नव्हती. या रथोत्सवात तरण्याताठ्या मुली आणि जान जवान पोरं यांची गर्दी होई. त्यात जाणं तरुण पोरींना धोक्याचं होतं. रानो पाटचावर कसला तरी लाल लाल पदार्थ वाटीत होती. आणि बोटांनी निपटून तो वाटीत भरीत होती. भिजवलेल्या बेसनात मिरच्यांच्या हिरव्या शेपट्या आणि आलूच्या चकत्या दिसत होत्या. चुलीवर कढई चढवली होती आणि तिच्यातलं तेल उकळू लागलं होतं. इतक्यात काळा रेशमी सूट घालून आणि खांद्यावर गुलाबी दुपट्टा फडकावीत चन्नो आत आली. काळ्या कमीजामधून डोकावणारं तिचं गोरं गोरं वक्षस्थळ, विश्वातल्या छायाप्रकाशाचं रहस्य समजावून सांगत होतं. सैंपाकघरातच रोवून बसलेल्या रानोला चन्नोनं विचारलं, 'आजदेखील तू घरातच मरणार आहेस का ? नवरा—गिळी मेली.'

रानोनं नुसतीच मान हलवली. तशी चन्नो रानोच्या आणखी जवळ आली. आणि म्हणाली, 'बाहेर साऱ्या गावगंगा गोळा होऊन तुझ्या नावानं शंख करताहेत. अन् तू इथं काय करीत बसली आहेस ?'

चन्नोची नजर रानोच्या फुलाफुलाच्या रेशमी सलवारकडं गेली. 'अस्सं आहे होय' चन्नोनं मान वेळावीत तिच्या अंगाला हात लावला. तिच्या कचाटचातून सुटण्यासाठी रानोनं कढईत एक बोटी सोडली. रानोचे हात वर होताच, तिच्या कमीजामधून गोल, सुडौल टोकदार असं काही तिला दिसलं. तिनं पुढं होऊन तिच्या कुडत्यात झटकन आपला हात घातला आणि तसाच झटकन बाहेर काढून घेऊन, तो झटकीत ती ओरडली, 'अग आई ग ! मेले, मेले !'—जसा काही धगधगत्या निखाऱ्यावरच तिचा हात पडला होता. मग हळूच म्हणाली, 'मंगल तुझ्याशी आता नीट वागू लागलाय वाटतं ?'

रानो काहीच बोलली नाही. पाटचावर वाटलेली चटणी तिनं बोटानं घेऊन चाखली आणि ती मिटक्या मारू लागली.

'हे काय ?' विस्मयानं चन्नोनं विचारलं. नीट निरखून पाहिलं. पाटचावर आंबट-गोड चटणी होती. रानोचे डोळे विस्फारले. ती चटणी तिनं देखील बोटानं घेऊन चाखली. आणि 'हुस्स हुस्स' करीत पुढं होऊन, रानोचे खांदे घुसळीत ती बोलली, 'अग मेले ! बरीच आहेस की !'

'ऊंऽऊं' 'हांऽहां !' करीत, राणी तिच्या हातातून स्वतःला सोडवून घेऊ पाहात होती.

'खरं सांग.' चन्नो म्हणाली, 'नाही तर माझा मुर्दाच पाहशील उद्या. शप्पथ आहे माझी तुला. खरं सांग'

रानोनं डोळे मोठे केले आणि बडी समोर बसली आहे असं खुणेनं सुचवलं. नंतर हळूच तिच्या कानाशी तोंड नेऊन उद्गारली, 'हूं !'

चन्नो आनंदानं शहारली. एक हात डोक्यावर अन् एक कमरेवर घेऊन तिनं स्वतःभोवती एक गिर्की घेतली अन् भर्रकन घराबाहेर धावत निघाली, ती सर्वांना हाका मारीतच 'ए सरूपा, अहो पुरोकाची, विद्या – अगं कुठं मेलात तुम्ही साऱ्याजणी ?'

ज्या घाईनं ती धावत बाहेर आली, त्याच घाईनं मंगल बाहेरून आत धावत येत होता. दारात दोघांची टक्कर झाली. चन्नो भिंतीवर जाऊन आदळली. मंगलची पगडी उडून खाली पडली. त्याच्या केसांची गाठ सुटली. काहीसं हसत आणि काहीशा रागानं त्याच्याकडे पाहात चन्नो म्हणाली, 'आंधळा कुठला ! दिसत नाही वाटतं ? सारेच धृतराष्ट्राच्या कुळातले दिसतात.'

'पण चन्नो'–खाली पडलेली पगडी उचलून घेत, मंगल तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करीत होता. तोच चन्नो तिथून पळून गेली. मंगलनं आपल्या केसांची गाठ बांधली. पगडीवरची धूळ झटकीत त्यानं हाक मारली, 'रानो–'

समोरच बसलेली रानो दचकली. आज पहिल्यांदा त्यानं तिला नावानं हाक मारली होती. त्याला राणीही म्हणता आलं असतं. परंतु त्यानं रानो म्हणून हाक मारली. त्याला काहीतरी विशेष कारण असलं पाहिजे. रानोनं मंगलकडं पाहिलं. एवढ्यात तो तिच्याजवळ येऊन उकिडवा बसला. जणू त्याला काहीतरी गुप्त गोष्ट सांगायची होती

'ऐकलंस रानो, कमाल झाली. हद्द झाली अगदी.'

राणी मनातल्या मनात हसत होती. ती हळूच म्हणाली, सांगा ना ! आधी तुम्ही सांगा. नंतर मला देखील तुम्हाला काही सांगायचंय.'

'काय सांगायचंय ?'

'पण आधी तुम्ही सांगा.'

आता मंगल ती गोष्ट सांगणार, इतक्यात तिची नजर बडीवर पडली. ती दाराजवळ बाहेर दृष्टी लावून उभी होती. पण तिचे कान आईवडिलांच्याकडेच लागले होते. बडीकडं पाहात मंगल तिला म्हणाला, 'बेटा, तू थोडी आत जा बरं.'

लहान तोंड करून बडी घरात गेली. मंगल सांगू लागला, 'यात्रेकरून एक तरुण पोरगा आहे, पंचवीस-सव्वीस वर्षांचा असेल. जवान गबरू आहे नुसता. उस्कयाच्या मुत्सद्यांचा मुलगा. जमिनी, घरं दुकानं – चांगली जायदाद–'

रानोच्या डोळ्यांतलं तेज किंचित मंदावलं. ती म्हणाली, 'मग तो तर–'

'अग, ऐकून तर घे आधी,' मंगल तिला अडवीत बोलला, 'तो म्हणतो मी लगीन करीन तर या बडीशीच करीन. दुसऱ्या कोणत्याही मुलीशी करणार नाही.'

'नाही !' राणीनं हातातलं काम टाकलं. तिचा विश्वासच बसत नव्हता.

'तुझी शपथ.' मंगल म्हणाला. आज पहिल्यानंच तो रानोची शपथ घेत होता. रानोची छाती धडधडू लागली. शलवारीच्या बुट्टयातून तिचे पाय कापत होते. स्वतःला सावरीत तिनं विचारलं, 'त्यानं बडीला पाहिलं आहे ?'

'पाहिलं असेल. कदाचित नसेलही पाहिलं.'

'पाहिल्यासवरल्या शिवायच ? कसं शक्य आहे ते ?'

'मला काय माहीत ?' मंगल म्हणाला, परंतु गावचे पंच, सारेच असं म्हणताहेत. अन् तुला तर माहीत आहे – पंचात परमेश्वर असतो.'

'खरं आहे.' राणीला पटलं ते. 'पंचात परमेश्वराचा वास नसता तर, आज मी कुठं असते कुणाला माहीत !'

मंगलला जोर मिळाला. तो पुढं म्हणाला, 'सारे म्हणतात तुझी बेटी राज्य करणार आहे, मोठी राणी होणार आहे– म्हणजे तुझ्यासारखी नाही. तू नुसती नावाचीच राणी आहेस. ती खरीखुरी राणी होणार आहे.'

रानोला आता हे असह्य झालं. तरी मंगलनं आपलं बोलणं चालू ठेवलं, "देण्या-घेण्याचाही काही प्रश्न नाही. तो तर नकोच म्हणतोय." इंथ कसली तरी शंका त्याच्या मनात आली. तो किंचित् थांबला, आणि पुन्हा बोलू लागला, "म्हणजे याचा अर्थ असा नाही की, मी काहीच करणार नाही. माझ्या शक्तीप्रमाणे मी आपल्या बेटीला देईन. वाचवून थोडंच ठेवायचंय मला ?"

"आपली बेटी" राणीचा आपल्या कानावर विश्वासच बसेना.

"रानो, मी तिच्याकरिता स्वतःला विकून देखील घेईन." तो बोलतच होता; "तिच्याकरिता माझी घोडी, तांगा सारं विकायला लागलं तरी मला त्याची पर्वा नाही." बोलता बोलता मंगलला काही आठवलं. त्यानं विचारलं "पण तू काय सांगणार होतीस मला ?"

"काही नाही." रानो म्हणाली, "सुरभा दाईला एकदा बोलावून घ्यावं म्हणत होते मी. अत्तापासूनच सर्व ठरवून ठेवलेलं बरं !"

"सुरभा दाई !" मंगलनं तिच्याच शब्दांचा पुनरुच्चार केला. अन् मग त्याच्या लक्षात आलं. त्याचे डोळे विस्तारले. राणीकडं पाहात त्यानं विचारलं, "खरंच ?"

राणीनं हलकेच मान डोलावली. आणि लाजून दुसरीकडे बघत ती मंद हसत राहिली. इतक्यात चन्नो, पुरो, भाभी, विद्या, जानकी, स्वरूपा, छोटी रानी, चंडी स्त्रियांची एक पलटणच गात, नाचत, टाळ्या वाजवीत आत घुसली.

"चूडेवाली बांह कडडके
मुंडा मोह लिया नवीतावाला"
(चुडेमंडित हात दाखविला आणि ताईतवाला मुलगा मोहविला.)
दमडीका सक्क मलके
मुंडा मोह लिया नवीतांवाला

(दमडीचा रंग ओठाला लावला आणि ताईतवाला पोरगा मोहविला.)

हात उंचावून मंगलनं त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला. "चन्नो चाची–"

पूरनदेवीनं पुढं होऊन मंगलला धक्का दिला आणि म्हणाली. "अरे जा, जा, मोठा आला आहे–"

"नवरदेव मेला," चन्नोनंही एक धक्का दिला.

"जा, कुठेतरी पुरून घे स्वतःला." विद्या बोलली, "इथं बायकांत काय काम आहे तुझं."

"अगदी निर्लज्ज आहे." पुरो म्हणाली–

"तुझं काम तू पूर्ण केलंस, जा, तांगा हाक जा आता," आणि मग रानोकडं वळून ती बोलली, "अगं, मुलगाच होऊ दे, नाही तर आणखीन एक-संकट उभं करशील पुन्हा." एका मागून एक बाया आत येत होत्या आणि धक्का देऊन मंगलला बाहेर ढकलीत होत्या. ह्या धक्क्यापासून मंगलला वाचवताना रानो रडतही होती अन् हसतही होती. "थांबा, थांबा मेल्यांनो, पुरे करा. अरे देवा, मारून टाकता की काय माझ्या दादल्याला." दोन्ही हातानी डोक्यावरची पगडी सावरीत मंगल बाहेर चालला होता. आपली इज्जत वाचवू पहात होता. दाराकडे जाता जाता, तो ओरडत होता. "चाची– चन्नो–चाललो, चाललो, तोबा तोबा··अरे बापरे." पगडी सांभाळीत, धडपडत तो घराबाहेर पडला,

आता काय, बायकांना सर्व अंगण मोकळं मिळालं, त्या बाहू उभारून राणीभोवती, फेर धरून नाचू लागल्या, गाऊ लागल्या–

पुदीनेकी करो कडाही रे
हमारा अच्छा करारा दुदीना–हो
मसालोवाला पुदीना –हो

त्या आनंदाने वेड्या झाल्या होत्या. त्यांच्या नाचाची लय सारखी वाढत होती. त्या गलक्यांत कुणाचं बोलणं कुणाला ऐकू येत नव्हतं. तरीही रानोनं पुरोला एकीकडे ओढीत नेऊन सांगितलंच. "धन्यवाद चाची तुम्हाला?"

"धन्यवाद कशाबद्दल?"

"बडीला वर मिळाला"

बडी दारातच उभी होती. मिर्चीसारखी लाल लाल होऊन ती आत पळाली–आणि त्या बायका ज्यांच्या दृष्टीच्या क्षितिजावर खाली वर, इकडे तिकडे चोहीकडे नवरदेवच नवरदेव असतात. ज्यांचे कान नेहमी सनईचे सूर ऐकायला अधीर असतात आणि ज्यांचे डोळे वरातीच्या दर्शनासाठी सदा उत्सुक असतात–त्या बायका ही बातमी ऐकताच हर्षाने वेड्या झाल्या. त्यांच्या डोळ्यापुढं बडीची बरात दिसू लागली होती. सनईचे सूर त्यांच्या कानात घुमू लागले होते. त्यांनी हेही विचारलं नाही की, तो मुलगा कोण आहे, कुठला आहे, काय करतो? त्यांच्या दृष्टीला फक्त एकच नवरदेव दिसत होता. कपाळाला लखलखतं बाशिंग बांधलेलं होतं. त्यांवर तुरा खोवलेला होता. हातात तलवार आणि तो घोडीवर स्वार होता. असा अनामिक अनंत काळचा नवरदेव त्यांना दिसत होता. आणि त्यांच्याबरोबर जनावरांची, माकडांची आणि डुकरांची एक वरात मिरवत चालली होती, ही वरात जाताना, फाटक्या दुराण्या वस्त्रांतलं त्यांचं यौवन लुटून नेत होती. त्या फिरून गाऊ लागल्या–

वाडथल्ले दो निब्बू पक्के
जेठं मंगे उधारे

("कुंपणाखाली दोन लिंब पिकली आहेत आणि हा दीर ती उधार मागतोय,"

न मैं जेठा मुल्ले देन्ही
न देन्दी रखवा रे
डण्डीयां तूं बलै गया–झुमके लैण हिलोर

"भावोजी, मी तुला ती विकत किंवा ठेवायला देणार नाही. त्यांच्या भारानं कोवळ्या डहाळ्या मुडपूत चालल्या आहेत आणि घोस पण झुलत आहेत."

मग दुसरीनं नवीनच गाणं सुरू केलं–

सौहरिया बदाम रंगिया
नूहां गोरियाँ पुत्तर तेरे काले

"अरे बदामी रंगाच्या सासऱ्या, तुझ्या सुना गोऱ्या रंगाच्या आहेत. पण तुझे मुलगे मात्र काळे आहेत." जगातल्या साऱ्या सुनांना कल्पनेनं त्या सासरी नेऊन पोचवीत होत्या.

ही सर्व गडबड, गोंधळ पाहून, देवीच्या दर्शनाला आलेले सर्व यात्रेकरू मंगलच्या घराकडे वळले. जणू देवी आपल्या मंदिरात नव्हती. तर ती इथंच होती. नव्हे मंदिरच स्वतः इथं चालत आलं होतं–आपल्या भक्तजनापाशी. सरपंच ज्ञानचंद, तारासिंह जमीनदार केसरसिंह, जग्गू, रुलदू, दीवाना, करमू, दुल्ला, जमाला सगळेच्या सगळे तिथं येऊन उभे राहिले. घरच्या माडीवर स्त्रियांचा मेळावा उभा होता. आणि खाली पुरुष. शेजारपाजारच्या नि परगावच्या लोकांखेरीज, सुरमादाई देखील तिथं उभी होती. तिनं साऱ्या जगाला या दुनियेत आणलं होतं आणि आणखी कित्येकांना या दुनियेत आणायची तिची उमेद होती.

जेहलमच्या तिन्ही मुली, इनायती, आयेशा आणि सलामतीदेखील तिथं आल्या. त्यांच्याबरोबर, जेहलमच्या थोरल्या भावाचा मुलगा मैलूही तिथं उभा होता. त्याचे बेभान, स्वैर चाळे पाहून सलामती लाजत होती. भुलत होती. स्वतःला विसरत होती. नबाबची बेगम आयेशा, गुरुदासची गुणवती सर्वजण आपले मागले पुढले वैरभाव विसरून तिथं गोळा झाले होते; त्या क्षणात स्वतःला हरवून बसले होते.

पुरो आणि विद्यानी मिळून राणीलाही आपल्यामध्ये ओढून घेतलं. त्या सर्वांच्यामधून ढब्बूदेखील वेडा होऊन फिरत होता. तो प्रत्येकाच्या जवळ जात होता. त्यांचा वास घेत होता आणि जोरजोरानं आपली शेपटी हालवीत होता. अर्धवट बेभान अवस्थेत रानो नाचत होती. सुट्टया बुट्टयांची तिची शलवार–असं वाटत होतं की, कवड्या कवड्यांचा सापच वळत मुरडत वर वर चाललाय! दुःखाच्या आवरणाखाली लपलेलं तिचं सौंदर्य आजपर्यंत कुणाच्याही नजरेस पडलं नव्हतं. पट्टया पट्टयाच्या तिच्या कुडत्यातून उठून दिसणारं तिचं अंग अंग डोळे मारून खुणावीत होतं, सर्वांना वेड लावीत होतं. त्या सौंदर्याच्या दर्शनानं त्यांचे डोळे दिपत होते. एखाद्या खोडकर मुलानं आरसा धरून उन्हाचा कवडसा डोळ्यावर पाडावा आणि त्याच्या झळाळीनं डोळे दिपून जावेत, तसं साऱ्यांचं होत होतं. त्या

नाचणाऱ्या स्त्रियांच्या नजरेत हे जग म्हणजे एक विशाल फिरतं वर्तुळ बनलं होतं आणि भोवती उभे राहिलेले स्त्री-पुरुष, म्हातारे, मुलं सर्वजण त्या वर्तुळात फिरणाऱ्या रेषा होत्या. काही क्षणात त्या रेषांचे विविध रंगांचे ठिपके झाले. अन शेवटी फक्त एकच रंग उरला सूर्याच्या किरणांचा रंग ! किरणांच्या या रंगात अनेक रंग लपलेले असतात आणि माणसाच्या बुद्धीच्या आदेशाप्रमाणे ते रंग प्रगट होतात. त्यांच्या हाकेची ते वाट पाहात असतात.

बाहेर आनंदाचा वेगळाच जल्लोष चालू होता; घराघरातून सर्व मंडळी गर्दी करीत, एकमेकांना ढकलीत आणि नव्या नव्या रंगाची उधळण करीत दरवाजाकडे निघाली. त्यांच्या लहान लहान टोळ्या धावत धावत, रस्त्यावर, विहिरीच्या काठावर आणि घराच्या छतावर जाऊन उभ्या राहिल्या.

ते सर्व यात्रेकरू होते. आपापली मस्तके नम्र करून, देवीची भजने गात, टाळमृदंगांच्या घोषात ते यात्रेकरू पुढे पुढे येत होते. आपल्या पापाचं प्रायश्चित करण्यासाठी ती माणसं इथं आली होती. मागली पापं, आजची पापं आणि पुढली पापं, सर्वांचं त्यांना परिमार्जन करायचं होतं. ते नाचत होते, गात होते—

माता रानी दे दरबार जोतां जगदियां
मय्या रानी दे दरबार जोतां जगदियां
हे मय्या ! तुसीं सत्ते भैणा गोरियां
सिर लाल फुल्लां दिया जोडियां
माता रानी दे दरबार जोतां जगदियां

जमाव जवळ जवळ येत चालला, तसं सारं दृश्य स्पष्ट होत चाललं. सर्वांनी ओळखलं. चौधरी मेहरबानदास आणि त्याचा भाऊ घनश्यामदास सात वर्षांचा तुरुंगवास भोगून परत येत होते. गाणाऱ्या, नाचणाऱ्या यात्रिकांच्या मागून ते चालत होते. त्यांच्या माना नम्र झाल्या होत्या. त्यांच्या नजरा जमिनीला खिळल्या होत्या. लज्जने व पश्चात्तापानं तसंच नमस्कारासाठी वारंवार वाकल्यामुळे, श्रमानं त्यांचे चेहरे लाल झाले होते. अनेक शतकांच्या पश्चात्तापानं आणि प्रायश्चित्तानं ते आता मूक, अबोल बनले होते. त्यांच्या ओठावरचं हे मौन किती तरी कहाण्या सांगत होतं.

या समुदायाच्या मध्यभागी एक तरुण चालत होता. पंचवीस-सव्वीस वर्षांचा तो तगडा जवान होता. तो सुंदर होता आणि मोठ्या भक्तिभावानं, अत्यंत श्रद्धेनं गोड सुरात तो अंबेची भजनं गात होता. त्याला पाहून लोक आश्चर्य करीत होते. एवढ्या लहान वयात या सुंदर तरुणानं कोणता अपराध केला असावा, असा प्रश्न त्याला पाहून त्यांच्या मनात उभा राहात होता. ही एकच जिज्ञासा त्यांच्या नजरेत चमकत होती. कदाचित त्यानं अपराध केला नसेल. अपराधानंच त्याला जन्म दिला असेल.

धावत पळत, धक्के खात आणि देत, त्या गर्दीमधून घुसत मंगल रानोजवळ आला आणि तिचे खांदे धरून हलवीत तो तिला म्हणाला, 'रानो तो पहा, तो—तो मुलगा' आणि त्यानं भजनं गाणाऱ्या त्या मुलाकडे बोट उचलून दाखवलं.

दुरून रानोनं त्या सुंदर मुलाकडं बघितलं. तिच्या डोळ्यात स्वयंवराचा मंडप उभा राहिला. मनोमन बडीच्या बाहूचा हार तिनं त्याच्या गळ्यात घातला आणि स्वत: अमरवेल होऊन त्याला लगटली. असा सुंदर, असा तरुण, असा ऐटदार जावई कुणा स्त्रीला मिळाला नसेल. जवळच उभ्या असलेल्या चन्नोला तिनं मिठी मारली आणि इतक्या आवेगानं तिला कवटाळून धरलं की, घाबरून ती चित्कारली. रानो तिला म्हणाली, 'चन्नो, माझी नाव काठाला लागली ग.'

स्त्रियांच्या त्या घोळक्यातून बडी देखील मान उंचावून त्या तरुणाकडे पाहात होती. गर्दीनं तिची लाज झाकून टाकली होती. तिच्या शरिरातलं सर्व रक्त उसळून त्याची रक्तिमा तिच्या मुखावर जमा होत होती, तर सलामतीच्या चेहऱ्यावरील रक्त उडून अदृश्य झालं होतं. पांढरी फटफटीत झालेली सलामती आपल्या मोठ्या बहिणीला म्हणत होती, 'आ ग, घरी चल मी तर थकून गेले.'

आणि आपलं खेळणं सर्वांना दाखवणाऱ्या अधिऱ्या मुलीप्रमाणं रानो सगळ्यांना तो मुलगा दाखवीत होती, 'तो पाहिलात चाची ? बिद्दो, तूही पाहून घे. चंडी, लाजो, तुम्ही हा घ्या पाहून'

पुरो चाचीनं पाहिला. विद्येनं त्याची परीक्षा केली. चंडीनं त्याला आपल्या नजरेनं तोललं. लाजो, जानकी, कुक्की सर्वांकडं बघत राणी मान हालवीत होती आणि विचारीत होती, 'आहेना ?'

परंतु राणीची ही नजर, चन्नोकडं पाहताच तुटलेल्या साखळीप्रमाणं गळून पडली. चन्नोचं तोंड एकदम पांढरं फटक पडलं होतं. अवेळी फुललेल्या दोडक्याच्या फुलासारखं. राणीनं तीव्र दृष्टीन तिच्याकडं पाहिलं आणि तीच नजर तिनं त्या मुलाकडं वळवली. 'अरे देवा !' राणी उद्गारली. तो मुलगा आता जवळ आला होता. हात उंचावून आणि आपल्या डोळ्यांची झोळी पसरून तो राणी जवळ कसली तरी भीक मागत होता. राणीनं एकदम एक दीर्घ श्वास घेतला आणि ती स्वतःशीच पुटपुटली 'अग बाई, मेले मी.' तो उसासा तोंडातून बाहेर पडण्यापूर्वीच तिच्या मुखावरचा रक्तिमा नाहीसा झाला. तिची नजर पंख लावून उडून गेली. दृष्टी शून्य झाली. आणि ती कापसासारखी पांढरी फटक पडली. पहिल्यांदा तिचे हात थरथर कापू लागले. नंतर तिचं सर्व शरीर वळू लागलं. त्या मुलाकडं पाहात तो किंचाळली, ' 'तोच, तोच आहे हा ज्यानं माझ्या' या आघातानं बेशुद्ध होऊन राणी खाली कोसणार, इतक्यात शतकांच्या वार्धक्यानं पिकलेला, पांढऱ्या केसांचा नि वाकलेला हुजुरासिंग कुठून तरी धावत, धडपडत तिच्याजवळ आला. जवळच उभी असलेली जिंदा देखील ढब्बूची भिती सोडून धावली आणि तिनं कोसळणाऱ्या राणीला सावरलं. हुजुरासिंगचे डोळे, डबक्यात न्हाणाऱ्या कबूतरासारखे आज फडफडत नव्हते. उडताना तोललेल्या पाखराच्यां पंखाप्रमाणे ते स्थिर होते. बहिरी ससाण्याप्रमाणे उंचावरल्या नीडाकडे ते झेपावत होते,

'बहुरानी', थरथरत्या ओठांनो तो होता, 'कोणासाठी रडतेस तू ? माझ्याकडं पहा. माझ्याकडं ज्यानं एक मुलगा दिला आहे, कायमचा पुत्र दिला आहे. तेव्हा कुठं एक पुत्र मिळाला आहे.'

आणि आपल्या बहुरानीच्या आत्म्याच्या शोधात तो म्हातारा हुजुरासिंग स्वत:लाच हरवून बसला. त्याच्या डोळ्यातल्या गंगा-यमुना त्याच्या दाढीच्या गायरानात अदृश्य होत होत्या. तिलोकाच्या मृत्यूनंतर, त्याचे हात न गवसणाऱ्या वस्तूसाठी चाचपडून चाचपडून थकून गेले होते. आवाज गळयातच कापत राहिला होता,

नहियों लभ्भने लाल गवाचे
मिट्टी न फरोल जोगिया

'अरे जोगी, आता कशाला उगाच माती पाखडतोस, माणिक एकदा हरवलं ते हरवलं. ते हरवलं. ते थोडंच पुन्हा लाभणार आहे' त्याच्या ऐवजी तुला दुसरी माणकं मिळतील. हिरे मिळतील, मोती, पाचू पण ते माणिक ? छे !

हुजुरासिंगची दृष्टी अजून या जगातल्या नात्याच्या बंधनात कुठं-तरी हरवून गेली होती. त्याची ही दुर्बलता पाहून दृश्यच स्वतः रडत होतं. आता तो स्वतःच दृश्य होता आणि स्वतःच दर्शक. नट आणि प्रेक्षक दोन्ही तो स्वतःच झाला होता. त्याच्या डोकीला भगव्या रंगाची पगडी होती. त्याचे पदर सुटले होते. त्यांनीच तो आपले सुरकुतलेले डोळे आणि वाहणारे नाक पुशीत होता. या वेळी तो एखाद्या विरक्त जोग्यासारखा दिसत होता. तो हे जग सोडून निघाला होता, परंतु हे जग त्याला सोडीत नव्हतं. मृत्यूच्या दारात उभ्या राहिलेल्या त्या विरक्ताला आता दिव्य दृष्टी लाभली होती. त्याच्या दृष्टीला जन्म आणि मृत्यु दोन्ही दिसत होते, आणि त्या दोघांमध्ये उभी होती एक वहुरानी, अनंताची सून ! प्रत्येक लग्नाच्या मुहूर्तावर, अज्ञात लोकांतून ती अशीच पृथ्वीवर येते आणि फुलांच्या ताटव्यामागं उभी राहते. डोकीवर दुपट्टा ओढून, अलंकारांनी नटून हाती लाल चुडा भरून, आपले गोरे गोरे बाहू ती उभारते तेव्हा तिची काकणं किणकिणतात. मेंदीनं रंगलेले हात जोडून, डोईवरील दुपट्ट्यांतून, डोळ्यांच्या कोपऱ्यातनं पाहात, केवळ नजरेच्या भाषेत ती आपल्या सासऱ्याची प्रार्थना करते, 'हे पिता, तू आपला एक पुत्र मला दे. देऊन टाक मला. त्याच्या बदल्यात मी तुला दहा पुत्र देईन, त्याच रूपाचे, त्याच गुणाचे.' आणि पिता उत्तरतो, 'बेटी, कबूल अगदी कबूल. पण हा माझा पुत्र ?' आणि डोळे पुशीत पुशीत तो आपले तोंड फिरवतो.

राणीचे लांब लांब केस हुजुरासिंगच्या बोटांतून झरणाऱ्या प्रेमाच्या धारात न्हात होते. त्याचे तुषार तिच्या केसात चमकत होते.आपल्या मेलेल्या पित्याच्या जागी एक दिव्य पिता तिला आज मिळाला होता. म्हणून सारी मानमर्यादा विसरून आज ती त्याच्या छातीवर आपले मस्तक आदळीत रडत होती, म्हणत होती, 'नाही बापू, नाही, हे घडणार नाही. अगाई ! माझी पोर ! नाही, बापू, माझे प्राण निघून जातील. हे होणार नाही.'

यात्रेसाठी आलेली सर्व गर्दी तिथं येऊन थांबली होती. श्वास रोखून निर्णायक क्षणाची प्रतीक्षा करीत होती. त्या क्षणी सर्वांना असं वाटत होतं की, राणीनं 'हो' म्हटलं तर हे जग जिवंत राहील आणि तिनं नकार दिला तर प्रलय होईल–त्या महाप्रलयात, हे पशू, हे पक्षी, ह्या जड, चेतन वस्तू, ही धरणी, हे आकाश, सारं सारं बुडून नष्ट होईल. त्या प्रलयातून वाचवणारा मत्स्यावतार असणार नाही. परमात्म्यापाशी जीवात्मा उरणार नाही. शब्दांत नाद रहाणार नाही. ज्योतीत प्रकाश उरणार नाही. पंचपरमेश्वर समोर उभे राहून हात जोडून तिची प्रार्थना करीत होते; आणि निष्पाप निरागस मंगलही त्यांच्यातच सामील झाला होता.

हुजुरासिंग तिला शांत करीत होता. तो म्हणाला, 'बेटा, हे सगळं काय चाललं आहे ? कशासाठी ? हे तुला समजलं नाही. मलाही समजत नाही. उभ्या असलेल्या या लोकांनाही ते ठाऊक नाही–आणि ते समजून घेण्याचा प्रयत्नही तू करू नकोस. स्वस्थ रहा. शांत रहा. इथं श्वास घ्यायलाही अवकाश नाही–'

राणीनं वळून बघितलं. बडीचा चेहरा व्याकुळ झाला होता. तिचं भान हरपलं होतं. जणू निःशब्दपणे ती म्हणत होती, 'आई, हे तू काय करते आहेस ? यावेळी तू बोलली नाहीस तर, मी या कुमारी धरित्रीसारखी वांझच राहीन.' रानोनं सासऱ्याच्या खांद्यावरची आपली मान उचलली आणि ती हळूच म्हणाली, 'ठीक आहे बापू, ठीक आहे.'

मग भजनाचा एकच कल्लोळ उडाला, लोक अत्यंत उत्साहानं, आनंदानं गाऊ नाचू लागले. टाळमृदंगाच्या घोषात, त्या गर्दीतून मान उंच करून तिनं देवीच्या मंदिराकडं पाहिलं. देवळाच्या सोनेरी कळसात प्रतिबिंबित झालेलं देवीचं प्रसन्न हास्य राणीच्या मुखावर पडून ते उजळून निघालं होतं. थोड्याच वेळात रात्र झाली. अंधार पसरला. त्या अंधारावरही प्रकाशाचा तरंग–डोळे दिपवणारा तरंग उठत होता. त्या तेजोलहरींनी रानोला आता वेढून टाकलं होतं. याच वेळी मंदिरातून घंटा वाजू लागल्या. मशिदीतून अजांचा ध्वनी घुमला–आणि जिथं मंदिराचा कळस होता तिथे आता अंधारात कुणाचे तरी हात पसरलेले दिसत होते आणि त्याची मान लोंबत होती.

राणीच्या हृदयात भितीही होती आणि आनंदही उसळत होता. व्याकुळ होऊन आपले दोन्ही हात तिनं कळसाच्या दिशेनं उचलले. सर्वांगांनी थरथरत आणि आसवांनी भिजलेल्या डोळ्यांनी तिनं देवीला साद घातली, 'आई, अंबे, माते !'

नेमकं ह्याच वेळी विद्यानं पुरोच्या कमरेत एक हलकासा धपाटा घातला आणि विचारलं, 'ए, सगळे आले, पण तुझा हरिदास तेवढा नाही दिसत कुठं ?'

आणि पुरो खोटं खोटं रडून, आपल्या शंभूच्या त्या हरामखोर बापाबद्दल कृत्रिम शोक करू लागली.

## समाप्त

[ पॉप्युलर प्रकाशन, मुंबई यांच्या सौजन्यामुळे 'रानो' माणूस चित्र, वार्ता पाक्षिक अंकातून दोन हप्त्यात सादर करता आली. लवकरच पॉप्युलर प्रकाशनतर्फे ही कादंबरी पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहे. –संपादक ]

# पाक्षिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**दि. १ ते १५ मार्च ७४**

---

## भारताच्या स्वास्थ्यांत विलक्षण बिघाड

संसदेचे अधिवेशन चालू झालेले आहे व उत्तर प्रदेश, ओरिसा यांच्या विधानसभेचे निकाल लागलेले आहेत. अशा पार्श्वभूमीवर हा पंधरवडा सुरू होत आहे. पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडून लोकांचे समाधान होणे कठीण असून लोकांचा असंतोष आवाक्यात आणणे त्यांच्या शक्तीबाहेर जाईल. रवी, गुरू, मंगळ व काही बाबतीत हर्शल हे ग्रह प्रतिकूल आहेत. संसदेत विरोधी सभासद कमी असूनही त्यांचा विरोध सत्तारूढ पक्षाला असह्य होईल. अर्थमंत्री, पंतप्रधान, नियोजन मंत्री, रेल्वे मंत्री, परराष्ट्र मंत्री, गृहमंत्री हे मंत्री विरोधकांच्या माऱ्याची केंद्रस्थाने बनतील. गुजराथमध्ये विधान सभेचे विसर्जन करण्यासाठी जोराची चळवळ सुरू होईल. पश्चिम बंगालमध्ये सत्तारूढ सरकार अंतर्गत मतभेदानी हादरू लागेल. म्हैसूरमध्ये आंदोलन सुरू होईल. महाराष्ट्रात मुख्यमंत्री पदाच्या वादाला पुन्हा चालना मिळेल. केंद्रीय मंत्रीमंडळात पंतप्रधानांच्या विरोधी गट वा वातावरण तयार होऊ लागेल. यात जगजीवनराम आघाडीवर असतील. उत्तर प्रदेशात स्थिर सरकार बनवणे अशक्य होईल. पंतप्रधान इंदिरा गांधी काहीशा अगतिक होऊ लागतील. अनेक उच्चपदस्थांचे भ्रष्टाचार 'रस्त्यावर' येऊ लागतील. कराच्या ओझ्यानी लोक मेटाकुटीस येतील. महाराष्ट्र, राजस्थान आणि आसाम येथे एखादी नैसर्गिक आपत्ती येण्याची शक्यता आहे. ◻

---

## मेष : अडचणीची सुरुवात

विजयाच्या वारूवर स्वार होऊन आपण गेले सात आठ महिने दाही दिशांना यश मिळवीत हिंडलात. अनेकांना तुमचा हेवा वाटत होता. पण हा काळ आता संपला आहे. यश, कीर्ती, उत्कर्ष, प्रगती ही सारी ग्रहांच्या म्हणजे पर्यायाने ईश्वराच्या हाती असतात. आपण सारी माणसे केवळ त्याच्या हातचे गुलाम आहोत. ईश्वर जशी प्रेरणा देईल व ग्रह जशी अनुकूल वा प्रतिकूल परिस्थिती निर्माण करील तसे आपण वागायचे. हे सारे तत्त्वज्ञान आपणास एवढ्यासाठीच सांगितले की गेले आठ दहा महिने ज्याप्रमाणे बेफिकीर वागत राहिलात तसे आता वागू नका. ती अनुकूलता आता संपलेली आहे. तुमच्या पाठीशी सामर्थ्याचा हात घेऊन उभा असलेला मंगळ आता बदलला आहे. तो धनस्थानी बसून तुमच्या कुटुंबात काही ना काही कलह, आजार, संततीला त्रास निर्माण करणार आहे तर दुसऱ्या बाजूला तुमच्या पैशाची पुंजी या ना त्या मार्गाने कुरतडत राहाणार आहे. उसने पैसे द्यावे लागतील. हे दडपण तुम्हाला झुगारता येणार नाही. दिलेले उसने पैसे परत मिळणार नाहीत. कुटुंबातील एखाद्या जवळच्या व्यक्तीचे ऑपरेशन करावे लागेल व त्यासाठी खूप खर्च होईल. नोकरीत तशी वाईट परिस्थिती नाही. पण कामाचा ताण वाढेल. समाधान असे मुळीच मिळणार नाही. तुम्ही कितीही उत्तम काम केले तरी काही ना काही उणीव निर्माण होईल. बेकारांना दुसऱ्या आठवड्यात नोकरी मिळेल. मात्र ती तात्पुरती असेल. कोणत्याही प्रकारचा नवा धंदा वा उद्योग सुरू करणे लांबणीवर टाकणे हिताचे ठरेल. ठरलेल्या मंगलकार्यात काही ना काही अडथळे येऊन ते लांबणीवर पडेल. परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करणे आवश्यक आहे. परगावी असलेल्या मुलाबद्दल उगीचच चिंता वाटेल. **महिलांस** : घरात झालेल्या भांडणाचे मनाला लावून घेऊ नये. विवाहाचा बेत तूर्त लांबणीवर टाकावा. नोकरीत प्रगती नाही. ◻

## वृषभ : व्यवसायात उत्कर्ष

माणसांना चांगले भविष्य वाचण्याची सवय झाली आहे. त्याला आपले भविष्य चांगले आहे हे वाचून बरे वाटते. मन आनंदी होते. खरे म्हणजे जसे ग्रह असतील तसेच घडणार आहे. ते अनुकूल असले तर काही प्रतिकूल घडणार नाही आणि ग्रह जर प्रतिकूल असले तर काही अनुकूल घडणार नाही. भविष्य हे नेहमी माणसात सहनशक्ती निर्माण करते आणि त्या सहनशक्तीसाठी सामर्थ्य देतात. तात्पर्य प्रतिकूल ग्रहांची कारकीर्द सुरू झाली की एकदम वाईटच घडणार आहे असे समजून चालू नका आणि हातपायदेखील गाळून बसू नका. अंतरिक्षातील रवी, मंगळ यासारखे सामर्थ्यवान ग्रह यावेळी आपापल्या स्थानाच्या बदलाची जाणीव आपणास करून देणार आहेत. गुरू दहावा झाला असून तो कुंभ राशीत आपणास अनुकूल आहे. दुसरा शनी साडेसातीचे चटके फारसे जाणवणार नाही असेच देईल. नोकरी धंद्याची एकूण परिस्थिती प्रगतीचीच राहील. आजवर आपणास प्रमोशन मिळाले नसेल, बढतीचा विचार बाजूला पडला असेल किंवा तुम्ही उत्तम सेवा करूनदेखील त्याची उपेक्षा झाली असेल तर ही परिस्थिती आता बदलणार आहे. ज्या ठिकाणी बदली व्हावी अशी तुमची इच्छा होती त्या ठिकाणी आता तुमची बदली त्रासाशिवाय होऊ शकेल. उद्योगधंद्यांच्या क्षेत्रात नवे तंत्र जमू शकेल. तांत्रिक सहाय्य मिळू शकेल. पैशाभावी अडून राहिलेल्या योजना पैसा मिळून कार्यान्वित होऊ लागतील. सौंदर्यसाधनांचा आणि उंची कापडाचा व्यापार व कारखाना प्रगतीचा

नवा टप्पा गाठील. यावेळी व्यवसायाच्या निमित्ताने आपणास परदेशी–प्रामुख्याने इंग्लंड, अमेरिका अशा देशांना भेटी देण्याची संधी मिळेल. वारसहक्काचा एखादा तंटा न्यायालयात आला असेल तर तुमच्या बाबतीत वातावरण अनुकूल आहे. अनेक आशा-आकांक्षा पालवतील. आजवर केलेल्या श्रमाचे चीज हा पंधरवडा करून देणार आहे. निराशा व हळवेपणा सोडून कामाला लागा. **महिलांस :** दहावा गुरू झाला आहे तर मंगळ पहिला झाला आहे. हौसेसारखे सारे घडणार आहे. मैत्रिणींत वाहवा होईल. पतिराजांकडून कौतुक होईल. ¤

## मिथून : उपासना करा

तुमची साडेसाती चालू आहे. केतू व शनी एकत्र तुमच्या राशीत आहेत. ते फारसे अनुकूल नसले–विशेष करून केतू तेवढासा अनुकूल नसला तरी त्याचा प्रतिकूल परिणाम जाणवत नव्हता. पण आता प्रतिकूल ग्रहांची कोंडी तुमच्याभोवती होत आहे, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. जन्मस्थ कुंडलीत जर ग्रह उच्चीचे असले तर ते प्रतिकूल येऊनदेखील त्रास देत नाहीत. त्यामुळे आपण हताश होण्याचे कारण नाही. महिन्याच्या शेवटी केतू बारावा होईल. सध्या मंगळ बारावा झाला असून तो शनीच्या जवळ आला आहे. मूळ चंद्राशी गुरूचा त्रिकोण योग हीच काय ती अनुकूल स्थिती. गुरू तोल जाऊ देणार नाही. त्याचप्रमाणे नुकसानीची वा काही त्रासदायक परिस्थिती निर्माण झाली तरी रक्षण करील. या पंधरवड्यात काही अकल्पित अशा अनूकूल–प्रतिकूल घटना घडणार आहेत. त्याचप्रमाणे त्याचा परिणामदेखील दीर्घ काळ रहाणार आहे. काही शुभ घटनांचे पडसाद तुमच्या व्यावसायिक जीवनात अपूर्व यश देऊन जाणार आहेत. नोकरीत बदल होईल. नवी नोकरी प्रथम त्रासाची वाटेल. पण ती स्वीकारणे विचारांती हिताचे ठरेल. व्यापाराला नवी बाजारपेठ उपलब्ध होऊन नफ्याचे क्षेत्र विस्तारेल. शेअरची प्रचंड उलाढाल होऊन अनुकूल स्थित्यंतर घडावे. शेतीचा नवा व्यवसाय सुरू होईल किंवा सुरू करायला अनुकूल परिस्थिती निर्माण होईल. राजकारणात मोठ्या स्पर्धेला तोंड द्यावे लागेल. प्रतिष्ठा कमी होणार नाही पण प्रतिष्ठेला धक्के बसतील. चारित्र्याला जपणे आवश्यक आहे. व्यसनी मित्रापासून दूर रहा. एखादा 'तळीराम' आयुष्यात प्रवेश करण्याची शक्यता आहे. रोज गुरूचरित्र वाचा. दत्ताची उपासना करा. **महिलांस :** नोकरीत स्तुतीला भुलू नका. वरिष्ठांशी कामापुरताच संबंध ठेवा. पैसा मात्र कमी पडणार नाही. ¤

## कर्क : परिस्थिती अनुकूल

साडेसातीच्या फेऱ्यात तुम्ही सापडल्यापासून अनेक दिवस तुम्हाला परिस्थितीने घेरले होते. आर्थिक, मानसिक, शारिरीक व बौद्धिक या सर्वच बाबतीत तुम्हाला दुबळेपणा आला होता. पण आता परिस्थिती सावरू लागणार आहे. मंगळासारखा एक समर्थ आणि कर्तबगारीचे प्रतीक असलेला ग्रह अकरावा झाला आहे तर गुरू आठवा झाला आहे. पंधरवड्याच्या अखेरीत रवी मीन राशीत म्हणजे आपल्या भाग्यस्थानी येत आहे. या सर्व ग्रहस्थितीचा विचार केला तर आपणास आता अनुकूल काळ सुरू झाला आहे. आठवा गुरू आर्थिकदृष्ट्या तुम्हाला बराच स्वयंपूर्ण बनवील असे मानायला हरकत नाही. लॉटरीत बक्षीस, रेसमध्ये लाभ, इतरही अनेक अकल्पित असे लाभ मिळण्याची शक्यता आहे. संपत्तीची व स्थावराची वाटणीची चर्चा वा वाद सुरू असले तर ते तडजोडीने मिटून तुम्हाला बराच आर्थिक लाभ होईल. जमीन घेण्याचे ठरवले असेल तर त्याला अनुकूल साथ मिळेल. बागायतदार व शेतकरी यांना त्यांच्या व्यवसायात बराच उत्कर्ष साधता येईल. प्रकाशन व्यवसाय जे करीत असतील ते काळजीतून थोडेफार मुक्त होतील. त्यांच्यापुढील कागदाची अडचण गेल्या पंधरवड्याइतकी तीव्र राहाणार नाही. प्लॅस्टीक, विद्युत, उपकरणे कापूस इत्यादी व्यवसायात सुधारणा होईल. मंदीमुळे त्यांना भोगावा लागलेला त्रास कमी होईल. नोकरीत अनुकूलता लाभेल. एकंदर तुमची चांगल्या जागी बदली होईल किंवा तुमचे भांडण असलेले वरिष्ठ बदलून जातील. औषधी व इंजिनियरिंग कारखान्यात काम करणाऱ्या नोकरात शुभवार्ता कळेल. लेखनात बक्षीस मिळेल. तब्येतीला मात्र जपायला हवे. **महिलांस :** मानसिक व्यथा त्रास देईल. पण जास्त आहारी जाऊ नका. ज्यांना डोकेदुखी आहे त्यानी जास्त काळजी घ्यावी. ¤

## सिंह : राजकारणात यश

नेतृत्व वा पुढारीपण करण्यासाठीच सिंह राशीच्या व्यक्तीचा जन्म होतो असे समीकरण ठरून गेले आहे. कारण रवी हा जसा ग्रहात सम्राट आहे तसाच राजकारण हा रवीचा प्रमुख गुण आहे. हा रवी सध्या सातवा असून पंधरवड्याच्या शेवटी तो आठवा होईल. सिंह रास असलेल्या व्यक्ती राजकारणापासून फारशा अलिप्त राहूच शकत नाहीत. या तत्त्वाला अनुसरून विचार करता तुम्ही मोठे भाग्यवान ठरणार आहात यात मुळीच शंका नाही. गेले काही दिवस तुम्ही अप्रियता भोगीत आहात. गुप्त कारवायाचा तुम्हाला त्रास झाला. पण आता राजकारणात मोठे यश तुमच्या वाट्याला येईल यात संशय नको. अचूक पावले टाका व योग्य राजकारण खेळा. आमदार, मंत्री यांना बरेच मोठे स्थान लाभणार आहे. या पंधरवड्यात ज्या निवडणुका होतील त्यात सिंह राशीचे लोक आघाडीवर राहातील. मंत्री वा उच्चपदावर असलेले लोक अडचणीवर मात करण्यात व घसरलेली प्रतिष्ठा पुन्हा मिळवण्यात यशस्वी होतील. नोकरीत असलेले थोडे फार सावरतील. इंजिनियर, वकील, डॉक्टर व शेतकी पदवीधर यांची बेकारी हमखास संपेल. त्यांना अधिकाराच्या नोकऱ्या मिळतील. बिल्डिंग कॉंट्रॅक्टर्स तेजीत असतील. नाट्य व्यावसायी ग्रहांच्या अनुकूलतेपासून दूर आहेत. त्यांची हानी होण्याची शक्यता आहे. धाडस करू नये. प्रवासाला वेळ अनुकूल आहे. गाडी घेण्याचे उरुरे स्वप्न यावेळी पुरे होईल. व्यापारात काळजीचे वातावरण राहील. **महिलांस :** सार्वजनिक कामात यश मिळेल. सन्मानाचे योग येतील. नोकरीत अनिश्चय निर्माण होईल. ¤

## कन्या : तब्बेतीत सुधारणा

आठवा मंगळ नववा म्हणजे भाग्यात आला हीच माझ्या दृष्टीने भाग्यकारक आणि बरीच क्रांतीकारक गोष्ट होय. तुमच्या भाग्योदयाची व अनेक क्षेत्रातील उत्कर्षाची सारी सूत्रे आता मंगळाच्या हाती आहेत.

गले सात आठ महिने त्याने जेवढा तुमचा काटा काढला तेवढाच हा मंगळ तुमच्यावर फुले उधळण्याची संधी आणून देईल. आठव्या मंगळाने तुमची तब्बेत खिळखिळी केली होती. मन खचून टाकले होते. तुमचा धीर खचला होता. आता हाच मंगळ तुमच्या जीवनात नवे युग निर्माण करणार आहे. तुमच्या कल्पनांना व नव्या नव्या योजनांना नवे रूप देऊन तुमच्या जीवनात नवी चकाकी निर्माण करणार आहे. तुमच्या व्यावसायिक जीवनाला नवे उन्मेष उगवणार आहेत. पैशाअभावी जी कामे अडून राहिली होती, जे जे नवे उद्योग तुम्ही सुरू करायचे ठरवले होते ते सारे यावेळी स्थापन होतील. मंत्रिमंडळातील (सरकारातील) एखाद्या उच्च पदस्थांशी तुमचा परिचय होऊन भविष्यकाळांतील तुदच्या कर्तृत्वाला त्याचा हातभार लागणार आहे. तुम्ही लेखक असाल तर तुमचे प्रथम लेखन प्रसिद्ध होऊन तुम्हाला कीर्ती व पैसा मिळेल. प्रकाशन क्षेत्रात तुम्हाला जर एखादा उपक्रम सुरू करावयाचा असेल तर त्याला अनुकूल वातावरण तयार होईल. नोकरीची स्थिती मात्र फारशी वाईट नसली तरी तुमच्या मनाप्रमाणेच काही घडेल असे नाही. वरिष्ठाबरोबर मतभेदाचे प्रसंग निर्माण होतील, ते कौशल्याने टाळा. कन्या राशीव्यक्तींनी इमाने इतबारे सेवा करणे व आपला भाग्योदय साधणे हे त्याचे नशीब. जुन्या नोकरीत सध्या तरी बदल करू नये. वरिष्ठांबरोबरचे मतभेद थोडी माघार घेऊनच मिटवावे. मन उघडे ठेवावे. कुणाविषयी मनात संशय ठेवू नये तसेच मन व्यग्रदेखील ठेवू नये. त्यामुळे तुमचा लाभ होईल. प्रवासाचे बेत तडीस जाणे कठीण आहे. पत्रव्यवहार यशस्वी होईल. आर्थिक स्थिती थोडीफार सुधारेल. येणे वसूल होईल. नातेवाईकाबरोबर संबंध प्रगतीचे वळण घेतील. परदेशी प्रवासाला हा काळ चांगला नाही. सहावा गुरू लग्न ठरविण्यात अडथळे आणील. **महिलांस :** नोकरीस चांगले. वरिष्ठांची मर्जी राहील. प्रवासाचा योग येईल. काही स्वप्ने साकार होतील. तुम्ही गायक असाल तर प्रसिद्धी मिळेल. ¤

## तूळ : ईश्वरी कृपा लाभेल

शुक्र हा गायनवादनादी ललीतकला गुणमंडीत असा ग्रह आहे. व तुमच्या राशीचा स्वामी आहे. नाटक, सिनेमा, गायन, वादन, चित्रकला, अभिनय, सौंदर्य इत्यादी गुण मानवी जीवनात जरी गोडवा निर्माण करीत असले तरी ईश्वरी उपासनेला पोषक नाहीत. 'तपोभंग' याच गुणामुळे होतो. सारांश तूळ राशीची माणसे उपासनामार्गी होणे कठीण असते. पण महाराज, गुरू हा धर्मनिष्ठ व नीतीचा कारक ग्रह आहे. त्याची अनुकूलता लाभली तर नास्तिकाचा आस्तिक होतो व नितीभ्रष्टदेखील नीतीच्या स्वाधीन होऊ शकतो. गुरू आता तुमचे नैतिक सामर्थ्य वाढविण्यासाठी पंचमस्थानी आला असून गेल्या महिन्यापासूनच त्याने आपले हे कार्य सुरू केले आहे. आज तूळ ही रास काही बाबतीत तरी आघाडी गाजवीत राहाणार आहे. पाचवा गुरू व भाग्यस्थानी शनी-गुरूचा त्रिकोण योग, भाग्य व पंचमस्थानातून होत आहे. हे सारे ग्रहमान तुमचे जीवन बदलून टाकणार आहे. तुमच्या मनाची उभारी पुनः सुरू होईल. तुमच्या आशा आकांक्षाचा वृक्ष वठला होता तो आता फळवणार आहे. त्याला बहर येणार आहे. तुम्ही कलावंत असाल तर तुमची उपेक्षा आता संपली म्हणून समजा. तुमच्या कलागुणांनी उत्स्फूर्त प्रसिद्धी मिळणार आहे. प्रतिसाद मिळणार आहे. तुम्ही एखाद्या चित्रपटात काम केले असेल व तो चित्रपट आजवर प्रसिद्ध झाला नसेल तर तो या वेळी अगदी अकस्मात प्रसिद्ध होईल. तुमचे चीज होईल. तुम्हाला तीर्थयात्रेस जायचे असेल तर संधी मिळेल. तुम्हाला ईश्वरी उपासनेचे व्रत लाभेल व साधुपुरुषांचा आशीर्वाद मिळेल. त्यांच्या आशीर्वादाने मनाला आनंद मिळेल. धार्मिक लेखन व तात्विक लेखन हातून होईल. शिक्षण क्षेत्रात तुमच्या विद्वत्तेचा गौरव होईल. नोकरी नसणाऱ्यांना याच क्षेत्रात किंवा कलाक्षेत्रात ती मिळेल. कापड व्यापार व सोने चांदीचा धंदा करणारे सराफ यांना हा काळ अतिशय अनुकूल आहे. तुम्ही लग्नासाठी उत्सुक असाल तर ते सहज जमून जाईल संसारात काही तरी महत्त्वपूर्ण व आनंदी असे घडेल. यश आणि अनुकूल फळ देणारा असा हा काळ आहे **महिलांस :** गायन व वादन—नृत्य यात प्रगती होईल. तरुणींना प्रेमाचा प्रत्यय येईल. नोकरी हवी असल्यास ती मिळेल. ¤

## वृश्चिक : सुखात उणीव

आपणावर ग्रहाची नामर्जी होण्यासारखी परिस्थिती निर्माण होऊ लागली आहे. ग्रह अनुकूल असतात तेव्हा वृत्ती बेदरकार बनते व बेफिकीर राहाण्याकडे कल असतो. पण ग्रह प्रतिकूल असतात तेव्हा कोणत्याचबाबतीत आक्रमक पवित्रा घेऊन चालत नाही. तो यशस्वी होत नाही. मनाविरुद्ध कां होईना माघार व तडजोड हेच उद्दिष्ट ठेवावे लागते. चांगली वेळ येण्याची वाट पहावीच लागते. सांप्रत आपणास वाट पाहावी लागणार आहे. तुमची कोंडी होत आहे. तुमचे मन भडकून उठत आहे, मनःस्थिती उद्विग्न होत आहे हे सारे खरे आहे. पण ग्रहच ते घडवीत आहेत. तेव्हा आजची प्रतिकूलता अंधारासारखी संपणार असून तुम्हाला प्रकाश दिसेल हे लक्षात ठेवा. पुढच्या पंधरवड्यात राहू चंद्रावर येत आहे तो काहीसे अनुकूल घडवील. पण या पंधरवड्यात थोडया सावधगिरीने वागा. प्रामुख्याने राहात्या जागेत घरमालकांशी तंटे निर्माण होतील. तुम्ही घरमालक असाल तर भाडेकरूकडून वा सरकारी कायद्यामुळे तुम्हाला त्रास होईल. कोर्टातही प्रकरण जाऊ शकेल. खर्च व प्रतिष्ठा अक्षरशः पणाला लागेल. मातुल घराण्याकडील वृद्ध स्त्री वा तुमची मातोश्री आजारी पडून काळजी निर्माण करील. तुमची मनःस्थिती सतत खळबळत राहील. क्षुल्लक कारणासाठी डोके संतापत व भडकत राहील. नोकरीत तशी प्रतिकूल परिस्थिती नाही. पण इतर कुणी ना कुणी आजारी वा रजेवर असल्यामुळे तुमच्यावर कामाचा ताण पडेल. तुम्ही तक्रार करून त्याची दखल घेतली जाणार नाही. तुम्ही एखादे काम ठरवून प्रवासाचा बेत आखला असेल तर तो पार पडणे कठीण वाटते. तुम्ही कितीही तरळ कल्पनावादी असलात तरी तुमच्या हातून लेखन पुरे होणार नाही. तुमचे स्वीकारलेले लेखन परत येईल. तुम्ही प्रकाशक वा मुद्रक असाल तर तुम्हाला अनेक अडचणीना तोंड द्यावे लागेल. तुमचा कितीही वशीला असला तरी कागद मिळण्यात अडचणी निर्माण होतील. तूर्त कोणताही नवा उद्योग सुरू करू नये. आहे तोच कसा व्यवस्थित चालवता येईल ते पहावे. ॲल्यूमिनियमचा कारखाना, विद्युत ¤ उपकरणाचा उद्योग असेल तर संपाच्या

वावटळीत सापडेल. नोकरीत काही वेळा कसोटी लागेल. बेकारांना काम मिळेल. **महिलांस :** स्वतःचे काम की स्वतःपुरतेच लक्ष द्या. झेपेल तेवढेच काम करा. कुमारिकांनी प्रेमापासून सावध राहावे, ☐

## धनू : नव्या संबंधांना संधी

गेल्या महिन्यात गुरू हा तुमच्या राशीचा मालक तिसरा झाला व त्याचे मदतीचे सहकार्य मिळण्याचे आश्वासन तुम्हाला मिळाले आहे पाचव्या मंगळाने तुम्हाला बरीच साथ दिली होती. पण ते छत्र संपले आहे. सहावा मंगळ शुक्राच्या राशीत आहे व तो हळुहळू शनीकडे येत आहे. दोन शत्रू जवळ जवळ येऊ लागले की आपोआपच भीतीचे वातावरण निर्माण होते. तसेच काहीसे होऊ घातले आहे. पण गुरू अनुकूल आहे, त्यामुळे मोठे उत्पात घडणार नाहीत. तुम्ही विरोधकांना नमवाल, त्यांचे कांडात काढाल, तुमच्या स्पर्धकांना तुम्ही जिंकाल, पण हवे ते समाधान मात्र मिळणार नाही. रक्तद्राबासारखा आजार उचल खाईल. डॉक्टरांचे सान्निध्य हवेहवेसे वाटेल. खर्चाला सुमारच राहणार नाही. मित्राच्या बाबतीत अगर नातेवाईकांच्या बाबतीत असे एखादे प्रकरण निर्माण होईल की त्यामुळे विलक्षण खर्च होईल. तुम्ही व्यापारी असाल व प्रामुख्याने तुमचा किराणा भुसारचा व्यापार असेल, खतांचा व्यवसाय असेल, कागदाचा व्यवसाय असेल तर तुमचा हा व्यवसाय तंगी निर्माण करील की काय अशी चिंता निर्माण होईल. प्रत्यक्षात तशी अडचण भासणार नाही. पण सरकारी धोरणांचा फार परिणाम तुमच्या धंद्यावर होईल. नुकसान होईल. नफा सोडाच पण तोटा मात्र सहन करावा लागेल. तुम्ही एखाद्या व्यवसायात ठेव म्हणून पैसा गुंतवला असेल तर त्याबद्दल काळजीचे वातावरण निर्माण होईल. त्या धंद्यात मंदीची लाट येईल. पैसे गुंतून पडतील तुमच्या चालू कारखान्यात इंजिनियरिंग उद्योग, रासायनिक खते आणि उंची कापड गिरण्या यात कामगारांकडून अडवणूक होऊन नुकसान होईल. पोस्ट, तार खाते व कोळसाखाणी यात काम करणाऱ्या या राशीच्या लोकांना संपामुळे त्रास होईल. तुम्ही नोकरीत असाल तर तुम्हाला कामाचा ताण फारसा पडणार नाही. पण रजा, बदली वगैरे कोणतीच तुमची मागणी वरिष्ठांकडून सरळ मान्य केली जाणार नाही. आर्थिक बाबतीत आता त्या परिस्थितीत निश्चित सुधारणा होईल. पण पैसा टिकणे कठीण जाईल. मोठ्या मुलाच्या बाबतीत थोडी काळजी निर्माण होईल. मित्रांचे उत्तम सहकार्य मिळेल. लेखनाच्या बाबतीत नवे विक्रम हातून घडतील. **महिलांस :** माहेरी जाण्याची संधी मिळेल. आईचे प्रेम लाभेल. नवा संसार सुरू झाला असेल तर पुत्रयोगाचा आनंद मिळेल. ☐

## मकर : अडचणीवर मात

शनी हा तुमच्या राशीचा एक मालक आहे. तो मिथून राशीत राहूबरोबर असल्यामुळे त्याची तुम्हाला तशी अनुकूलता नाही. तो शत्रुस्थानी आहे. पण हा मिथून या चंचल व बौद्धिक राशीत असल्यामुळे तुम्हाला बौद्धिक शत्रुत्व फार आहे. समाजात ज्यांच्या विचारांना काही प्रतिष्ठा आहे, सर्व सामान्य लोकांवर ज्यांचा प्रभाव आहे असे लोक तुमच्या वाऱ्यालाही उभे राहाणार नाहीत. उलट तुमचा ते जिथे तिथे पाणउताराच करण्याचा प्रयत्न करतील. त्यांचा हा प्रयत्न कदाचित यशस्वी होणार नाही. पण त्यांचा त्रास मात्र तुम्हाला घामच आणील. त्यातल्यात्यात जमेची बाजू म्हणजे वृषभ राशीत पाचवा झालेला मंगळ. स्पर्धा परीक्षेत हा मंगळ यश देईल. तुम्ही युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशनची अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची एखादी परीक्षा देणार असाल तर त्यात तुम्हाला चांगले यश मिळून तुम्ही अधिकारी व्हाल. सरकारी नोकरीतील पोलिस अधिकारी, कमिशनर, महसूलखात्यातील प्रांत, कलेक्टर, तहशीलदार वगैरे लोकांना बढतीचा योग आहे. त्याचप्रमाणे प्रोफेसर, शिक्षण खात्यातील वरिष्ठ अधिकारी प्रमोशन मिळवू शकतील. इंजिनियर, वकील, डॉक्टर यांचा स्वतंत्र व्यवसाय तेजीत येईल. उंची कापडाचा व्यापार करणारे दलाल, शेअर ब्रोकर्स, कर्जपुरवठा करणारे पैसेवाले यावेळी भरपूर पैसा मिळवू शकतील. शेतीच्या व्यवसायात लाभ होईल पण थोडेफार नुकसान देखील सोसावे लागेल. जमिनीच्या खरेदी-विक्रीचा धंदा करणारे लोक या राशीत असतील तर त्यांनी जरा जपून वागावे. नफ्याच्या फारसे मागे लागू नये. कोणताही बेकायदेशीर व्यवहार करू नये. भाडेकरूंना त्रास होईल. काहींना दुर्दैवाने बेघर देखील व्हावे लागेल. मालक व भाडेकरू यांचे तंटे कोर्टात जातील. या पंधरवड्यात तब्येतीला जपणे जरूर आहे. छातीत धडधडणे, पोटाचा त्रास होणे, डोकेदुखी निर्माण होणे, अशक्तपणा वाटणे वगैरे त्रास होईल. नाटकाचे ठेकेदार असतील त्यांनी कोणत्याही नाटकाच्या वा कार्यक्रमाच्या यशाची खात्री स्वतःच्या मनाशी करून घेऊ नये. संसारात किरकोळ त्रास. राजकारणात अपेक्षाभंग होईल. **महिलांस :** गुरूचा बदल झाला त्याचवेळी तुमच्या मनावरचे नियंत्रण उठले आहे. भावनेच्या आहारी जाऊ नका. नोकरीत त्रास आहे. ☐

## कुंभ : विजयी कालखंड

अंतरिक्षातील या राशीच्या व्यक्ती आज आघाडीवर आहेत व त्यांच्या यशाचे चौघडे भविष्याच्या क्षितिजावर गर्जण्याची चिन्हे दिसत आहेत. नुकताच राशीत येऊन बसलेला गुरू या पंधरवड्यापासून कुंभ राशीच्या व्यक्तींच्या उत्कर्षाची व विकासाची सूत्रे आपल्या हाती घेणार आहे. जे बोलाल ते करून दाखवण्याचे अद्वितीय सामर्थ्य परमेश्वराच्या कृपेने आता तुम्हाला लाभणार आहे. लेखन असो वा वक्तृत्व असो, स्वतंत्र धंदा असो वा नोकरी असो, राजकारण असो वा सार्वजनिक कार्य असो वा आर्थिक व्यवहार असो यश आणि सफलता याखेरीज दुसरे काही घडणार नाही. गुरू व शनीचा त्रिकोण योग तुमच्या जीवनात घडत आहे. एवढा असामान्य व तुमचे व्यक्तिमत्त्व उंचावणारा अद्वितीय योग कित्येक वर्षांनी येत आहे. उपेक्षा आणि निराशा, नुकसान व हानी, अप्रतिष्ठा आणि अडचणी आता इतिहासजमा होतील. यश आणि विजय यांच्या वारूवर तुमचे जीवन आता प्रसन्नतेच्या नंदनवनात विहार करणार आहे. बाराव्या गुरूने तुम्हाला सतावून सोडले. तोंडाशी आलेला यशाचा प्याला एकदम दूर सारला गेला. पण तसे आता होणार नाही. हातात मातीचे कण घेतले तरी त्याचे सोने होईल. नोकरीत महत्त्वाची जबाबदारी तुमच्यावर सोपवली जाईल. जणू ही जबाबदारी इतके दिवस

तुमच्यासाठीच थांबली होती. तुम्हाला नोकरीत बढती-बदलीचे एवढे मोठे योग आहेत की तुम्ही तुमच्या मागण्यासाठी तयार रहा. ज्या वरिष्ठांकडून आजवर तुम्हाला त्रास झाला होता तेच वरिष्ठ आता तुमची शिफारस करतील. चालू नोकरी सोडून तुम्हाला दुसरी नोकरी धरावयाची असेल तर ती उत्तमपैकी मिळेल. कापडगिरणी, तेलाची गिरणी, साबण कारखाना, लोखंडी अवजारांचा व्यापार, शेतीची अवजारे यांचा व्यवसाय रासायनिक खतांचा उद्योग, अल्युमिनियम इत्यादी कोणताही नवा धंदा करा. यश आणि पैसा मिळून भरभराट होईल. इतके दिवस नुकसानीत वा मंदीत चाललेले तुमचे उद्योग यावेळी प्रगतीचा वेग घेतील. अडचणी दूर होतील. लग्नाची इच्छा सफल होईल. **महिलांस** : फार छान काळ आहे. तुम्ही जर स्वतंत्र धंदा करणार असाल तर अनुकूलता आहे. कुमारिकांचे विवाह होतील. ¤

**मीन : प्रगतीची वाटचाल**

तुमची रास गुरूच्या नियंत्रणाखाली—आधिपत्याखाली येते. साहाजिकच गुरूच्या अनुकूल प्रतिकूलतेचा बरा वाईट परिणाम मीन राशीच्या व्यक्तीच्या जीवनावर होत असतो. तुम्हाला नुकताच गुरू बारावा झाला आहे. बुद्धी आणि भावना या दोन्ही बाबतीत तुमच्या मनाचा तोल आता तुम्ही कटाक्षाने सावरला पाहिजेच. भावनेच्या आहारी जाणे टाळणे आवश्यक आहे. तुम्ही लेखक असाल—प्रामुख्याने वृत्तपत्रकार असाल तर तुमच्या लेखणीने वादळे निर्माण होतील. अनेकांची मते व हृदये तुम्ही वा तुमच्याकडून दुखावली जातील. तुम्ही याबाबतीत शत्रू निर्माण करून ठेवाल व विक्षिप्त असा तुमच्यावर शेरा मारला जाईल. ललित लेखक असाल तर अश्लीलतेच्या आहारी जाऊन नको त्या प्रकारचे लिखाण तुमच्या हातून घडेल व लोकांची अप्रीती तुम्ही निर्माण कराल. लेखी करार व कोर्टकचेऱ्या सध्या टाळाव्यात. पत्रव्यवहार करताना नुकसान होऊ देऊ नका. तुम्ही सावकार असाल तर हिशोबात गोंधळ निर्माण होऊन कायद्याच्या कचाट्यात सापडू शकाल. यावेळी तुम्हाला इन्कम् टॅक्सचा देखील त्रास होण्याची शक्यता आहे. पण ही थोडी त्रासाची बाजू सोडली तर हा बारावा गुरू तुमचे वाईट करणार नाही. अपुरे लेखन पुरे होईल. चार पैसे मिळतील. लेखनाला मागणी येईल. तुमच्या हातून चित्रपट नाटकासंबंधी, काव्यासंबंधी लेखन होईल. नोकरीच्या दृष्टीने यावेळी तुमच्या कामात बदल होईल. तुम्ही इच्छा नसताना तुमची बदली होईल. चालू कामात बदल होईल तसेच ठिकाणही बदलेल. पण हा बदल आनंदाने स्वीकारा. कारण त्यामुळे शेवटी फायदा होईल. तुमचा कोणत्याही प्रकारचा धंदा असो त्यात सुधारणा होईल. मंदी असल्यास किंवा उत्पादन घटल्यास ते भरून निघेल. संप व टाळेबंदीची झळ तुम्ही या राशीचे असाल तर तुम्हाला बसणार नाही. सरकारातील परदेश व्यापार विभागात एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीबरोबर संबंध येऊन तुमच्या भविष्यकालीन व्यापाराचे 'घबाड' तुम्हाला उपलब्ध होईल. राजकारणात प्रवेश होईल. मंत्र्यांच्या जवळ जाल. लग्नाचा विचार मात्र विवाहेच्छूंनी लांबणीवर टाकावा. **महिलांस** : तुम्ही एखाद्या लहान उद्योगाचे मालक असाल तर तुमच्या धंद्याला प्रगतीसाठी सहाय्य व मदत मिळेल. ⚜ ⚜

---

**क्रीडांगण**

मुकुंद मणूरकर

# जागतिक क्रिकेटमधील सौंदर्य लुप्त झालंय —बॉबी

बॉबी तल्यारखान. प्रत्यक्ष क्रिकेट न खेळता वर्तमानपत्रातून आणि रेडिओवरून केवळ समीक्षा करून गाजलेलं क्रिकेटमधील एक वादळी व्यक्तीमत्त्व ! वसंत व्याख्यानमालेत आज त्यांचं व्याख्यान आहे. विषय जिव्हाळ्याचा 'इंडियन क्रिकेट टुडे'

सहा वाजलेले असतात. भरत नाट्य मंदिरात हळूहळू लोक जमू लागतात. चिक्कार गर्दी होईल या अपेक्षेने तिकीट एक रुपया ठेवलेलं असतं. हिशेबी पुणेकर जरा बिचकतात. ओव्हरफ्लोला अनायासे ब्रेक लागला जातो. गर्दी बेतासबात.

बॉबीबद्दल अनेक आख्यायिका कानावर पडू लागतात. काही खऱ्या, बऱ्याचशा खोट्या. पॅरॅलिसिस झालेला असतानाही आवाज कसा अजून खणखणीत आहे, विजय मर्चंटशी सॉलीड वाजलेले आहे इथपासून ते ऑल इंडिया रेडिओचा त्यांनी अगदी कचरा केला इथपर्यंत !

बॉबी तल्यारखान. पंधरा मिनिटांची आपली पाळी कधी संपते आहे याची वाट पाहात कॉमेंट्री करण्याच्या सध्याच्या काळात बॉबीने संपूर्ण मॅचेसची एकट्याने केलेली कॉमेंट्री ऐकलेल्यांच्या चेहऱ्यावर आदराचे भाव तरळत असतात. बऱ्याच वर्षाच्या गॅपनंतर परवा परवा म्हणजे टोनी लुईसच्या संघाबरोबर मुंबईला टेस्ट झाली तेव्हा, 'एक्स्पर्ट' म्हणून बॉबी माईकसमोर आला. इतर ठिकाणी 'एक्स्पर्ट'ची बबबड ऐकणे म्हणजे डोकेदुखी ! दिवसाच्या खेळाचे समालोचन म्हणजे धावफलक विस्ताराने सांगणे हाच अर्थ घेऊन हे एक्स्पर्ट बोलत राहतात. ते आणि बॉबी यांच्यातील फरक तेव्हा लक्षात आला. मैदानावर घडणाऱ्या घटनाकडे वेगळ्याच डोळ्यांनी पाहणे आणि त्यावर आगळा बाज चढवून तुम्हाआम्हापर्यंत पोचविणे ही बॉबीची कला आणि त्याचा खास खर्जातला आवाज हे त्याचे भांडवल. काही शब्द लांबवर ताणून, काही काही शब्दावर सकारण आघात देत देत बॉबीने केलेल्या कडवट आणि तिखट कॉमेंट्रीही आनंद देऊन जातात.

पडदा उघडतो. गौरवर्णी भरदार चेहरा, त्याला साजेसा चष्मा, दाढीचे खुंट म्हणण्याइतपत वाढलेली रुपेरी दाढी अशी सुटाबुटा-

तील बॉबीची मूर्ती बसलेली असते एखाद्या शास्त्रज्ञाच्या रुबाबात ! वय पंचाहत्तर. तरी चेहऱ्यावरचे मिष्कील भाव, डोळे बोलून दाखवतात. शेजारी दि. ब. देवधर. अध्यक्ष म्हणून.

बॉबीच्या कॉमेंट्रीमुळे रणजी ट्रॉफीचे क्रिकेट लोकप्रिय झाले हा मुद्दा देवधर घोळवून सांगतात. 'आम्ही मैदानावर प्रत्यक्ष खेळत असताना बॉबीच्या कॉमेंट्रीला मुकायचो तेव्हा वाईट वाटायचे '–इति देवधर.

बॉबी उठतात. औपचारिक दोन शब्द बोलून विषयाला हात घालतात. भाषण साभिनय चाललेलं. बोलण्याला विनोदापेक्षा उपरोधिकपणाचीच धार अधिक. आणि त्याला दादही तशीच, म्हणजे इंग्रजी भाषेला साजेशी अशी दबल्या आणि अस्फुट हास्याची मिळू लागते. विषय फुलायला लागतो.

'इंडियन क्रिकेट टुडे' या विषयामुळे काही खास अपेक्षा घेऊन आलेल्या श्रोत्यांचा अपेक्षाभंग सुरुवातीलाच होतो. आजचे भारतीय क्रिकेट म्हणजे, खेळाडूंचा परफॉर्मन्स, इंग्लंडच्या दौऱ्यासाठी अपेक्षित संघ वगैरे गोष्टी बॉबीकडून ऐकायला मिळतील ही ती अपेक्षा. पण 'इंडियन क्रिकेट टुडे' म्हणजे भारतीय क्रिकेटचे आजचे स्वरूप, त्याचा दर्जा, हा बॉबींनी पकडलेला धागा.

आता आजच्या क्रिकेटची तुलना करायची म्हणजे कालचे क्रिकेट बघायलाच पाहिजे. कसे होते कालचे क्रिकेट ? तेव्हा ना होती लक्षावधी रुपयांची स्टेडियम्स्, ना हजारो रुपये खर्चून केलेल्या दगडासारख्या कठीण खेळपट्ट्या ! दोन छोटेखानी क्लब्ज् किंवा जिमखाना, यांच्यातला थोड्याच पण जाणकार प्रेक्षकापुढे चाललेला सामना, त्यातून दिसायचं खरं क्रिकेट ! तेव्हा खेळाडूपुढे नसायचं कसलंही आकर्षण, नोकरी, बक्षिसं, ट्रॉफीज, किंवा कसलंही ! मुक्त खेळ, चेंडू हा मारण्यासाठीच असतो ही प्रत्येक फलंदाजाची समजून असायची त्या काळी. प्रदूषणाने भरलेल्या महानगरीतील मनाला जशी मोकळ्या, स्वच्छंद खेड्याची ओढ लागते तशीच बॉबींना 'काल 'च्या क्रिकेटची ओढ आहे !

आजचं क्रिकेट हे कमर्शिअल क्रिकेट आहे. बँका, टेक्स्टाईल इंडस्ट्रीज, सिमेंट कंपन्या वगैरे प्रकार क्रिकेटमध्ये इन्व्हॉल्ड झालेत. खेळाडूंना क्रिकेटमुळे नोकऱ्या मिळतात. नोकरीत सवलती मिळतात. त्यामुळे एक बांधिलकी येते. त्यामुळे खेळाचा दर्जा खालावला जातो.

सध्या क्रिकेट आणि क्रिकेटशी संबंधित असलेले घटक यांच्यात फालतूपणा कसा बोकाळलाय हे सांगताना बॉबी चार पातळ्या कल्पितात. प्रेक्षक, पत्रकार, आकाशवाणीचे समालोचक आणि खेळाडू.

तर प्रथम प्रेक्षक. ब्रेबॉर्नवर पन्नास हजारांनी गर्दी करणाऱ्यापैकी किती जणांना क्रिकेट कळतं हो ? तर फक्त पाच हजार लोकांना. रिमेनिंग नो नथिंग ! कोला–पॉपकॉर्न किंवा चहा-वडे खात, गोगो, गॉगल चढवून हाती ट्रान्झिस्टर घेऊन सामना पाहणाऱ्या मंडळींना, आऊट झाला की टाळ्या वाजविणं एवढंच क्रिकेट कळतं ! ब्रेबॉर्न गेलं ते बरंच झालं !

नाऊ रिपोर्टर्स, आजचे रिपोर्टर्स, क्रिकेट लोकप्रिय करण्याऐवजी ते अप्रिय करण्याऱ्याच मागे लागले आहेत जणू ! क्रिकेट रिपोर्टिंग म्हणून वर्तमानपत्रात जे भारूड येतं ते खरं तर दोन चार ओळीत लिहिण्याच्या लायकीचे. आता यांच्या हेड्लाईन्स पहा. फलंदाजीचाच गौरव त्यात असतो. डिक्शनरीतून अनेक विशेषणे शोधली जातात. आणि हे काम फार सोपं असतं. पण उत्कृष्ट गोलंदाजीबद्दल कधीही हेडलाईन नाही. कारण त्यासाठी गोलंदाजीतील बारकावे समजावे लागतात ना !

आकाशवाणीच्या समालोचकांवर तर बॉबींचा विशेष राग. अरे, समोर काय घडतंय ते सांगा ना. विजय मर्चंट हा उत्कृष्ट प्लेयर. त्याने सांगायचं बॅटस्मनने कसा स्ट्रोक मारला, कसा मारायला हवा होता, फूटवर्क कसं पाहिजे होतं, तर ते सोडून रणजीनी किती धांवा काढल्या आणि ग्रेसने किती शतकं काढली. अरे, करायचंय काय ते ? ते 'विस्डेन 'च्या बुकात मिळतंच की !

आता बॉबी प्रत्यक्ष खेळाकडे वळतात. 'भारतातीलच नव्हे तर एकंदर जगातीलच क्रिकेटचा दर्जा खालावलाय. त्यातील सौंदर्य लुप्त होतंय हळूहळू. आता परवा आलेला इंग्लंडचा संघच पहा. सहा सहा फूट उंचीचे ताडमाड खेळाडू, पण आपल्या स्पिनर्सपुढे अगदी कोकरू होऊन जातात. आता बेदीचा बॉल पडल्यावर तो ठोकायचा सोडून हे लोक 'प्लेड' करायला जातात. चेंडूच्या फिरकीमुळे तो बॅट आणि पॅडवरून निसटतो आणि तिथं उभा असलेला सोळकर तो पकडतो. मिळाली विकेट ! अरे, हे काय क्रिकेट झालं ? आपली बॉलिंग किंवा फिल्डिंग यांना कमी लेखायचं नाही मला, पण खरं सांगायचं तर भारताने ज्या इंग्लंड–वेस्ट इंडिजवर विजय मिळविले ते संघच अगदी पूअर होते. अजून दोन चार वर्षांनी आपण विश्वविजेतेही होऊ. पण तरीही क्रिकेटचं एव्हरेस्ट आपल्यापासून खूप दूर आहे. आता या देवधरांचंच बघा ना, गुगली पडल्याबरोबर तो लगेच ठोकून काढणंच माहीत आहे यांना आणि वर म्हणतात, 'हा गुगली आहे की नाही हे बघायला मला वेळच नसतो मुळी !' तर हे खरं क्रिकेट...'

एव्हाना वेळ संपत आलेला असतो आणि रात्रीच्या नाटकाच्या तयारीसाठी विंगेत मंडळी घाई करू लागतात. त्यामुळे दोन चार मामुली प्रश्नोत्तरे होऊन कार्यक्रम संपवावा लागतो. संपवायची इच्छा नसते, श्रोत्यांची आणि बॉबींचीही !

एक गोष्ट मात्र मनात घर करून जाते. या माणसाचं क्रिकेटवर खरंखुरं प्रेम आहे. अगदी निखळ प्रेम ! मागे मुंबईला इंग्लंडबरोबरील कसोटीत शेवटच्या दिवशी वाडेकरने डाव लवकर घोषित केला नाही म्हणून तत्यारखान भयंकर चिडले होते. 'आय शॅल नॉट कम अगेन' असं म्हणून त्यांनी विजय मर्चंटच्या हातात माईक दिला. तेव्हा त्यांचा तो त्रागा वाटला. पण तो त्रागा नव्हता.

कारण या माणसाला हार निर्णयाचं महत्त्व नाही. त्याला पहायचा असतो फक्त शुद्ध कलात्मक खेळ, जो हळूहळू दुर्मिळ होत चाललाय... □ □

# अवांतर

शरद गोखले

## ॥ रीना रॉय ॥


चित्र कसेही असले तरी गर्दी खेचणार, हे नक्कीच होते. अपेक्षेप्रमाणे चेतनाच्या पाठीवर आलेल्या जरूरत या चित्राचेही चांगले स्वागत झाले. गंभीर विषयाला भडक पद्धतीने सामोरे जाणारे हे चित्र लक्षवेधी ठरले त्याचे प्रमुख कारण रीना रॉय. छानशी उंची, सडसडीत बांधा, मोहक चेहरा – आणि विलक्षण आकर्षक व्यक्तिमत्त्व लाभलेल्या रीनाचे हे पहिले चित्र. अपंग नवऱ्याच्या मोहब्बतीखातर चलनी नोटांची चढत घेऊन सर्वस्व विकणारी एक धाडसी आणि 'प्रॅक्टीकल' मुलगी म्हणून रीना सामोरी गेली. पहिलेच चित्र म्हणून नसता बागुलबुवा न करता दिग्दर्शकाच्या हर एक इशाऱ्याला तिने दाद दिली. आणि पहिल्याच चित्राबरोबर या नवीन नायीकेचा उदय झाला.
जरूरतच्या यशानंतर – नेहमीचा ठेका लक्षात घेता खूप काम येणार असा अंदाज होता, काम आलेही पण भूमिका साचेबंद. म्हणजे जरूरत पद्धतिच्याच कार्बन आवृत्ती ! अभिनेत्री म्हणून उभे राहण्याची उमेद घेऊन आलेल्या रीनाला नुसती चित्रपटांची संख्या फुगवण्यामध्ये मौज वाटत नव्हती. चार-सहा चित्रे तिने झटक्यात नाकारली. पोरगी अगाऊच दिसतेचा बोलबाला झाला. आणि 'मिलाप' या बी. आर. इशारा यांच्या चित्रातील भूमिका तिने स्विकारली. फॅन्टसीचा नवा प्रकार तिला मोहक वाटला. शिवाय बरोबर शत्रुघ्न होता. 'मिलाप' इशारा स्पीडने पूर्ण झाले आणि जेट स्पीड कोसळले. मुंबईच्या पडद्यावर नवीन बांधेसूद मुलगी उभी राहिली की तिला पळवायची हा मद्रासचा खाक्या. ए. व्ही. एम्. चे वजनदार 'बॅनर' नवीन चित्राची जुळवा जुळव करत होते. आणि एक दिवस रीनाला ऑफर आली. यावेळी साथमे जितेंद्र– चित्रपट जैसे को तैसा. एखादी नटखट नखरेल ग्रामकन्या पडद्यावर आणण्याची रीनाची जबरदस्त इच्छा होती. चित्रपट 'बोलू' लागल्यापासून शे-पाचशे ग्रामकन्या येऊन गेल्या असल्या – आणि प्रत्येक अभिनेत्रीने आपल्या आयुष्यात पाच-पंचवीस वेळा तरी हे ग्रामकन्येचे साजरे गोजरे रूप साकार केले असले, (पहा– लिला चिटणीस अछूत कन्या, नर्गिस – मदर इंडिया, बिना



॥ रीना रॉय ॥



॥ रीना रॉय ॥



रॉय – इन्सानियत, मीनाकुमारी – चार दिल चार राहे, आशा पारेख – हिरा, वहिदा रेहमान – राखी, रेखा – जमीन अस्मान, मुमताझ – बंधन.) तरी येणाऱ्या नवीन अभिनेत्रीला या ग्रामकन्येने सतत मोहवले आहे. जैसे को तैसा – हे तसे सर्वार्थाने जितेन्द्रचे चित्र. पण रीनाची या चित्रातील नखरेल ग्रामकन्याही तसे भूमिकेचे पोत नेहमीचे असूनही चांगलीच ठसठशीत ठरली.

बंगाली आर्टिस्ट म्हणजे दबदबा ! मग तो तंत्रज्ञ असो वा कलाकार – बंगाली आर्टिस्टकडे येणारा निर्माता या कलाकाराचे थेट सत्यजितशी नाते असते अशा थाटात बिचकत बिचकत बोलणी सुरू करतो. पूर्वी अपवाद असलाच तर तो बेला बोसचा, आणि आता रीना रॉयचा. सत्यजितच्या त्या बंगालशी आपले कोणतेही नाते नसल्याची पोच रीनाने तिच्या चित्रपटातून आजवर दिली आहे.

जंगल मे मंगल आणि मदहोश ही रीनाची आणखी दोन चित्रे. राजेन्द्र भाटिया यांचे जंगल मे मंगल फारसे चालू शकले नाही. अनामिकाची पुण्याई घेऊन आलेले नाझिर हुसेनच्या मदहोशचे भवितव्य अजून ठरायचे आहे. प्रेक्षकांसमोर आलेल्या प्रत्येक चित्रामध्ये रीना स्वतःची प्रतिमा घेऊन आली आहे. प्रत्येकवेळी नवीन नायक घेऊन. विजय अरोरा, जितेन्द्र, शत्रु, किरणकुमार, महेन्द्र संदू, राकेश रोशन,–जितेन्द्र–शत्रु वा अपवाद सोडल्यास प्रत्येक नवीन कलाकाराबरोबर ती तोलामोलाने उभी राहिली आहे.

वितरित झालेल्या पाच चित्रांच्या पाठोपाठ तिची अर्धा डझन चित्रे येऊ घातली आहेत. गुंज या चित्रामध्ये दगा देऊन खून करणाऱ्या खुनी इसमाचे भूत म्हणून रीना वावरणार आहे. (हा अजून एक वेगळा !) शास्त्रीय संगिताची बैठक असलेली गायीका इष्क महोब्बतीच्या मामल्यामध्ये गुरफटली जाते. प्रेमिकेचे हे रुप रीना वरदान या चित्रामध्ये धारण करणार आहे. तिच्या सोबत आहे विनोद मेहरा. सध्या गॉसीप कॉलममध्ये भलताच चर्चिला जाणारा छबेला नायक. उमर कैदमध्ये सती सावित्रीच्या परंपरा प्रिय रूपामध्ये रीनाचे दर्शन घडणार आहे. अंधळ्या आईला आधार देण्यासाठी पायात चाळ बांधणारी या चित्राच्या नायिकेची एका बदमाष माणसाबरोबर शादी होते आणि भले तो इसम उमर कैद भोगण्यासाठी जेलमध्ये गेला तरीही त्याच्याशी एकनिष्ठ राहते वगैरे ! ' उमर कैद ' भोगणारा हा इसम आहे सुनिल दत्त. ' जखमी ' या चित्रामध्ये एका लखपतीची एकुलती कन्या झालेल्या रीनाला गुंड पळवून नेतात. तिच्या वडिलांना ब्लॅकमेल करण्यासाठी. तर ही पठ्ठी म्हणते–चला बरं झालं सुटले एकदा पप्पांच्या कटकटीतून.

साधारणपणे–डझनभर चित्रपट झाले की हिन्दी चित्रपटाच्या नायिकेला तिच्या चित्रपट कारकिर्दीमध्ये जे जे करणे शक्य असते,–अभिनयाचा जो काही अविष्कार वगैरे करायचा असतो तो करून झालेला असतो आणि मग निवृत्त होईपर्यंत याच पाठांची पुन्हा पुन्हा उजळणी करायची असते आणि या उजळणी पाठांवर कलम चालवणारे कॉलम बहाद्दर पुन्हा पुन्हा त्याच त्याच विशेषणांची किंवा शिव्या शापांची उधळण आपल्या ' परीक्षण ' नामक लिखाणातून करत रहातात.

चित्रपट ' नायिका ' म्हणून मान्यता मिळाली की अशी वाटचाल सुरू होते. अभिनेत्री पद एखादीच्याच वाट्याला येते. एक छानशी नायिका म्हणून रीना आज डौलात उभी आहे. आता नायिका म्हणूनच ती वाट तुडवत राहते की अभिनेत्री बनण्याची कोशिश करते ते अजून ठरायचे आहे. ■



शफीसाहेब
एका
वेगळ्या भूमिकेत
प्रथमच


# रंजन रंजन मनोरंजन !

हे कपूर तसे स्वस्थ बसणारे लोक नाहीत. यशापयशाचे टप्पे ओलांडत ते अखेरपर्यंत वाटचाल करणार. आता जोकरने बेदम मार खाल्ला–राज संपल्याची आरोळी उठली. बॉबी चालला–राजचा जयजयकार झाला. समजा बॉबी कोसळला असता तर राज काय लोणी काळभोरला येऊन कोबी फ्लॉवरचे गड्डे काढत बसला असता, द्या सोडून. आर. के. च्या बॅनरखाली नवीन चित्राची जुळवा जुळव सुरू झाली असती. आता शम्मीचेही बघा ना, चित्रपट नायक म्हणून आपण संपलो हे त्याने ओळखले आणि पठ्ठा कॅमेऱ्यामागे गेला. आता पडद्यावर प्रथम येणारे त्याचे नाव तितक्याच ठसठशीतपणे येईल दिग्दर्शक म्हणून. एफ. सी. मेहरा आणि शम्मीची दोस्ती मुंबईतील अलिशान 'मिनर्व्हा' चित्रपट गृहातील भागी बरोबरच व्यवहारिक पातळीवर वाटचाल करू लागली होती. आता शम्मी दिग्दर्शक म्हणून येतो आहे तो एफ. सी. मेहरा यांच्या 'मनोरंजन' या नवीन चित्राचा.


दिग्दर्शक म्हणून उभे राहू इच्छिणाऱ्या प्रत्येकाला या आघाडीवरील पहिले पाऊल विचार करूनच टाकावे लागते. विचार एकच–पिक्चर चालले पाहिजे ! विचाराचे नेमके हेच टोक पकडून मनोरंजनची रचना करण्यात आली आहे.

कथा आणि कथाकारांचे उदंड पेव भवती असले तरी रंजन करण्याचे सामर्थ्य साहेबाच्या लेखणीत असल्याची जाणीव असलेल्या शम्मीने कथेसाठी डल्ला मारला इर्माला डयुस वर. मूळ कथाबीज तिकडचे असले तरी 'साज बाज' आपला आसला की छान मौज करता येते हे गुलझारने कोशिश, परिचयच्या वेळी





जॅक लेमन – शर्ले मॅक्लेन ही साहेबांची जोडी. इथे आहेत संजीवकुमार – झीनत अमान





# बाबूंची सारी मदार आपकी कसमवर

दाखवून दिले. या कामगिरीवर गुलझार नाही, तरी अब्रर आलवी सारखा खंदा लेखक शम्मीने खर्ची घातला.

भोवती हिंदी फिल्मचा सर्व मसाला, मधे एक वारांगना आणि तिच्यावर लट्टू झालेला एक सखाराम यांचा चटकदार किस्सा सांगायला कलाकारही कसबी पाहिजेत. पन्ना अमान आणि संजीव कुमार सारखा बोलत्या चेहऱ्याचा नट असा जामानिमा असलेल्या मनोरंजनमध्ये शम्मीचे खूप दिवसांनी दर्शन होणार आहे. बार मॅनेजर अशी एकदम चापून शोभून दिसणारी भूमिका शम्मी निभवणार आहे. पठ्ठा चांगला उभा राहिला तर चरित्र अभिनेता म्हणून प्रेमनाथच्या तोलामोलाने उभा राहील. शिवाय पिक्चर चालले, तर दिग्दर्शक म्हणून मान्यता मिळेल.

मनोरंजन रिलीज होण्यापूर्वी चित्राची हवा चांगली आहे. येत्या दिनांक ८ रोजी मुंबईकर रसिकांचे मनोरंजन करायला शम्मीकपूर आणि कंपनी रुजू होत आहे.

डिम्पलला छोकरी झाल्यामुळे, त्या पोरीचा बाप म्हणून जी प्रसिद्धी मिळाली त्या खेरीज राजेश सध्या फारसा 'न्यूज'मध्ये नाही.

चित्रीकरणाच्या आणि नवीन कराराच्या बातम्या नवीन निश्चल आणि किरणकुमार यांच्या संदर्भातही प्रसिद्ध होत असतात. वृत्तआघाडीवर अशा प्रकारे पिछाडीला असलेल्या राजेशबरोबर स्वतःचे नशिब अजमवायला निघाले आहेत, जे ओमप्रकाश. 'राजा–रानी' हे त्यांचे अलिकडचे चित्र कोसळले, तरी त्यांनी अद्यापी राजेशशी गद्दारी केलेली नाही. 'आप की कसम' या त्यांच्या नवीन चित्रामध्ये त्यांनी राजेशबरोबर संजीवकुमारला उभा केला आहे. 'आस का पंछी'पासून सुरू झालेली 'अ'ची बाराखडी पुन्हा पकडली आहे. 'आप की कसम' या त्यांचश नवीन चित्रपटामध्ये राजेशबरोबर त्याची सहेली मुमताझ आहे. मुमु–राजेशची जोडी चांगल्यापैकी यशस्वी ठरलेली आहे. तथापी केवळ या यशस्वी जोडीवर मदार न ठेवता

ओमप्रकाश यांनी संजीवसारखा मोहराही खर्ची घातला आहे. ' आँखो आँखोंमे ' या चित्राला जावयाने (राकेश रोशन) दगा दिला. ' राजा–रानी 'चा भाव धर्मेन्द्र हेमाच्या ' राजा–जानी 'ने उतरवला. आता ' आप की कसम 'वर तरी मेहरनजर व्हावी ?

## चैतेली

श्रीमती मोनो बिना रॉय...पतीच्या अकाली निधनाने उध्वस्त झालेली बिमल रॉय प्रॉडक्शन्ससारखी मातब्बर संस्था बाई नवीन जिद्दीने उभारण्याचा प्रयत्न करीत आहेत. सध्या एकदम भाव खाऊन राहिलेले गुलझार आणि हृषिकेश मुखर्जी ही दोन्ही मंडळी बिमलदांच्या तालमीमध्ये तयार झालेली. स्वाभाविकपणे संस्था पुन्हा उभारताना या मंडळींचे सहकार्य अभिप्रेत होतेच.

' चैतेली ' हे बिमल रॉय प्रॉडक्शन्सचे नवीन चित्र. धर्मेन्द्र, प्रथम शर्मिला नंतर कटाप करून सायराबानो असलेल्या या बड्या चित्राचे गीतमुद्रणप्रसंगी लता मंगेशकर आणि रॉय परिवार. ■






MANOOS ( Chitra, Varta, Pustak Fortr
Rupee : One : Regd. No. PNC–I